मूल्य ३० रु. / पृष्ठे १०४ । सप्टेंबर २०१९ । वर्ष १२ वे / अंक ९

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!




## अनुक्रमणिका


**4**
सुरुवातीचे–
**नवे नामाभिधान भाजप–काँग्रेस**
– जयंत पाटील

**5**
प्रबंध संपादकीय–
**भाजपची घराणेशाही**
– दिलीप वळसे पाटील

**6**
संपादकीय–
**पंतप्रधानांचे भाषण शेतकऱ्यांच्याच मुळावर**
– डॉ. सुधीर भोंगळे




**12**
२०१९ : कृष्णेचा महापूर जनता त्रस्त, सरकार मते मागण्यात व्यस्त
– डॉ. सुधीर भोंगळे



**36**
पूरग्रस्तासंबंधी राष्ट्रवादीचे निवेदन
**युद्धपातळीवर उपाययोजना करा**



**38**
राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा, भाषणे
१) अजित पवार–३८
२) छगन भुजबळ– ४९
३) जयंत पाटील– ५०
४) डॉ. अमोल कोल्हे–५६
५) धनंजय मुंडे–६६



**70**
काश्मीरचे साहस केवळ्यात पडणार
– आकाश, नवी दिल्ली




**76**
राष्ट्रवादीचा मुंबईतील मोर्चा
बलात्कारप्रकरणी भाजप सरकारचा धिक्कार
– सुप्रिया सुळे



**78**
सुप्रिया सुळे यांचा संवाद दौरा
संघर्षाला भीत नाही
– सुप्रिया सुळे



**80**
चव्हाटा (राजकीय विनोदी किस्से)
– घंटाकर्ण



**90**
अनर्थकारण व सूडाचे राजकारण
– लोकनाथ



**96**
काश्मीरचे आंतरराष्ट्रीयकरण कोण करतंय?
– गहिनीनाथ



**102**
शेवटचे पान...
**सेल जीवनाचा**
– हेमन्त टकले






संचालक
**हेमन्त टकले**

प्रबंध संपादक
**दिलीप वळसे पाटील**

संपादक
**डॉ. सुधीर भोंगळे**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर–
**वार्षिक रु. ५००/–**

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा
मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई–४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.

संपादक–
**डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे**

# नवे नामाभिधान भाजप-काँग्रेस

भारतीय जनता पक्ष हा एकाधिकारशाही व हुकुमशाही मानणारा आणि त्यावर विश्वास ठेवून त्या विचारांच्या आधाराने वाटचाल करणारा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तर हुकुमशहा म्हणून जगविख्यात असलेल्या ॲडॉल्फ हिटलरलाच आदर्श मानून पूजत आले आहेत. किंबहुना मोदी साहेबांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीकडे पाहिले तर ते जणू काही हिटलरचे जुळे भाऊच असावेत असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. आता त्यांना जोडीला अमित शहा येऊन मिळाले आहेत. त्यांना मोदींनी जाणीवपूर्वक केंद्रीय गृहमंत्रीपद दिले आहे. अमित शहा यांची गुजरात राज्यातली मागची कारकिर्द आपल्या सगळ्यांना माहिती आहे. केंद्रीय गृहमंत्री असताना पी. चिदंबरम यांनी त्यांना खुनाच्या गुन्ह्यामध्ये अटक करून तुरुंगात टाकले होते.त्याचा वचपा आता शहा हे चिदंबरम् यांना अटक करून घेत आहेत असे सर्वत्र बोललेजाते. ते काहीही असो. ज्या पद्धतीने मोदी-शहा जोडगळीने देशभर कारभार चालविला आहे ते पाहता सत्ताधाऱ्यांची सगळी पाऊले एकाधिकारशाही व हुकुमशाहीच्याच दिशेने पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे देशाच्या लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे. किंबहुना आज अनेक विचारवंत व जाणकार सामाजिक कार्यकर्ते, लेखक हे देशात अघोषित आणीबाणीच आहे असे जाहीरपणे व स्पष्ट शब्दांत सांगत आहेत. शहरी नक्षलवादाच्या नावाखाली केवळ आपल्याला विरोध करताहेत म्हणून अनेक पुरोगामी चळवळीतल्या व डाव्या विचारांच्या लोकांना खोटेनाटे आरोप लावून अटक केले जात आहे. जामीन मिळू दिला जात नाही.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अनेक नेते भाजप-शिवसेनेत यावेत म्हणून दोन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच लागली आहे. दोघांकडून प्रवेश करण्यासाठी विरोधी पक्षांच्या नेत्यांना मोठमोठी आमिषे दाखविली जात आहेत. या नेत्यांनी त्यांच्या सहकारी वा अन्य संस्थांमध्ये जे काही गैरव्यवहार व भ्रष्टाचार केलेला आहे, तो पाठिशी घालून कायदेशीर कारवाई टाळण्याचे आश्वासन दिले जात आहे. म्हणजे एक प्रकारे सगळ्या चोरांना व भ्रष्ट मंडळींना अभय देऊन पुन्हा त्यांचे सत्तेत पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम भाजप-सेनेने आखला आहे. या रस्सीखेचीत सेनेपेक्षा भाजप जास्त आक्रमक व आघाडीवर आहे. कारण त्यांना आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला लाथ घालून बाहेर काढायचे आहे. भाजप आणि सेनेचे काही नेते 'युती होणारच' असे जोरजोराने ओरडून सांगत असले तरी भाजपच्या आतल्या गोटातून शिवसेनेबरोबर युती करायची नाही आणि आयत्या वेळी जागा वाटपावरून फिसकटले असे कारण दाखवून स्वतंत्रपणे लढण्याची तयारी करण्याचे ठरले आहे. त्या दृष्टीने राजकारणाच्या पाऊलांचा एक भाग म्हणून भाजपने जिथे जिथे त्यांना सक्षम प्रभावी व विजयी होऊ शकणारे उमेदवार उपलब्ध नाही तिथे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमधून नेते आयात करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

## सुरुवातीचे



शिवसेनेचे नेतेही आदित्य ठाकरे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्याची भाषा जाहीरपणे बोलून त्यांना या विधानसभा निवडणुकीत उभे करण्याच्या तयारीला लागले आहेत. या दृष्टीने मुंबईतील वरळी, यवतमाळमधील दिग्रस आणि परभणी या तीन विधानसभा मतदारसंघाची चाचपणीही करण्यात आलेली आहे. तसे विधान खुद्द आदित्य ठाकरे यांनी देखील केलेले आहे. त्यामुळेच महाराष्ट्रभर आदित्यला मुख्यमंत्री म्हणून प्रोजेक्ट करण्यासाठी 'जनादेश' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनेचीही स्वबळावर सत्ता काबीज करण्याची आकांक्षा व सुप्त मनिषा लपून राहिलेली नसल्यामुळे संधी मिळेल तिथे उद्धवजी व शिवसेनेचे नेते भाजप सरकारवर स्वतः सत्तेत राहून टीकेची झोड उठवित आहेत. म्हणजे एक प्रकारे विरोधी पक्षाची भूमिकाही बजाविण्याचे नाटक शिवसेना वठवित आहे. जनता हे न कळण्याइतकी अज्ञानी व मूर्ख आहे असे कोणी समजू नये. भाजप ज्या पद्धतीने विरोधी पक्षातले नेते ओढून घेत आहे, त्यामुळे त्यांचा पक्ष काँग्रेसमय झाला असून, आता त्याचे नाव 'भाजप-काँग्रेस' असे करण्याची वेळ आली आहे. या आयात नेत्यांच्या गर्दीमुळे मूळ भाजपातल्या कार्यकर्त्यांचा श्वास गुदमरू लागला आहे. बाहेरून आलेल्या या नेत्यांना उद्या निवडणुकीची तिकिटे मिळणार, पदे मिळणार आणि आपल्याला मात्र आयुष्यभर सतरंज्याच घालाव्या लागणार आणि फलक चिकटावे लागणार या भीतीने व चिंतेने पक्षाचे जुने व सच्चे कार्यकर्ते चिंताग्रस्त झाले आहेत. राजकारणात तत्त्व, विचार, बांधीलकी, आपुलकी म्हणून ज्या काही गोष्टी असतात, त्या सर्वांना हरताळ या 'आयाराम-गयारामां'मुळे फासला जात आहे.

# भाजपची घराणेशाही

राजकारणातली घराणेशाही हा काही आजच नव्याने पुढे आलेला विषय नाही. स्वातंत्र्यापासून या विषयाची चर्चा सातत्याने चालू आहे. स्वातंत्र्याच्या पूर्व काळात काँग्रेस हाच देशातला एकमेव प्रमुख पक्ष होता आणि मुख्य म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी ब्रिटिशांविरुद्ध प्रखरपणे जीवाची बाजी लावून व सर्वस्वाचा त्याग करून लढणाऱ्या ध्येयवादी, विचारी व सुशिक्षित कार्यकर्त्यांची संघटना होती. काँग्रेसचे नेते हे सुरुवातीपासूनच वेगवेगळ्या धर्मातले असल्यामुळे धर्म, जात, संप्रदाय अशा संकुचित विचारात काँग्रेस कधीच अडकली नाही. काँग्रेसमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नेतृत्व पुढे आणले. नेहरूंच्या नंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यांच्या निधनानंतर इंदिरा गांधी, राजीव गांधी ही परंपरा पुढे चालत राहिली. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान झाले तेव्हा ही घराणेशाहीची परंपरा खंडीत झाली.

काँग्रेसच्या घराणेशाहीबद्दल बोलणारे नेते व लोक कळत-नकळत किंवा जाणीवपूर्वक विरोधी पक्षातल्या घराणेशाहीकडे दुर्लक्ष करतात किंवा कानाडोळा करतात. त्याबद्दल चकार शब्दही बोलत नाहीत. भारतीय जनता पक्षात किंवा त्यांना पाठिंबा देणाऱ्या पक्षांमध्ये घराणेशाही नाही का? ओरिसाचे आज मुख्यमंत्री असलेले नवनीत पटनाईक यांचे वडील बिजू पटनाईक ओरिसा राज्याचे बरीच वर्षे मुख्यमंत्री होते. महाराष्ट्रातली उदाहरणे बघायची झाली तर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचाही उल्लेख करावा लागेल. त्यांचे वडील गंगाधरपंत फडणवीस हेही आमदार होते. म्हणजे देवेंद्र यांना काहीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती असे म्हणता येत नाही. नाथाभाऊ खडसे यांनी तर घरदार नकटं पोर राजकारणात आणले आहे हे आपण सगळेजण रोज उघड्या डोळ्यांनी पाहतो आणि भाजपाने खडसेंच्या घरातील लोक वेगवेगळ्या पदांवर नेमून घराणेशाहीला मान्यताच दिली आहे हे कसे विसरता येईल.

नाथाभाऊंच्या पत्नी या 'महानंदा' च्या अध्यक्षा आहेत. त्यांची सून रक्षा ही खासदार आहे आणि एक मुलगी जळगाव जिल्हा सहकारी बँकेची अध्यक्ष आहे. मंत्री व खासदार असलेल्या व भाजपचे प्रदेशाध्यक्ष राहिलेले रावसाहेब दानवे यांचे पुत्र व जावई ही आमदार आहेत. नारायण राणे यांचे एक पुत्र आमदार आहेत तर एक खासदार होते. शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धवजींनी आता मुलगा आदित्य याला राजकारणात पुढे आणून यावेळी निवडणुकीच्या रिंगणात उतरवायचे ठरविले आहे. त्यासाठीच जनादेश यात्रा काढली आहे. विखे घराणे देखील यात मागे नाही. अनेक कोलांट्याउड्या मारून सत्तेच्या वळचणीला सातत्याने राहण्याचा प्रयत्न विखे घराण्याने केलेला आहे. तो आपल्याला कसा विसरता येईल. बाळासाहेब विखे बरीच वर्षे खासदार राहिले. नंतर काही काळ मंत्री राहिले. त्यांचे चिरंजीव राधाकृष्ण विखे बरीच वर्षे आमदार, मंत्री आहेत. त्यांच्या पत्नी सौ. शालिनी या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा आहेत आणि आता त्यांचेच चिरंजीव व डॉ. सुजय विखे हे भाजपच्या तिकीटावर खासदार झाले आहेत. भाजपात नुकताच प्रवेश केलेले मधुकर पिचड यांचे पुत्र वैभव आणि डॉ. पद्मसिंह पाटील याचें चिरंजीव राणा जगजितसिंग ही घराणेशाहीचीच उदाहरणे आहेत. त्यांची घराणेशाही भाजपला चालते आणि काँग्रेस-राष्ट्रवादीचीच मात्र का खुपते हा प्रश्न जनतेनेच त्यांना विचारायला हवा.

नेहरू-गांधी घराण्याने या देशासाठी जो त्याग व संघर्ष केला, हालअपेष्टा व दुःख सोसले, प्रसंगी कारावासही भोगला आणि देशाच्या एकात्मता व अखंडतेसाठी प्राणांचे बलिदानही केले. एवढा त्याग व सोशिकता भाजपातल्या एकाही नेत्याच्या घराण्याने कधी दाखविला आहे का? काँग्रेसने देश उभा करून सर्वांगीण विकास घडवून आणला. त्या आयत्या पिठावर रेघोटया ओढून जणू काही देशात ७० वर्षांत काहीच झाले नाही. सगळा विकास मागच्या पाच वर्षांत झाला आहे असा खोटा व ढोंगी आव मोदी व भाजप नेते आणीत आहेत. जनतेने सत्य समजून घेतले पाहिजे. घराणेशाही ही सगळ्यात पक्षात आहे आणि तिला आपणच मान्यता दिलेली आहे. आपणच नेत्यांची मुले-बाळे व नातेवाईक निवडून देतो. त्यामुळे त्याविरुद्ध ओरडण्याचा अधिकार आपण गमावून बसलो आहोत.

खरे पाहता पक्ष चालविणाऱ्या प्रमुख नेत्यांनी अंतर्मुख होऊन कार्यकर्त्यांचाही विचार केला पाहिजे. चांगले, ध्येयवादी, प्रामाणिक व सत्शील, मेहनती कार्यकर्ते अजूनही सर्व पक्षांमध्ये कार्यरत आहेत. कदाचित त्यांच्याकडे सत्ता, संपत्ती आणि पैसा नसेल म्हणून ते मागे पडत असतील तर त्यांना वेगळ्या पद्धतीने ताकद देऊन राजकारणात पुढे नेण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला पाहिजे. पूर्वीच्या काळातील जुन्या जाणत्या नेत्यांनी या पद्धतीने काम करून राजकारणात अनेक चांगले लोक उभे केले.त्याच दिशेने आत्ताच्या नेत्यांनीही काम केले पाहिजे, अशी अपेक्षा बाळगली तर ते चुकीचे ठरू नये.

**प्रबंध संपादकीय**



# पंतप्रधानांचे स्वातंत्र्यदिनाचे भाषण शेतकऱ्यांच्याच मुळावर

आपल्या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट, 2019 रोजी म्हणजे 73 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीतील लाल किल्ल्यावरुन राष्ट्राला उद्देशून 92 मिनिटांचे जे भाषण केले त्यातील शेती, शेतकरी, ग्रामीण विकास, पाणी आणि दूधधंदा यांच्याशी संबंधित असणाऱ्या पाच ठळक गोष्टींचा येथे परामर्श घेणार आहे. मा. पंतप्रधानांची अपेक्षा आणि देशातील सध्याची वस्तुस्थिती यांचा विचार करता हे भाषण किती वरपांगी, उथळ व फार गांभीर्याने विचार व चिंतन न केलेले होते हेच या विश्लेषणातून आपल्या निदर्शनास येईल. हे विश्लेषण पक्षीय दृष्टीकोनातून, पूर्वग्रहदूषितपणा बाळगून किंवा विरोधाला विरोध म्हणून केलेले नाही. सामान्य शेतकऱ्यांच्या नजरेतून तटस्थपणे केलेले हे विश्लेषण आहे एवढी पक्की खूणगाठ आपण मनाशी नक्की बाळगा.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणातील पाच ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे :

1) प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे बंद करायचा. त्याऐवजी कापडी वा ज्यूटची पिशवी वापरायची. देशाच्या कानाकोपऱ्यात कचरा म्हणून पडलेले प्लॅस्टिक गोळा करुन जाळून टाकायचे.

2) देशातील रासायनिक खते आणि रासायनिक औषधांचा वापर हळूहळू 25 टक्क्यांपर्यंत कमी करायचा. शक्यतो वापर पूर्णपणे बंद करायचा व नैसर्गिक किंवा झिरो बजेट शेतीकडे जायचे.

3) जलजीवन मिशनवर सरकार काम करणार असून त्यासाठी साडेतीन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल.

4) 2022 पर्यंत भारताची अर्थव्यवस्था पाच लाख ट्रिलीयन डॉलर्सची करायची आहे आणि

5) छोटे कुटुंब ठेवणे ही देशभक्तीच आहे.

1) प्लॅस्टिक हे प्रदूषण वाढविणारे व पर्यावरणाचा नाश करणारे आहे असे सर्वांचे म्हणणे आहे. एकदम मान्य. आता प्रश्न उभा राहतो प्लॅस्टिकचा शोध का लागला असेल? त्याची त्या वेळी गरज का निर्माण झाली? मध्यंतरी जगभर प्लॅस्टिकचे युग आले. बहुतांश वस्तु प्लॅस्टिकपासून बनल्यात. त्या सर्व आज टाकावू झाल्या आहेत का? या प्लॅस्टिकला पर्याय म्हणून आपण काय देणार आहोत? तो पर्याय आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरणारा, किती काळ चालणारा (आयुष्य किती?) आणि आरोग्याला अपायकारक नसणारा आहे का? याचा विचार करणार की नाही? प्लॅस्टिक कुजत नाही आणि जाळले की त्यातून जो वायू बाहेर पडतो त्यामुळे घाण वास पसरुन प्रदूषण होते याचा अनुभव आपण सारेजण वर्षानुवर्षे घेत आहोत. यावर काही पर्यायी उपाय शोधण्याचा प्रयत्न का झाला नाही? का उपायच मिळत नाही? प्लॅस्टिक कचऱ्यापासून पेट्रोल तयार करण्याच्या प्रयोगांचे काय झाले? ज्यांनी याचे प्रकल्प उभे केले ते का यशस्वी झाले नाहीत? या व यांसारख्ये असंख्य

## संपादकीय



प्रश्न लोकांच्या मनात आहेत. त्यांची उत्तरे कोण व कधी देणार? आणि याला समाधानकारक पर्याय देण्याची जबाबदारी कोण घेणार?

अगदी पहिला साधा प्रश्न दूधाच्या पिशवीचा आहे. 30-40 वर्षांपासून लोकांना दूध पुरविण्यासाठी प्लॅस्टिकची पिशवी वापरली जात आहे. 1977-78 च्या सुमारास काचेच्या बाटल्या वापरायचे. पण त्या बाटल्या फुटण्याचे प्रमाण मोठे होते. काचा दूधात पडायच्या. त्यानेही आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले होते. आता सरकारने नियम केला आहे की प्लॅस्टिकच्या पिशवीचे वजन व त्यासाठी वापरले जाणारे प्लॅस्टिक हे 50 मायक्रॉनपेक्षा जास्त असले पाहिजे. कुठल्याही व कितीही वजनाचे प्लॅस्टिक घेतले तरी ते कुजत नाही; जाळले की इथिलीन ऑक्साईड आणि कार्बन बाहेर पडतो. तो आरोग्याला घातकच असतो. मग प्रश्न उभा राहतो या प्लॅस्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कोणाची? महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत या सर्वांनी हे प्लॅस्टिक व्यवस्थितपणे गोळा करायला नको काय? त्यासाठी लोकशिक्षण वा प्रसंगी कडक नियम व दंड करुन लोकांना एका ठिकाणी, कचरापेटीत हे प्लॅस्टिक आणून टाकाची सवय लावायला नको का? लोकशिक्षण यात महत्त्वाचे आहे की नाही? ते काम कोण करणार? त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागे न लागते थेट पिशव्या बंद करा हे म्हणणे कितपत संयुक्तिक आहे? एक वेळ किराणा माल कापडी किंवा ज्युटच्या पिशवीतून नेता येईल. पण दूध, तेल, तूप पिण्याच्या पाण्याचे पाऊचेस यांचे काय करायचे? वाहन उद्योग, टायर निर्मिती, फर्निचर जवळपास घरातल्या 80 टक्के वस्तू प्लॅस्टिकच्या आहेत. त्याचे काय करणार? प्लॅस्टिक पिशव्यांना योग्य पर्याय न देता त्या एकदम बंद करणे म्हणजे शेतकऱ्याला ठार मारण्यासारखेच आहे.


दूध पुरवठा करणारे संघ, संस्था, डेअऱ्या, कंपन्या या शेतकऱ्यांकडून सुट्टे दूध एकत्र करतात. ते प्लॅन्टमध्ये आणून, त्यावर प्रक्रिया करुन प्लॅस्टिकच्या पाऊशेर, अर्धा लिटर, एक लिटरच्या पिशवीतून ग्राहकांना उपलब्ध करुन देतात. पिशवी 50 मायक्रॉनच्या वर असली पाहिजे हा नियम होण्यापूर्वी बरेच संघ व उद्योजक 40-45 मायक्रॉनच्या पिशव्या वापरायचे. आता कोल्हापूरचा गोकुळ दूध संघ 54 मायक्रॉनची तर पुण्यातील कात्रज दूधसंघ 55 मायक्रॉनची प्लॅस्टिकची पिशवी दूध भरण्यासाठी वापरतो. 90 टक्के दूध हे प्लॅस्टिक पिशवीत पॅक करुनच विकले जाते. फक्त 10 टक्के दूध, जे निरनिराळे पदार्थ बनविण्यासाठी वापरले जाते ते टँकर वा इतर भांड्यातून पुरविले जाते. प्लॅस्टिकचे आयुष्य 500 वर्षांचे असते असे सांगितले जाते. शेती सिंचनासाठी जो एचडीपीई पाईप वापरला जातो त्याचे आयुष्य शंभर वर्षे, पीव्हीसी पाईपाचे 50 वर्षे आणि लोखंडी व सिमेंट पाईपाचे आयुष्य 25 ते 30 वर्षांचे असते. प्लॅस्टिकच्या पाईपाला 50-100 वर्षे काहीही होत नाही. लोखंडी आणि सिमेंटचे पाईप मात्र सतत पाणी वाहिल्याने आतून गुळगुळीत होतात. झीज होते, गंजतात. पहिल्या वर्षी जेवढे पाणी पाईपातून मिळत होते तेवढे पाणी पाच-सात वर्षानंतर मिळत नाही. हळूहळू ते कमी होत जाते पण वीजेचा खर्च मात्र वाढत जातो. पीव्हीसी, एचडीपीई किंवा प्लॅस्टिकच्या पाईप वापरल्याने काहीच नुकसान होत नाही. तरीदेखील आम्ही व विशेषतः धोरणकर्ते व राज्यकर्ते अजूनही बदलायला तयार नाहीत. आजही ते सिंचनाच्या, सांडपाणी वाहून नेण्याच्या किंवा पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांमध्ये लोखंडी आणि सिमेंटचेच पाईप वापरण्याचा आग्रह का धरतात हे न उलगडलेले कोडे आहे. कदाचित आर्थिक हितसंबंधातून जर हे घडत असेल तर देशाच्या चौकादाराने 'न खाऊंगा, न खाने दूँगा' ही जी घोषणा केली तिचे काय झाले? चौकीदाराच्या व त्याचे जर काही प्रामाणिक सहकारी असतील तर त्यांच्या हे का लक्षांत येत नाही? का सगळ्यांनीच मिळून फक्त शेतकऱ्यालाच मारण्याचे ठरविले आहे? शेतकरी अगोदरच अडचणीत आहे. कसेबसे दूध विकून तो प्रपंच चालवितो आहे. उद्या दूध डेअऱ्या व संघांनी प्लॅस्टिक बंदीमुळे जर त्याचे दूध स्वीकारले नाही तर उत्पादित केलेल्या एवढ्या दूधाचे शेतकरी काय करेल? त्याला मूळापासूनच संपवून टाकायचे आहे का? शहरी लोकांना त्यांच्या अडचणी सोडविता येत नाहीत म्हणून त्याचे खापर ग्रामीण भागावर, शेतकऱ्यांवर फोडणे आणि त्यांना आणखीन संकटात ढकलणे कितपत न्याय्य आहे? ऑस्ट्रेलिया, नेदरलँड, अमेरिका किंवा इतर अनेक प्रगत देशात दूध भरण्यासाठी टेट्रापॅक, कार्डबोर्ड, कार्टन्स यांचा वापर करतात. हे पुठ्ठे, जाड कागद तयार करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचाच वापर होतो ना? हे कार्डबोर्डचे बॉक्सेस प्लॅस्टिक पिशवीला पर्याय ठरु शकतील का? कार्डबोर्डमध्ये द्रवपदार्थ काही प्रमाणात शोषले जातात. ते पुठ्ठे मग ओले होतात. टेट्रापॅक हा पर्याय म्हणून कदाचित योग्यही ठरेल. पण ते अर्थशास्त्रात बसणार आहे का? त्याचा खर्च प्लॅस्टिकच्या पिशवीपेक्षा जास्त येतो असे जाणकार सांगतात. मग खर्चाचे गणित कसे बसवायचे?

आज दूध, तेल, तूप तर सोडाच पण कुठल्याही हातगाडीवर, स्टॉलवर गेलात तर फळांचा रस, वेगवेगळ्या प्रकारची सांबर, रस्सम, आमटी वा सोलकढी सारखे द्रवरुप खाद्यपदार्थ एवढंच काय पण

## जगभर प्लॅस्टिकचा सर्रास वापर




जगातील सर्व विकसीत देशांमधील मोठमोठ्या मॉल व दुकानांमधून सगळा भाजीपाला, किराणा माल, फळे ग्राहकांना प्लॅस्टिकच्या पिशवीमध्येच पॅक करुन दिली जातात. फिलीपाईन्ससारखा देश आपल्यापेक्षा गरीब आहे. तिथेही लाखो टन प्लॅस्टिक रोज बाहेर पडते. पण त्यांनी त्याची विल्हेवाटीची उत्तम व्यवस्था केलेली आहे. त्यांना जमते मग आम्हांला का जमत नाही हा खरा सवाल आहे. फिलीपाईन्समधली डवाव, पनाबो, टगून, मकाटी ही रस्त्यावरची मोठी शहरे आहेत. सगळ्या मॉल व दुकानांमध्ये सर्रास प्लॅस्टिकचा वापर आहे. अगदी चप्पल, बेल्ट यांसारख्या वस्तु घेतल्या तरी त्या प्लॅस्टिक पिशवीतच देतात. पण रस्त्यावर कुठेही एकही पिशवी पडलेली दिसत नाही. ती लोक व्यवस्थितपणे व शिस्तीने कचरा पेटीत नेऊन टाकतात. अशी शिस्त लोकांना सरकार केव्हा लावणार? आपल्याकडचे शेतकरी मागील दहा वर्षांपासून भेंडी, वांगी, मिरची, गवार, दोडके, दूधीभोपळा यांसारखा भाजीपाला दहा किलोच्या प्लॅस्टिक पिशव्या भरुन बाजारात पाठवितात. या पिशव्या मऊ, निर्जंतुक केलेल्या असतात. त्यामुळे माल त्यात चांगला ताजातवाना राहतो. तो खराब होत नाही. पावसाने भिजत नाही. सडत नाही. आता शेतकऱ्याला सोयीची असणारी ही प्लॅस्टिकची पिशवी बंद करुन सरकारला कुणाचे कल्याण करायचे आहे?



## केवढा हा विरोधाभास

ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्लॅस्टिकला बंदी घालण्याच्या निमित्ताने गुजरातमध्ये गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. मुख्यमंत्री विजय रुपानी यांच्यासह गुजरात मंत्रीमंडळातील अनेक मंत्री, भाजपचे पदाधिकारी व पक्ष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेत प्लॅस्टीक बंदीचा निर्णय कसा देशाच्या हिताचा आहे आणि त्यामागे पंतप्रधान मोदी यांची केवढी मोठी विशाल दृष्टी आहे अशी आरती ओवाळणारी भाषणे झाली. भाषणे करुन आणि ऐकून हजारो उपस्थितांना तहान लागली. व्यासपीठावरच्या नेत्यांना प्लॅस्टिकच्या बाटलीतूनच पाणी देण्यात आले. पण व्यासपीठाखालच्या कार्यकर्त्यांना व श्रोत्यांना कोण पाण्याच्या बाटल्या देणार? बरं, पाणी नाही दिलं तर त्या रणरणत्या, तळपत्या उन्हात कोण बसणार? म्हणून मग सर्वांना पिण्याचे पाणी प्लॅस्टिकच्या पाऊचेस मधून वाटण्यात आले. लोकांनी पाणी पिऊन झाल्यावर प्लॅस्टिकचे पाऊच त्या मैदानातच टाकून दिले. हे पाऊचेसही मोठमोठ्या प्लॅस्टिकच्या निळ्या जाड पिशव्यांमधूनच आणण्यात आले होते. सभा संपल्यावर सगळा प्लॅस्टिकचा ढीगारा, मैदानावर पडलेला लोकांना दाखविण्याचा मोह इलेक्ट्रॉनिक्स चॅनेलवाल्यांना आवरला नाही. प्लॅस्टिक बंदीसाठी झालेल्या सभेतच प्लॅस्टिकचा किती वापर झाला आणि ती घाण भाजपवाल्यांनी मैदानावरच कशी टाकली याची दृश्ये त्यांनी चॅनेलवरुन दाखविली. आता याला काय म्हणायचे? केवढा हा विरोधाभास !

गरमागरम चहा, कॉफीसुद्धा प्लॅस्टिकच्या पिशवीतून दिली जाते. लोकांना हे सगळे पातळ पदार्थ प्लॅस्टिकच्या पिशवीतून घरी वाहून नेणे सोयीस्कर, कमी खर्चाचे आहे. यासाठी काचेची, स्टीलची किंवा कोणत्याही धातूची भांडी सतत सोबत ठेवणे, बरोबर घेऊन जाणे शक्य आहे का? प्रापंचिक व संसारी माणसांच्या अडचणीआपण लक्षांत घेणार की नाही? ज्यांना रोज दुकानात जाऊन बाहेरुन विकत या पातळ व द्रवरुप वस्तु आणाव्या लागत नाहीत त्यांना प्लॅस्किचा वापर व त्याचे महत्व कसे आणि कधी लक्षात येईल? प्लॅस्टिकवर बंदी आणून ही सगळी इंडस्ट्री बंद करायची. तिथल्या कर्मचाऱ्यांचा रोजगार घालवून त्यांना बेकार करायचे. मग दुसऱ्या धंद्याला चालना द्यायची. असले उपद्व्याप करण्यापेक्षा सर्वांचा समग्र विचार करणारे सम्यक धोरण स्वीकारायला नको का? एकारणेच्या एकांतिक बनलेल्या भाषणाने कुणाचे कल्याण होणार आहे? तेव्हा मा. पंतप्रधानांनी प्लॅस्टिकवर बंदी घालण्याची भाषा करण्यापूर्वी त्याला समर्थ पर्याय ठरु शकेल अशा मार्गांचे व उपायांचे सूतोवाच जर केले असते तर ते अधिक योग्य व समर्थनीय झाले असते. रोज जगभर दौरा करणाऱ्या पंतप्रधानांना परदेशातील प्लॅस्टिकचा वापर दिसत नाही का? निव्वळ बंदीची भाषणे काय करता! आधी लोकशिक्षण करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना शिस्त लावून काम करायची सवय लावा.

## झिरो बजेट शेती

जगात कुठेही बिनपाण्याची जशी शेती होत नाही तशी बिन खर्चाची देखील शेती होत नाही. नैसर्गिक वा सेंद्रीय शेतीला देखील काही ना काही खर्च करावाच लागतो. रासायनिक व आधुनिक हायटेक शेती तर उच्च तंत्रज्ञानाने भारलेली आणि मोठ्या भांडवली खर्चाची आहे. शेतीत काहीच खर्च न करता पीक येईल व तेही मोठ्या प्रमाणावर अशी अपेक्षा करणे हा मूर्खपणा आहे. असे प्रत्यक्षात कधीही होऊ शकणार नाही. ज्या पद्मश्री सुभाष पाळेकरांनी ही झिरो बजेट शेतीची संकल्पना नीती आयोगासमोर मांडली त्या खुद्द पाळेकरांची परभणी जिल्ह्यातली शेतीही झिरो बजेट नाही, नैसर्गिक वा सेंद्रीय नाही; किंबहुना गेल्या कित्येक वर्षांपासून ते स्वतः शेती कसतही नाहीत. त्यांनी त्यांची शेती बटईने दुसऱ्याला कसायला दिली आहे. आणि ते लोक रासायनिक खतांचा वापर करीत आहेत. म्हणजे संमिश्र शेती करीत असल्याचे नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. ज्या पाळेकरांनी झिरो बजेट शेती ही संकल्पना मांडून संपूर्ण देशाला मूर्ख बनविले त्या पाळेकरांना मोदी सरकारने या कामाबद्दल 'पद्मश्री' बहाल करणे हा देखील केवढा मूर्खपणा आहे? या झिरो बजेट शेतीवर देशातील सर्व कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, संशोधक, तज्ज्ञ आणि कृषी खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी टीका केल्यानंतर स्वतः पाळेकरांनी त्यांच्या वेबसाईटवरुन झिरो बजेट हे नाव काढून टाकले आणि डॉ. सुभाष पाळेकर नैसर्गिक शेती असे नामकरण केले आहे. डॉ. सुभाष पाळेकरांनी नाव बदलले तरी सरकारला नाव बदलण्याची बुद्धी होत नाही उलट अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारामन यांना अर्थसंकल्प सादर करताना व पंतप्रधानांना लाल किल्ल्यावरुन भाषण करताना झिरो बजेट शेतीचा उल्लेख करावासा वाटणे हे देशाचे दुर्दैव आहे असेच म्हटले पाहिजे. मोदी सरकार सतत शेतकऱ्याला मातीत घालण्याच्या आणि त्याचे वाटोळे करण्याच्या का मागे आहे हे न उलगडलेले कोडे आहे. शेतकऱ्याला कसलेही अनुदान आणि नुकसानभरपाई व मदत द्यायला लागू नये म्हणून तर सरकारने हे झिरो बजेट

शेतीचे भूत उभे केले नसावे ना अशी शंका अनेकांच्या मनात येऊ लागली आहे.

झिरो बजेट, नैसर्गिक वा सेंद्रीय तुम्ही काहीही नाव द्या, या शेतीमध्ये देशाला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करण्याची, मोठ्या प्रमाणावर शेतमाल निर्यात करुन परकीय चलन मिळविण्याची, उत्पादन व उत्पादकता वाढवून शेतकऱ्याची आर्थिक उन्नती करण्याची अजिबात ताकद नाही. स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः पहिल्या हरितक्रांतीनंतर खूप महत्प्रयासाने आपण रासायनिक खते व औषधांचा वापर, संकरीत बी-बियाणांचा वापर, बियाणे बदलाचा दर वाढविणे, सिंचन सुविधा वाढविणे यांसारखे उपक्रम मोठा खर्च करुन राबविले. त्यामुळे 72 वर्षांत आपण अन्नधान्य उत्पादनात 50 दशलक्ष टनांवरुन 265 दशलक्ष टनांवर जाऊन पोहोचलो आहोत. अन्नधान्यात स्वयंपूर्ण होऊन जगातील 25 देशांना धान्य निर्यात करु शकलो आहोत. झिरो बजेट शेतीने ही देशाची स्वयंपूर्णता तर खलास होईलच. पण अगोदरच शेतीच्या क्षेत्रात मागास असलेला देश म्हणून आपली जगभर जी गणना होत होती ती आणखीन किती रसातळाला जाईल याची कल्पनासुद्धा करवत नाही. मोदीजी, नोटबंदी आणि जीएसटी लागू करुन देश तुम्ही जो संकटाच्या खाईत लोटला आहे त्याने तुमचे समाधान झाले नाही काय? आता देशातला प्रत्येक माणूस तुम्हाला भिकेला लावून या भिकाऱ्यांचे अनभिषिक्त सम्राट म्हणून मिरवायचे आहे काय? कसली दळभद्री स्वप्ने पाहतांय आणि कसल्या वांझोट्या योजना लागू करताय? जग कुठे चाललंय ते पाहा. फिनलंडमध्ये एकेक लाल भोपळा (डांगर) 912 किलोचा निघतोय. नेदरलँडमध्ये टोमॅटोची उत्पादकता 600 टनांवर गेली आहे. व्हिएटनामची भाताची हेक्टरी उत्पादकता 10 ते 12 टनांवर गेली आहे. आमची अजून 2 ते 2.5 टनांवरच आहे. उत्पादन व उत्पादकता वाढवून उत्पादन खर्च कमी करण्याचे आणि जागतिक बाजारपेठेतील शेतीमाल निर्यातीचे युद्ध सक्षमपणे लढून जिंकण्याचे स्वप्न उराशी न बाळगता झिरो बजेटसारख्या फालतू, अर्थहीन कल्पना मांडून सरकार कुणाचे कल्याण करायला निघाले आहे? जरा डोळे उघडून बघा !

देशातला कृषी विकासाचा दर 5.1 टक्क्यांवरुन 2 टक्क्यांवर आला आहे. पूर, दुष्काळ, ग्लोबल वॉर्मिंग, वादळे यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेती आणि शेतकरी संकटात सापडलेला होता. त्यात नोटबंदीच्या निर्णयाने त्याला पुरते मारुन टाकले. महागाई वाढू द्यायची नाही या नावाखाली शेतकरी पुरता दाबून टाकला. त्याच्या कुठल्याच मालाला उठाव नाही आणि भावही नाही. त्यामुळे उत्पादन खर्चही निघेनासा होऊन कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या भाजपा सरकारच्या काळात झालेल्या आहेत. झिरो बजेट शेती जर पैशाविना होते तर अर्थसंकल्पात या शेतीसाठी 325 कोटी रुपयांची तरतुद अर्थमंत्र्यांनी का केली याचे उत्तर कोण देणार? मुख्य पिकात एक आंतरपिक घ्यायचे. ते विकून जे पैसे मिळतील त्यातून मुख्य पिकाचा खर्च वसूल होईल व काहीही खर्च न करता मुख्य पिक पदरात पडेल याला झिरो बजेट शेती असे म्हणण्याचा आगावूपणा सरकार पाळेकरांच्या नादाने करीत असेल तर दोघांचेही डोकं एकदा तपासून पाहिलेच पाहिजे. एकीकडे झिरो बजेट म्हणायचे आणि दुसरीकडे अर्थसंकल्पात रासायनिक खतांच्या अनुदानासाठी 9500 कोटींची तरतूद करायची, एवढेच नव्हे तर अर्थसंकल्पानंतरच्या दुसऱ्या आठवड्यात पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची बैठक घेऊन ही रासायनिक खतांवरील सबसिडी वाढवायची याचा अर्थ काय समजायचा? गेल्या 70-72 वर्षांत शास्त्रज्ञ, शेतकरी, संशोधक, विविध संस्था व कंपन्या आणि खुद्द सरकारने जे अथक परिश्रम घेऊन व मोठी मेहनत करुन कृषिक्षेत्राचा विकास केला तो पुन्हा मागे नेऊन घड्याळाचे काटे उलटे फिरवायचे काम सरकार का करीत आहे? यात कुणाचेच भले नाही. अशा चुकीच्या निर्णयांनी शेती आणि शेतकऱ्यांचे तर वाटोळे होईलच पण देशही पूर्णपणे रसातळाला जाईल याचे भान सरकारने ठेवले पाहिजे.

## जलजीवन मिशन

देशाला पाणी मिळण्याचे पाऊस आणि वितळणारे बर्फ हे दोन मार्ग आहेत. पाऊस हा त्यातला सर्वात महत्त्वाचा घटक आहे. बर्फाचे पाणी (हिमालयीन पेनीनसुला) हे काही राज्यांपुरतेच सिमित आहे. त्यामुळे पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब न् थेंब अडविणे, मुरविणे, जिरविणे आणि साठविणे हे जास्त महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने मोठ्या, मध्यम व लहान धरणांची बांधणी व उभारणी आणि पाणलोट विकास कार्यक्रम याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर पाण्याचा काटकसरीने, मोजून व शेतीसाठी ठिबक, तुषार, सबसरफेस, रेनगन यांसारख्या अत्याधुनिक तंत्राचा वापर होणेही आवश्यक आहे. परंपरागत प्रवाही पद्धतीने कॅनॉल व चाऱ्यांमधून पाणी वाहून नेण्याची पद्धत आता बदलायला हवी. यात खूप पाणी बाष्पीभवन, भूगर्भात पाझरणे व इतरत्र जाणे यामुळे वाया जाते आणि आपली सिंचनाची कुशलता 30 ते 35 टक्क्यांवर राहते. वास्तविक पिण्याच्या पाण्याची गरज फक्त 5 टक्के, उद्योगधंद्याची गरज 10 टक्के आहे आणि उर्वरीत 85 टक्के पाणी शेतीला लागते आहे. पण सध्या वाढते शहरीकरण, नागरीकरण, लोकसंख्या वाढ आणि विकासाची कामे यामुळे शेतीचे पाणी दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. शिवाय पाण्याचे प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर वाढत चालले असून अनेक मोठ्या धरणातील पाणी लोकांना पिण्यालायक

व शुद्ध राहिलेले नाही. उदा. उजनी धरण, गोसीखुर्द धरण, पंचगंगा नदी. हे सर्व पीव्हीसी, एचडीपीई यांसारख्या पाईपांमधून वाहून नेऊन लोकांना पुरविणे गरजेचे आहे. सिमेंट व लोखंडाचे पाईप वापरण्यापेक्षा पॉलिइथिलीनचे पाईप वापरणे जास्त हिताचे व कमी खर्चाचे आणि दीर्घकाळ चालणारे आहे. याबाबतचे धोरणात्मक निर्णय सरकारने तातडीने घेणे गरजेचे आहे.

अनेक उद्योगधंदे एकदा पाणी वापरले आणि ते प्रदूषित झाले की नदी, नाले, ओढ्यात सोडून देतात. हे घाण दूषित पाणी सगळे चांगले पाणी खराब करते. याकरिता उद्योगांवर बंधने आणून त्यांना पाणी पुन्हा पुन्हा रिसायकल करुन व शुद्ध करुन वापरायला लावले पाहिजे. प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण मंत्री हे पैसे खाणारी व्यवस्था झाली आहे. त्यांच्याकडून पाणी शुद्ध होण्याची सुतराम शक्यता नाही. उद्योगधंदे आणि त्यांचे साटेलोटे माणसांना शुद्ध पाण्यापासून वंचित ठेवते आहे. जलजीवन सुजलाम् सुफलाम करायचे असेल तर केंद्र सरकारला काही कठोर धोरणात्मक निर्णय घ्यावे लागणार आहेत. ते घेण्याची तयारी मोदी सरकारने दाखविली पाहिजे. ते निर्णय पुढीलप्रमाणे :

१) भारताच्या राज्यघटनेत बदल करून 'पाणी' हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत घेतला पाहिजे किंवा 'कंकरंट' लिस्टमध्ये तरी घातला पाहिजे.

२) पाण्याचे राष्ट्रीयकरण करून ते राष्ट्राच्या मालकीचे केले पाहिजे. मनमानी वापर व उपसा बंद करून घनमापन पद्धतीने मीटर बसवून लोकांना मोजून पाणी दिले पाहिजे.

३) देशभर पाणी वाहून नेण्यासाठी इस्राईलच्या धर्तीवर नॅशनल ग्रीड केली पाहिजे. यासाठी लागणारा भांडवली खर्च खूप मोठा असून त्यासाठी जागतिक वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारणी केली पाहिजे व प्रत्येक कुटुंबावर पाणीपट्टी बसवून त्याला विकत पाणी दिले पाहिजे.

४) पुराचा वारंवार सामना कराव्या लागणाऱ्या व जास्तीचे पाणी उपलब्ध असलेल्या भागातील लोकांचे प्रबोधन व परिवर्तन करून पाण्याचे न्याय्य वाटप करण्यासाठी त्यांची मानसिकता तयार केली पाहिजे. तरच गंगा-कावेरी लिंक योजना अस्तित्वात येऊ शकणार आहे.

५) विकसनशील पुनर्वसन धोरण स्वीकारून आधी पुनर्वसन मग प्रकल्प या न्यायाने सर्व मोठे, मध्यम व लघु प्रकल्प कालबद्ध कार्यक्रम आखून पूर्ण केले पाहिजेत.

६) पाणलोट विकासाचा कार्यक्रम हा माथा ते पायथा (रिज टू बॉटम्) या तत्त्वावरती राबवून पाणलोटातील सर्व कामे एका वेळी सुरू करून पूर्ण केली पाहिजेत. तुकड्या तुकड्याने हा कार्यक्रम राबवू नये. या कार्यक्रमात लोकसहभागाची अपेक्षा ठेवू नये. नवीन यंत्रे व तंत्रे वापरून मेगा पाणलोट पूर्ण करावेत व पीकपद्धतीची शिस्त घालून सर्वांना ती कसोशीने पाळण्यास भाग पाडावे. नदीतला अनिर्बंध वाळू उपसा प्रथम बंद करावा. अन्यथा दुष्काळी भागातली शेती वाळवंटीकरणाकडे जाण्याची शक्यता अधिक आहे.

७) अती पाणी लागणारी पिके उदा. ऊस, केळी, ग्रीनहाऊस मधली फुले व भाजीपाला शेती, फळबागा यांना ठिबक संचाद्वारे तर तृणधान्ये उदा. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका आणि कडधान्ये व गळीत धान्ये यांना ठिबक व तुषार संचाद्वारे पाणी देण्याची सक्ती करावी. प्रवाही पद्धतीने शेतीला पाणी देणे बंद करावे. यासाठी ठिबक तुषार सिंचनाची सबसिडी वाढवून द्यावी. क्षेत्राची मर्यादा काढून टाकावी आणि सबसिडीचे पैसे तीन महिन्यांच्या आत शेतकऱ्यांना देऊन त्यासाठी अर्थसंकल्पात भरघोस तरतूद करावी.

८) जिथे पाण्याची खूपच टंचाई आहे व कोठूनही पाणी पोहोचविणे शक्य नाही अशा भागात समुद्र उपलब्ध असल्यास इस्राईलच्या धर्तीवर खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्याचे व उपसा जलसिंचन प्रकल्प उभे करावेत.

या व इतर सर्व कामांना ३.५० लाख कोटींची तरतूद पुरणार नाही. यासाठी आणखीन प्रचंड निधी लागेल. तो केंद्र सरकार कसा उभा करणार? हा प्रश्न आज अनुत्तरीत आहे. केंद्र सरकारची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. त्यात मंदीने थैमान घातले आहे. त्यामुळे जलजीवन मिशन कसे उभे व कार्यरत राहील हा प्रश्नच आहे.

## स्वप्न पाच लाख कोटी डॉलर्स अर्थव्यवस्थेचे

माणसांनी स्वप्ने जरूर पाहावीत. राज्यकर्त्यांना तर देश मोठा करण्याची व त्यासाठी निरनिराळ्या महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याची स्वप्ने रोज पडली पाहिजेत. पण त्या स्वप्नांना वास्तवाचा व व्यवहार्यतेचा आधार पाहिजे. **'अंथरून पाहून पाय पसरावेत'** अशी आपल्याकडे एक म्हण आहे. ते न पाहता पांघरले की त्याची ओढाताण होते आणि ती चादर मध्येच फाटते याचे नाव नियोजन. ते नीट जमले तर ठीक अन्यथा सगळा डोलारा कोसळतो. भारताची अर्थव्यवस्था २०२४-२५ सालापर्यंत पाच लाख कोटी डॉलर्सवर नेण्याचे स्वप्न पंतप्रधान मोदी यांनी बाळगून ते अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांना अर्थसंकल्पातून मांडायला लावले. स्वप्न वास्तवात उतरायचे असेल तर स्वप्न पाहणाऱ्यांचे पाय जमिनीला चिकटलेले असावे लागतात. म्हणजे वास्तवाचे भान त्यांनी प्रथम ठेवावे लागते. मोदींच्या सरकारचे पाय जमिनीलगत आहेत असे म्हणणे थोडे धाडसाचेच आहे. ते ज्या पद्धतीने अनेक निर्णय करताहेत त्यांचा अर्थव्यवस्थेवरील दूरगामी परिणाम कोणीच लक्षात घ्यायला तयार नाही. सरकारच्या विकासाच्या घोषणा प्रचंड

आहेत. रोज नवनवीन घोषणांचा पाऊस पडतो. पण प्रत्यक्षात अंमलबजावणी कुठे आहे? सरकारने अंमलबजावणी करू म्हटले तरी देशात तशी अनुकूल परिस्थिती नाही. आजचे देशाचे वास्तव चित्र तुम्ही सारे जण उघड्या डोळ्याने पाहताय.


आम्हांला नुसते अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढविण्यावर संतुष्ट राहायचे आहे की अर्थव्यवस्थेमध्ये जे जुनाट दोष व कमकुवत डोळे रुतलेले आहेत त्यावर औषधे शोधायची आहेत. यापैकी कुठला पर्याय निवडणार हा खरा मुख्य मुद्दा आहे. चिवट बनलेली बेरोजगारी, वाढती विषमता, कुंठित बनलेली शेती व ग्रामीण मागणी, विकासातला कमालीचा प्रादेशिक असमतोल, बदलत्या तंत्रज्ञानापायी नवीन रोजगार संधींवर येत असलेली गदा, पर्यावरणीय बदलांमुळे वाढत चाललेली पाणी आणि अन्नधान्याची असुरक्षितता हे सगळे भयानक प्रश्न आहेत. आपण अर्थव्यवस्था ५ लाख कोटी डॉलर्सची करण्याचे स्वप्न डोळयांसमोर ठेवून या वास्तवाकडे डोळेझाक करतोय ही कमालीची अक्षम्य चूक आहे.

देशात प्रचंड आर्थिक मंदी आहे. अनेक उद्योगधंदे बंद झाले आहेत. लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. उद्योगधंदे व व्यवसायात नव्याने गुंतवणूक होत नसल्यामुळे नवीन रोजगार निर्मिती होत नाही. बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढते आहे. प्रछन्न व छुपी बेकारी वाढते आहे. नोकऱ्या गेल्यामुळे कोट्यावधी लोकांचे संसार रस्त्यावर आले आहेत. अनेक उद्योजकांनी दिवाळखोरी जाहीर केली आहे वा कर्ज बुडवून परदेशात पोबारा केला आहे. कुठल्याही शेती वा औद्योगिक मालाला उठाव नाही. बाजारात ग्राहक नाही. खिशातून कोणी पैसा काढायला तयार नाही. देशाचा विकासदर मागील १० वर्षांत ८.२ टक्यांवरून ५ टक्क्यांवर आला आहे. जीएसटी कायद्यात ३०० वेळा बदल झाला आहे. कृषी विकास दर ५.१ टक्क्यांवरून २ टक्क्यांवर आला आहे. शेतकरी कर्जबाजारी झाल्याने त्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. शेतमालाला भाव नाही, उठाव नाही. बिल्डर्सने बांधलेली लाखो घरे पडून आहेत. त्यांना कोणी घेत नाही. बांधकाम क्षेत्रात पूर्ण मंदी आहे. अनेक बिल्डर पळून गेले आहेत, काही जेलमध्ये आहेत. काही आत्महत्या करण्याच्या स्थितीत आहेत. एकंदरी देशाची आर्थिक स्थिती अत्यंत भयावह आहे. अशा वेळी पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न मोदींनी भारतीय जनतेला दाखविले आहे. हे स्वप्न प्रत्यक्ष कृतीत उतरण्याची सुतराम शक्यता नाही. अर्थात असे खरे लिहिलेले मोदी आणि त्यांच्या अंध भक्तांना आवडणार नाही. परंतु सत्य हे क्वचित शुद्ध आणि कधीही साधे असत नाही. ते नेहमी कटू असतं. खरं बोललेलं कुणालाच आवडत नाही. पण सत्याची कास ज्यांनी धरली त्यांना असत्याचा कासरा हाती धरता येणार नाही. त्यामुळे स्पष्ट व नम्रपणे सांगावे लागेल की ५ ट्रिलीयन डॉलर्सची अर्थव्यवस्था हे मृगजळ आहे. ते कधीही वास्तवात उतरणार नाही.

## छोटे कुटुंब हे देशभक्ती

कुटुंब नियोजनाच्या विषयाबद्दल सर्व राजकीय पक्षांमध्ये सहमती आहे. पण त्याबद्दल स्पष्टपणे बोलण्याचे धाडस कुणीही दाखवित नाही. १९७५ च्या आणीबाणीत सक्तीने कुटुंब नियोजन करण्याचा जो काही कार्यक्रम झाला त्याचे परिणाम काँग्रेसने पुढच्या निवडणुकीत भोगले. तेव्हापासून या विषयावर सर्वांनी जे मौन धरले होते ते १५ ऑगस्टला पंतप्रधान मोदींच्या भाषणाने सुटले. **'छोटे कुटुंब ही देशभक्ती आहे'** असे विधान करून पंतप्रधानांनी अप्रत्यक्षरीत्या भविष्यात समान नागरी कायदा करून तो अंमलात आणण्याची अप्रत्यक्षरीत्या भाषा केली आहे आणि ते धोरणही कलम ३७० प्रमाणे लवकरच जाहीर होईल असे बोलले जाते. भारताची लोकसंख्या आज १३५ कोटींच्या आसपास गेली आहे. २०५० सालापर्यंत ती १५० कोटींच्या पुढे जाईल व कदाचित चीनला मागे टाकून भारत लोकसंख्येत प्रथम क्रमांकावर जाईल असे भाकीत व्यक्त झाले आहे. एवढी लोकसंख्या वाढू देणे हे देशाला परवडणारे नाही. कारण जो काही थोडा फार विकास होतो तो वाढती लोकसंख्या खाऊन टाकते. आज अनेक क्षेत्रातला विकास दर उणे आहे. अशा वेळी वाढत्या लोकसंख्येचा बोजा अर्थव्यवस्थेला न पेलवणारा आहे. त्यामुळे लोकसंख्येचा वेग कसा कमी करता येईल, या दृष्टीने पाऊले टाकणे गरजेचे आहे. पंतप्रधान मोदी यांनी कळत-नकळत का होईना त्याचे सुतोवाच केले याबद्दल त्यांचे करावे तेवढे अभिनंदन थोडे आहे. पण एवढ्यावरच थांबून जमणार नाही. त्यासाठी पुढची पाऊलेही गतीने व दमदारपणे टाकावी लागतील. लोकांनी देखील या चांगल्या निर्णयाचे स्वागत करून तो अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या निर्णयाला धर्माचा रंग देण्याचा प्रयत्न कृपा करून कोणीही करू नये. छोटे कुटुंब राहिले तर मुलाबाळांचे चांगले संगोपन, पोषण व शिक्षण होऊ शकते.त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे पालकांना लक्ष देणे सुकर होते. चांगली शिक्षित व संस्कारी पिढी घडली तर त्याचा फायदा राष्ट्राच्या उन्नतीलाही होतो. ज्ञान, माहिती व तंत्रज्ञानाचा आज जो जगभर विस्फोट झाला आहे त्यामुळे प्रगतीची नवनवीन दालने उपलब्ध होत आहेत. जगभर भारताचा नावलौकिक संगणकीय युगामुळे आय.टी. व इतर क्षेत्रात झालेला आहे. अजूनही विकासाचा खूप लांबचा पल्ला गाठून अर्थव्यवस्था आपल्याला मजबूत करायची आहे. त्यासाठी छोटे कुटुंब असणे ही काळाची गरज आहे. ती ओळखून आपण त्या दिशेने पावले टाकूया.





# २०१९

कृष्णा नदीच्या पुरात यावेळी पुन्हा सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातली शेकडो गावे बुडाली. शेती उद्‌ध्वस्त झाली. जनतेचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले. आता यासाठी कुणाला दोषी धरायचे? निसर्गाला, अतिवृष्टीला का धरणाच्या पाण्याचे नियोजन व्यवस्थित न करणाऱ्या जलसंपदा विभागाला! सतत वारंवार येणाऱ्या पुराचा सामना जनता कसा करणार आहे? यासाठी कायमची प्रभावी उपाययोजना सरकार करणार आहे की नाही? आलमट्टीच्या उंचीचे तुणतुणे गेली २५ वर्षे आपण वाजवितच आहोत. आणखीन किती वर्षे ते वाजवायचे? सरकार या पुराकडे डोळे उघडून केव्हा पाहणार आहे?



# कृष्णेचा महापूर जनता त्रस्त सरकार मते मागण्यात व्यस्त

डॉ. सुधीर भोंगळे








30 जुलै ते 10 ऑगस्ट या 12 दिवसांमध्ये कृष्णा आणि तिची उपनदी असलेल्या भीमा व इतर उपखोऱ्यांमध्ये प्रचंड पाऊस पडला. हा पाऊस सरासरीपेक्षा तर जास्त होताच पण कमी वेळेत तीव्र वेगाने पडला. त्यामुळे नदी, नाले, ओढे, ओहोळ दुथडी भरुन वाहिले. पाण्याचा वेग प्रचंड असल्यामुळे सगळे छोटे-मोठे बंधारे, लघु व मध्यम प्रकल्प त्वरीत भरले. बंधाऱ्यांची साखळी भरुन गेल्यामुळे मोठ्या धरणांमध्येही प्रचंड वेगाने पाणी येण्यास सुरुवात झाली. पाऊस अगोदरच खूप लांबलेला होता. त्याने मोठी ओढ दिली होती. जवळपास महिनाभराचा खंड पडल्यामुळे पिके जगतील की नाही अशी शंका निर्माण झाली होती. पाऊस जुलैच्या शेवटच्या आठवड्यात सुरु झाल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे व समाधानाचे वातावरण तयार व्हायला सुरुवात झाली होती. मोठ्या प्रकल्पांमध्ये वेगाने पाण्याचा साठा होऊ लागल्यामुळे शहरातले लोक अधिक आनंदित झाले होते. कारण त्यांचा वर्षभराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला होता. आता आपल्या शेतीला सिंचनासाठी पाणी मिळणार म्हणून प्रकल्पावर अवलंबून असणारे शेतकरीही खूष झाले होते.

कृष्णा व भीमा खोऱ्यात एकूण 39 मोठे व मध्यम प्रकल्प आहेत. मुठा, कुकडी, नीरा आणि भीमा या चार उपखोऱ्यात एकूण 27 मोठे व मध्यम प्रकल्प आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे : टेमघर, वरसगाव, पानशेत, खडकवासला, पवना, कासारसाई, मुळशी, कलमोडी, चासकमान, भामा आसखेड, आंद्रा, वडीवळे, शेटफळ, गुंजवणी, भाटघर, वीर, निरा देवघर, नाझरे, पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगांव, वडज, डिंभे, चिल्हेवाडी, घोड, विसापूर आणि उजनी. या सर्व प्रकल्पांची मिळून उपयुक्त पाणीसाठा क्षमता 218.40 टीएमसी आहे. 11 ऑगस्ट 2019 पर्यंत या सर्व धरणात मिळून 96.38 टक्के म्हणजे 210.51 टीएमसी एवढा पाणीसाठा झाला होता. मागच्या वर्षी (2018) याच वेळेला या सर्व प्रकल्पात मिळून 70.85 टक्के म्हणजे 154.74 टीएमसी एवढा पाणीसाठा झालेला होता.

कृष्णा उपखोऱ्यामध्ये एकूण 12 मोठे व मध्यम प्रकल्प




येतात. त्यांची नावे पुढीलप्रमाणे : धोम बलकवडी, धोम, कण्हेर, उरमोडी, तारळी, कोयना, वारणा, कासारी, तुळशी, राधानगरी, दूधगंगा आणि पाटगांव. या सर्व 12 धरणांची उपयुक्त पाणीसाठा क्षमता 209.88 टीएमसी आहे. 11 ऑगस्ट पर्यंत या सर्व धरणांमध्ये मिळून 95.16 टक्के म्हणजे 199.70 टीएमसी पाणीसाठा झालेला होता. मागच्या वर्षी याच वेळी हा पाणीसाठा










91.49 टक्के म्हणजे 192.03 टीएमसी झालेला होता. 1 जून ते 11 ऑगस्ट या काळात कृष्णा उपखोऱ्यातील धरणांमध्ये आलेला येवा 316.12 टीएमसी एवढा होता आणि भीमा उपखोऱ्यातील धरणांमध्ये आलेला येवा 282.63 टीएमसी होता. भीमा आणि कृष्णा दोन्ही उपखोऱ्यांत मिळून आलेला येवा 597.85 टीएमसी होता. म्हणजे 11 ऑगस्ट पर्यंत या सर्व धरणांमधून मिळून 169.58 टीएमसी पाणी नदीपात्रात सोडून देण्यात आले होते.

30 जुलै ते 10 ऑगस्ट या काळात मागील दहा वर्षांत (2009 ते 2018) कोल्हापूर जिल्ह्यात कमीत कमी 37.90 (2017 मध्ये) आणि जास्तीत जास्त 346.60 (2012 मध्ये) व 10 वर्षांत एकूण 1845.40 म्हणजे सरासरी 184.54 मिलीमिटर पाऊस पडला होता. 2019 मध्ये 30 जुलै ते 10 ऑगस्ट या काळात म्हणजे 12 दिवसात पडलेला पाऊस 1086.44 मिलीमिटर म्हणजे दररोज सरासरी 90.54 मिलीमिटर पाऊस पडत होता. एका दिवसात 65 मिलीमिटरपेक्षा जास्त पाऊस झाला तर त्याला आपण अतिवृष्टी म्हणतो. ही अतिवृष्टी पश्चिम महाराष्ट्रात होणार आहे असा अंदाज 25 जुलैपासून भारतीय वेधशाळा सातत्याने देत होती. नेहमीप्रमाणे आपण वेधशाळेचा पावसाचा अंदाज चुकणार आहे असे गृहीत धरुन त्याच्याकडे दुर्लक्ष केले. पावसाचे कुणी मालक नाही. तो त्याच्या मनाप्रमाणे वागला. कमी वेळात तीव्रतेने कोसळला. एकट्या पंचगंगा खोऱ्यातून 12 दिवसात (राधानगरी धरण व इतर बंधारे) एकूण 66.14 टीएमसी पाणी नदीपात्रात सोडून देण्यात आले. त्यातले फक्त 12.55 टीएमसी पाणी धरणातले सोडलेले होते तर उर्वरीत 53.593 टीएमसी पाणी हे खुल्या पाणलोटातले (फ्री कॅचमेंट) म्हणजे धरणाच्या खाली पडलेल्या पावसाचे होते. म्हणजे 18.97 टक्के पाणी धरणातले व 81.03 टक्के पाणी धरणाच्या बाहेरचे होते.

वारणा खोऱ्याचे हेच चित्र तपासले तर 30 जुलै ते 10 ऑगस्ट या 12 दिवसात वारणा धरणातून 18.12 टीएमसी आणि धरणाच्या खालच्या खुल्या पाणलोटातून 48.63 टीएमसी असे एकूण 66.75 टीएमसी पाणी वाहून गेले. म्हणजे धरणातून सोडलेल्या पाण्याचे प्रमाण 27.14 टक्के आणि खुल्या पाणलोटातले पाणी 72.86 टक्के होते. दूधगंगा खोऱ्यातून याच काळात धरणांमधून 8.899 टीएमसी (21.28 टक्के) आणि दूधगंगा खोऱ्याच्या खुल्या पाणलोटातून (फ्री कॅचमेंट) 32.91 टीएमसी (78.72 टक्के) एवढे पाणी सोडण्यात आले. घटप्रभा खोऱ्यातील धरणांमधून 4.986 टीएमसी (18.05 टक्के) तर फ्री





कॅचमेंन्ट मधून 22.631 टीएमसी (81.95 टक्के) पाणी नदीपात्रात सुटून वाहून गेले. हिरण्यकेशी खोऱ्यात धरणातून सोडलेले पाणी 1.771 टीएमसी (7.65 टक्के) तर फ्री कॅचमेंन्टमधून वाहून गेलेले पाणी 21.367 टीएमसी (92.35 टक्के) एवढे होते. याच 12 दिवसात ताम्रपर्णी खोऱ्यातील धरणातून सोडलेले पाणी 6.616 टीएमसी (43.98 टक्के) तर फ्री कॅचमेंन्ट मधील पाणी 8.426 टीएमसी (52.02 टक्के) होते.

कोल्हापूर जिल्ह्याची विभागणी पंचगंगा, वारणा, दूधगंगा आणि घटप्रभा अशा चार नदी खोऱ्यात होते. या सर्व खोऱ्यात मिळून राधानगरी, तुळशी, कुंभी, कासारी, वारणा, कडवी, दूधगंगा, पाटगाव, चिकोत्रा, चित्री, जंगमहट्टी, घटप्रभा आणि जांब्रे असे 13 मोठे व मध्यम प्रकल्प असून त्यांची पाणी साठवण क्षमता 90.323 टीएमसी आहे. या














सर्व प्रकल्पातून 25 जुलै ते 10 ऑगस्ट या काळात वाहून गेलेले पाणी 240.50 टीएमसी आहे. साठवण क्षमतेपेक्षा पावणेतीन पट पाणी केवळ 12 दिवसात वाहून गेले आहे. अतिवृष्टीमुळे कृष्णेला पूर आला म्हणजे नेमके किती पाणी आले व नदीपात्रातून वाहून गेले हे कळावे म्हणून ही आकडेवारी नमूद केली आहे.

आता या काळात धरणातील पाणी साठ्याची स्थिती काय होती. आपण फक्त कोयना धरणाचा विचार करु. कोयना धरणाची मूळ क्षमता 98.8 टीएमसी असून त्यावर 5 टीएमसी साठा होईल अशा पद्धतीने फ्लॅप्स बसविण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्याची साठवण क्षमता 103 टीएमसीच्या आसपास आहे. 2 ऑगस्ट 2019 ला कोयना धरणातील पाणीसाठा 82.62 टीएमसी होता. 3 ऑगस्टला म्हणजे एका दिवसात तो 6 टीएमसीने वाढून 88.02 झाला. 4 ऑगस्टला पुन्हा सहा टीएमसीने वाढून तो 94.20 टीएमसी झाला. 6 तारखेला हा साठा 101.26 टीएमसी, 7 तारखेला 102.77 टीएमसी आणि 9 ऑगस्टला 103.19 टीएमसी होता. म्हणजे 9 ऑगस्टपर्यंत

धरण पूर्ण क्षमतेने भरलेले होते. याच काळात धरणातून सोडण्यात येणारे पाणी (विसर्ग) लक्षांत घेतले तर 2 व 3 ऑगस्टला 2100 क्युसेक्स, 4 ऑगस्टला 20998 क्युसेक्स, 5 ते 8 ऑगस्ट या काळात रोज सुमारे 1 लाख 3 हजार क्युसेक्स आणि 9 ऑगस्टला 77387 क्युसेक्स व 10 ऑगस्टला 44 हजार क्युसेक्स याप्रमाणे पाणी सोडण्यात आले.

आता लोकांचा प्रश्न असा आहे की 15 ऑगस्टपूर्वी कोयना धरण शंभर टक्के भरुन घेण्याची आवश्यकता होती का? वेधशाळा अतिवृष्टीचा अंदाज देत असताना व धरणात येणारा प्रचंड येवा लक्षांत घेता 2 ते 4 ऑगस्ट या काळात नदीपात्रात विसर्ग कमी का सोडला? धरणाचे पोट अगोदरच थोडे मोकळे केले असते तर 5 ते 8 ऑगस्ट या काळात एकदम विसर्ग वाढवून एक लाख क्युसेक्सच्या पुढे न्यावा लागला नसता. अतिवृष्टीमुळे धरणातून सुटलेले पाणी आणि धरणाखालच्या फ्री कॅचमेंन्टमधून आलेले पाणी यांचे प्रमाण इतके प्रचंड होते की ते कृष्णा नदीच्या पात्रात मावले नाही. त्यामुळे सांगली-कोल्हापूर जिल्ह्यात प्रचंड महापूर येऊन ही दोन्ही मोठी शहरे पाण्यात बुडाली.

## 2005 च्या पुराशी तुलना

2005 सालीही सांगली आणि कोल्हापूर या दोन्ही जिल्ह्यातला काही भाग व ही दोन्ही शहरे पुराच्या पाण्यात बुडाली होती. परंतु त्यावेळच्या पुराच्या मानाने यावेळचा म्हणजे 2019 चा महापूर हा 6 ते 8 फुट जास्त उंच होता. त्यामुळे नुकसान आणि बुडीताचे क्षेत्र 2005 पेक्षा खूप मोठे आहे. पुराचा संदेश अगोदरच आल्यामुळे प्रशासन लोकांना स्थलांतरीत करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांना वारंवार निघून जाण्याच्या व सुरक्षित स्थळी हलण्याच्या सूचना देत होते. परंतु लोक 2005 च्या पुराच्या अंदाजालाच धरुन बसले होते.

2005 ला जेवढा पूर आला होता त्यापेक्षा जास्तीचा पूर येणार नाही असा अंदाज बांधून लोकांनी घरातले सामान 2005 च्या पुरात जिथपर्यंत पाणी आले होते त्यापेक्षा जास्त उंचावर सामान सुरक्षित म्हणून ठेवले. परंतु यावेळच्या पुराची उंची अपेक्षेपेक्षा 6 ते 8 फुटाने अधिक झाली. अंदाज चुकले आणि सर्व सामान भिजून त्याचे नुकसान झाले. आत्तापर्यंत आपण पाऊस किती पडला आणि पाणी किती आले याची आकडेवारी पाहिली. आता या पाण्यामुळे या भागाचे नेमके काय व कसे नुकसान झाले ते थोडक्यात पाहू.

## नुकसानीचा ढोबळ आढावा :

कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण 345 गावांना पुराचा फटका बसला. त्यातील 27 गावांना पूर्ण वेढा होता तर 318 गावे अंशतः बाधीत आहेत. शिरोळ तालुक्यातील 18, हातकणंगले तालुक्यातील 5, करवीरमधील 3 आणि गगनबावड्यातील एक अशी 27 गावे पुराने पूर्ण बाधीत आहेत. जवळपास 1 लाख, 2557 कुटुंबे आणि 4 लाख, 7531 लोक या पूराने बाधीत झाले आहेत. जवळपास 750 घरे पूर्णपणे पडून गेली आहेत. 11800 घरांची अंशतः पडझड झाली आहे. पण त्यातीलही बरीच घरे ही पूर ओसरल्यानंतर ओलसरपणामुळे अजूनही पडत आहेत. ती कधी कोसळतील याचा नेम नाही. त्यामुळे बऱ्याच घरांमध्ये लोकांना राहण्यासारखी परिस्थिती नाही. धाडस करुन त्यांनी राहायचे ठरवले तर 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' अशीच स्थिती आहे. 1 लाख, 6 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे पुराने



नुकसान झाले असून त्यात ऊस पिकाचे क्षेत्र सुमारे 70 टक्के आहे. उर्वरीत क्षेत्रात केळी, सोयाबीन, भुईमूग आणि तांदूळ ही मुख्यत्वे पिके होती. ही सर्व पिके पूर्ण नष्ट झाली आहेत. नेमकी किती माणसे मेली, किती जनावरे वाहून गेली, किती कृषि पंप, पाईपलाईन्स वाहून गेल्या, उध्वस्त झाल्या या सगळ्यांची मोजदाद चालू आहे.

सांगली जिल्ह्याच्या मिरज, वाळवा, पलूस व शिराळा या चार तालुक्यांबरोबरच सांगली शहरालाही पुराचा मोठा फटका बसला. 103 गावातील 35100 कुटुंबे आणि 1 लाख,

85 हजार, 855 व्यक्ती व 42444 जनावरे विस्थापीत झाली. सांगली शहरातील 42631 कुटुंबातील 1 लाख, 70 हजार, 511 व्यक्तींना आणि 720 जनावरांना स्थलांतरीत करावे लागले. याशिवाय ग्रामीण भागातून 1 लाख, 20 हजार, 659 आणि शहरी भागातून 1 लाख, 37 हजार व्यक्ती स्वतःहून नातेवाईकांकडे स्थलांतरीत झाले. या पुरात 23 व्यक्ती, 39 जनावरे आणि 3200 कोंबड्या मरण पावल्या. मेलेल्या माणसे व जनावरांची संख्या अजून गोळा करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यात यात वाढ होण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यातल्या 144 गावातली सुमारे 55 हजार हेक्टर शेती पुराने बाधित झाली आहे.



जवळपास 58 हजार शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे.

मनुष्यहानी, घरे, गोठे, पिक, गावठाणे, जनावरे याशिवाय पाणीपुरवठा करणाऱ्या योजना, बंधारे, विहिरी, पाईपलाईन्स, कृषिपंप, विजेच्या लाईन्स व डीपी, शाळांच्या इमारती, अंगणवाड्या, वाचनालये, व्यायामशाळा, सार्वजनिक इमारती व सरकारी कार्यालये, दुकाने, वाहने, रस्ते, झाडे, मंदीरे, नद्यांवरील पूर, पाणी पुरवठा करण्याऱ्या जॅकवेल व त्यातली मशिनरी यांसह अनेक गोष्टींचे नुकसान झालेले आहे. ही हानी कधीही न भरुन येणारी आहे. शेत जमिनींचे झालेले नुकसानही खूप मोठे आहे. पिके तर गेलीच पण मातीही वाहून गेली आहे. अनेक ठिकाणी पुराने नदीचे काठ कापले आहेत. त्यामुळे शेतजमीन कमी होऊन तिथली माती ढासळू लागली आहे व पुराचे आणि नदीचे पाणी यापुढील काळात अधिक आत शिरुन जमीन वाहून नेण्याचा धोका निर्माण झाला आहे. इतकेच नव्हे तर नदीचे पात्र रुंद होऊन कदाचित पुढील काळात नदी वाहण्याचा मार्ग बदलण्याचा धोका आहे इतके पात्र विस्तीर्ण होत आहे. या नदीपात्राची बांधबंदिस्ती कशी करावी असा भीषण प्रश्न आहे.

## काही पूरग्रस्तांशी केलेली बातचीत

**1) श्रीमती यशोदा शंकर माने : मु. पो. आंबेवाडी, ता. करवीर**

आम्ही भाडेकरु आहे. घराच्या वर पाच फूट पाणी होते. ते आठ दिवस टिकून राहिले. घरातले सगळे सामान पुरात वाहून गेले. भांडी, गॅस टाकी, कोंबड्या पण गेल्या. अंगावरच्या एका कपड्यावर आठ दिवस कल्याणी हॉलमध्ये राहिले. घर तर पूर्ण पडून गेलंय. आता कुठं राहायचं प्रश्नच आहे.

**2) श्री. मारुती गणपत पाटील : मु. पो. आंबेवाडी, ता करवीर**

पूर परिस्थितीचा विचार करुन व दूरदृष्टी ठेवून 1968 साली आजोबा रामजी पाटील यांनी घर बांधले होते. ते या पुरात बुडले. 2005 पेक्षा 6 फूट जास्त उंच पाणी होते. रविवारी पूर आला तो 8 दिवसांनी म्हणजे दुसऱ्या रविवारीच खाली गेला. विशाळगड ते राधानगरी या दरम्यान 5 नद्या आहेत. आमच्यापासून 3 कि.मी. अंतरावर प्रयाग (संगम) आहे. कासारी, कुंभी, भोगावती या चिखलीत मिळतात. पुढे या नद्या नृसिंहवाडीला पंचगंगेला मिळतात. काळम्मावाडी ते विशाळगड या दरम्यानचे सगळे पाणी नृसिंहवाडीला जाते. पंचगंगा व दूधगंगा यांच्या संगमाचे पाणीही तिथेच जाते. ते नदीत मावत नाही म्हणून नृसिंहवाडी बुडते.

**3) श्री. सरदार शिवराम काळोखे : मु. पो. आंबेवाडी, ता. करवीर**

जनावरांचा गोठा पूर्णपणे पडला आहे. वरचे पत्रे वाहून गेले. भिंती कोसळल्या. एक वीटही जागेवर राहिली नाही. आता म्हशी कुठे बांधायच्या ? त्यांना काय खायला घालायचे ? साठवून ठेवलेला सगळा चारा वाहून गेला आहे.

**4) श्रीमती सविता दत्तात्रय कांबळे : मु. पो. आंबेवाडी, ता. करवीर**

2005 ची पूर पातळी लक्षात घेऊन 8-10 वर्षांपूर्वी घर बांधले होते. नवीन घरही पडले. 12 दिवस घरात पाणी होते. पूर्ण घर पाण्यात बुडाले होते. 12 दिवस मी घराच्या बाहेर राहिले. येऊन पाहते तो घरातले सगळे सामान अगदी गॅसचा सिलेंडर सुद्धा वाहून गेला होता.



अबिद इस्माईल मुलाणी

**5) श्री. अबिद इस्माईल मुलाणी : रा. चिखली, ता. करवीर**

1955 साली 2500 चौ. फुटांचे घर बांधले होते. घरात 14 माणसे आहेत. घरात काहीच शिल्लक राहिलेले नाही. सगळे परत नव्याने विकत घेणे अवघड आहे. कारण हातात पिक नाही, पैसै नाही. दीड एकर ऊस होता. तोही आता गेला आहे. घरी टेलरचे दुकान होते. महिलांसाठी फॉलपिकोचे मशीन घेतले होते. ते वाहून गेले. पडलेल्या घराचे सामान बाहेर काढायला 22 हजाराचे कंत्राट दिले आहे. घरातली 6 मुले शिक्षण घेताहेत. जवळच भाड्याने आता घर घेतलंय.



वडील पूर्ण अंध आहेत. त्यांना भाच्याकडे हातकणंगले येथे राहायला पाठविले आहे. वडिलांचे 1968 सालचे एक घड्याळ होते. ते टोल द्यायचे. त्यामुळे वडीलांना किती वाजले ते कळायचे. त्याच्या आधारे ते काम करायचे. त्या घड्याळाचा मातीच्या ढिगाऱ्याखाली चुरा झाला. जानेवारी ते मार्च या काळात ऊसाचे पैसे यायचे. त्यातून वर्षाचे धान्य भरुन ठेवायचो. सगळे धान्य भिजून कुजले व त्याला कोंब फुटले.

**6) श्री. प्रकाश कुंभार व श्री. प्रकाश गवंडी (दोघेही माजी नगरसेवक, कोल्हापूर महापालिका)**

संत गोरा कुंभार वसाहतीलाच आता बापट कॅम्प म्हणून ओळखले जाते. वसाहतीत 350 कुंभार आहेत. ते मुख्यत्वे सारेजण गणपतीच्या मूर्ती तयार करतात. लहान मोठ्या मिळून जवळपास 20 लाख गणपती मूर्ती येथे बनतात. त्यातल्या दीड

भिजलेल्या गणपती मूर्ती दाखविताना प्रकाश कुंभार व प्रकाश गवंडी. शेजारी आदिल फरास व एम.एस. माने.



लाख मूर्ती मोठ्या उंच असतात. या सर्व मूर्ती गोवा, बंगलोर, कर्नाटक, कोकण, कऱ्हाड, सातारा आणि कोल्हापूरात विकल्या जातात. शाडू माती आणि प्लास्टर ऑफ पॅरिस यांचे मिश्रण करुन मूर्ती बनतात. एक मूर्ती पूर्ण वाळून तयार व्हायला 15 दिवस लागतात. दिपावलीच्या पाडव्यापासून मूर्ती तयार करण्याचे काम सुरु होते. ते वर्षभर चालते. आता शेवटचे 10 दिवसच राहिले होते. 15 ऑगस्ट पर्यंत सर्व मूर्ती गेल्या असत्या. पण त्या अगोदरच पूर आला. 2005 पेक्षा 8 फूट पाणी जास्त होते. त्यामुळे सगळ्या मूर्ती भिजून त्यांचा रंग गेला व चिखल झाला. रमेश ज्ञानदेव पाडळकर म्हणाले, माझ्या एक हजार मूर्ती गेल्या. सगळ्या मूर्ती दोन फुटाच्या होत्या. पाच लाखाच्यावर नुकसान झाले. प्रकाश कुंभार म्हणाले, 13 टक्के व्याजाने मूर्ती बनविण्यासाठी कर्ज काढले होते. आता ते कसे फेडणार? मजुरी, साहित्य सगळे अंगावर पडले आहे. जानेवारीला बँकेने कर्ज दिले की सप्टेंबरला आम्ही परत फेडायचो. आता सरकारने पूर्ण कर्ज माफ केले पाहिजे.

**7) श्री. आदिल फरास : माजी नगरसेवक, कोल्हापूर मनपा व अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस**

कोल्हापूर शहरातून जयंती नाला वाहतो. तो 7 कि.मी. चा आहे. या नाल्यातून कोल्हापूर शहराची सर्व घाण पंचगंगा नदीत जाते. त्यामुळे पंचगंगा प्रदूषित होते. कोल्हापूर महापालिकेत एप्रिलमध्ये श्री. मल्लीनाथ कलशेट्टी हे आयुक्त म्हणून आले आहेत. तेव्हापासून त्यांनी दर रविवारी कुणालाही सुट्टी न देता हा जयंती नाला स्वच्छ करण्याचे काम सुरु केले आहे. आयुक्त स्वतः काम करतात. त्यामुळे सर्वजण उत्साहाने या स्वच्छता कामात सहभागी होत आहेत. मागील चार महिन्यात दोन हजार टनाच्यावर गाळ काढला असून सर्व प्लॅस्टिक, कचरा नाल्यातून गोळा केला आहे. तसेच गोमती व इतर 11 नालेही स्वच्छ केले आहेत. त्यामुळे पुराच्या काळात नाल्यांमध्ये पाणी न राहता वेगाने वाहून गेले. अन्यथा कोल्हापूर शहरात आणखीन पाणी पसरले असते. 2015 साली हे नाले स्वच्छ करण्याचे आठ कोटी रुपयांचे टेंडर महापालिकेने काढले होते. ते काही कारणाने रद्द झाले. पण आयुक्त कलशेट्टींच्या पुढाकारामुळे व त्यांना या कामात जिल्हाधिकारी श्री. दौलत देसाई यांची पूर्ण साथ असल्यामुळे बिनपैशाचे लोकसहभागातून सर्व नाले स्वच्छ झाले. त्यामुळे पुराचे पाणी मागे कमी पसरले. पुराच्या काळात कलेक्टर दौलत देसाई, श्री. कलशेट्टी आणि जिल्हा परिषदेचे आयुक्त श्री. अमित मित्तल या तीनही अधिकाऱ्यांनी समन्वय राखून स्वतः उत्तम काम केले. त्यामुळे लोकांना बरीच मदत झाली.

**8) श्री. अमोल विभूते : सचिव, नृसिंहवाडी देवस्थान कमिटी**

श्री नृसिंह सरस्वतींच्या पादुका व मंदीर यामुळे रोज हजारो भाविक नृसिंहवाडीला येत असतात. गावाची लोकसंख्या 4200 असून पुरात पूर्ण गाव बुडाले होते. 2005 ला जेव्हा पूर आला होता त्यापेक्षा यावेळी 6 फूट पाणी जास्त होते. कृष्णा व तिच्या सर्व उपनद्यांचे पाणी येथे येत असल्यामुळे समुद्रासारखेच चित्र तयार होते. यावेळी मंदिराच्या तळापासून 50 फूट पाणी होते. गावात 200 दुकाने आहेत. त्या सर्वांचे 100 टक्के नुकसान झाले. 2016 मध्ये कन्यापर्व होते. त्या काळात सर्वांनी दुकाने चांगली करुन घेतली होती. व भरपूर माल भरला होता. तो सर्व या पुरात नष्ट झाला. कृष्णा आणि पंचगंगेच्या 22 नद्यांचे पाणी आता नदीपात्रात कसे मावणार ? हे पाणी दुसऱ्या मार्गाने वळविणे हाच उपाय आहे. पहिल्या 7 फुटातच सगळे साहित्य



मल्लीनाथ कलशेट्टी



मंदिरा समोरचा मंडप नदीत पडला.

गेले. पुराचे पाणी चढायला लागल्याबरोबर देवांच्या मूर्ती श्री. मुकुंद नरहरी ढवळे यांच्या घरी नेल्या. त्यांच्याही घरात पाणी आल्यानंतर त्या मूर्ती उचलून श्री. कडू पुजारी यांच्या हॉलमध्ये नेल्या. तिथेही पाणी आल्यावर त्या वरती दुसऱ्या मजल्यावर नेल्या. संपूर्ण गावात मिळून फक्त 10-15 लोक राहिले होते. बाकी सर्व माणसे स्थलांतरीत झाली होती. पुराने सगळे गाव उध्वस्त झाले असून पुन्हा नव्याने उभे राहायला आता 5-10 वर्षे जातील. मंदीरासमोरचा मंडप पडला. वायरींग निघून गेले.

रंगरंगोटी परत करावी लागेल.

**9) श्री. सचिन लक्ष्मण मोहिते (नगरसेवक, कुरुंदवाड नगरपालिका) व प्राचार्य डॉ. सुनिल दत्तात्रय चव्हाण : भैरववाडी, कुरुंदवाड**

संपूर्ण कुरुंदवाड गावाला पुराच्या पाण्याचा वेढा होता. बाहेर पडणे शक्यच नव्हते. सगळे पूल पाण्याखाली होते. कुरुंदवाडची लोकसंख्या 30 हजार असून 17 वॉर्ड आहेत. भैरववाडीची लोकसंख्या 4 हजार आहे. 2005 आणि 2006 लाही पूर आला होता. त्यावेळेपेक्षा यंदा 8 फूट पाणी जास्त होते. आठ दिवसात होत्याचे नव्हते झाले. 2005 च्या पुराची पाणीपातळी लक्षांत घेऊन लोक थांबले होते. पण पाणी चढायला लागल्यावर त्यांना तेरवाड, हेरवाड, गुरुदत्त कारखाना येथे हलविले. तथापी शेवटपर्यंत 275 लोक आणि 500 जनावरे येते. 22 दिवस झाले पाणी नाही. 3 ऑगस्टला पूर सुरु झाला. 20 ऑगस्टपर्यंत गाव पाण्यात होते.

पूर ओसरल्यावर रोज एक हजार लोकांची येथेच जेवणाची व्यवस्था केली. आमदार सतेज पाटील यांचे 400 डॉक्टरांचे पथक येथे आले. पण सर्वप्रथम गावात राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टरांचे पथक डॉ. नरेंद्र काळे यांच्या नेतृत्वाखाली आले. त्यांनी सर्वांना औषधोपचार केला. गावातील 130 घरांची पडझड झाली आहे. 200 हेक्टर जमिनीवरचा ऊस पूर्ण उध्वस्त झाला आहे. टाकळेवाडी, कोंडीग्रे, जैनापूर माळ, जांभळी, जयसिंगपूर या गावातील माळरानांवर गावाचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव सरकारने दिला आहे. पण लोकांची स्थलांतरीत होण्याची मानसिकता नाही. कारण उदरनिर्वाहाचे तिथे साधन काय असा प्रश्न आहे.

**डॉ. सुनील चव्हाण व सचिन मोहिते हे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना.**



गावात होती. जिन्यांमध्ये गाद्या टाकून जनावरे बिल्डिंगच्या वरच्या टेरेसवर चढविली. त्यामुळे ती वाचली. तरी देखील 7 म्हशी, दोन घोडे आणि 1 गाय मेली.

हिप्परगा बराज आणि आलमट्टीत जास्त पाणी तटविले. लवकर धरणातून जास्त पाणी सोडले नाही. कुरुंदवाडपासून हिप्परगा बराज 60 कि.मी. तर अलमट्टी धरण 240 कि.मी. अंतरावर आहे. सलग 17 दिवस गावात वीज नव्हती. जनरेटरवर 175 मोबाईल चार्ज केले. कृष्णा नदीतून गावाला प्यायला पाणी

भैरववाडीतील लोकांशी बोलत असतानाच मुळशी तालुक्यातील रिहे गावचे राजेंद्र पालवे, प्रकाश बांदल, अशोक पडळकर, कमलेश ओझरकर, संतोष पडळकर, मारुती बोरकर हे तांदूळ, गहू, डाळ वाटप करण्यासाठी भैरववाडीत आले होते. अडीच टन मालाची पॅकेटस् त्यांनी तयार करुन आणली होती. ती घेण्यासाठी ट्रकच्या मागे महिलांनी मोठ्या रांगा लावल्या होत्या. याच वेळी मोठ्या मुलांना शालेय साहित्याचे उदा. दप्तर, वह्या, पेन यांचे वाटप करण्यात आले.



संजय पाटील यांची उद्ध्वस्त झालेली केळी बाग.

**10) श्री. संजय मलगोंडा पाटील (संचालक, दत्तशिरोळ ससाका) खिद्रापूर**

खिद्रापूरची लोकसंख्या 3300 आहे. शंकराचे प्राचीन दगडी हेमाडपंथी मंदीर येथे असल्यामुळे ते पाहण्यासाठी जगातून लोक येतात. 2000 वर्षांपूर्वीचे हे मंदीर आहे. 1994 आणि 2005-6-7 अशा चार वेळेला गावात पूर आला होता. कर्नाटक सीमेवरील हे शेवटचे गाव आहे. कृष्णा, दूधगंगा आणि पंचगंगा या तीनही नद्यांचे पाणी गावात येते. दानवाडला कृष्णा आणि दूधगंगेचा संगम आहे. नृसिंहवाडीला कृष्णा आणि पंचगंगा यांचा तर हरिपूरला वारणा आणि कृष्णेचा संगम होते. त्यामुळे नदीत ३० ते ३५ फूट पाणी कायम राहून मगरींच्या सतत मोठा वावर असतो.टाकळीपासून शिरगुप्पीपर्यंत १४ कि.मी. पाण्याचे पात्र आहे. सगळीकडे पाण्याचा वेढा होता. फक्त २०-२५ घरे बुडायची राहिली. मंदीरही पाण्यातच होते. सर्व गाव पूरग्रस्त असल्यामुळे व वारंवार पुराचा सामना करावा लागल्यामुळे गावाचे पुनर्वसन आवश्यक आहे. जिल्हाधिकारी श्री.दौलत देसाई यांनी गावकऱ्यांशी चर्चा करून त्यांना गुरूदत्त साखर कारखान्याच्या माळरानावरील १० एकर जागेत नवीन गावठाण वसविण्याचा प्रस्ताव दिला आहे. गावातल्या सर्व लोकांना तो मान्य असल्यामुळे पुर्वसनासाठी लोक तयार आहेत. गावात ७५० ते ८०० घरे आहेत. टाकळीचा माळ खिद्रापूर पासून ७ कि.मी. अंतरावर आहे. तेथून रोज ये-जा करून लोक शेती करू शकतात.

गावात ३२५ एकर क्षेत्रावर ऊस आहे. तो पूर्ण गेला. माझ्या घरात ११ टन खत व खपली गहू होता. ३ एकवरची जी-९ केळी



वांग्याच्या शेतात मल्चिंगवर साचलेला गाळाच थर दाखविताना संजय पाटील.

कापायला आली होती. ती सर्व पुरात गेली. १९१४ मध्येही गावात पाणी आले होते. पण ते तिसऱ्या दिवशी उतरले होते. यंदा १५ दिवस पाणी उतरले नाही. १७ ऑगस्ट नंतर पाणी नदीपात्रात गेले. त्यामुळे लोकांमध्ये भिती वाढत चालली आहे.

**११) श्री. अमरसिंह शिवाजीराव माने पाटील(नगराध्यक्ष, दत्तशिरोळ)**

शिरोळ गावात १४०० कुटुंब बाधित आहेत. गावची लोकसंख्या ३६ हजार आणि मतदान २३८०० आहे. तालुक्यात सरासरी जेवढा पाऊस पडतो, त्यापेक्षा १२ पट पाऊस यावेळी जास्त पडला. शिरोळातून तीन लाख टन ऊस साखर कारखान्यांना गळीतासाठी जातो. हा सर्व ऊस व नवीन लागणीही खलास झाल्या आहेत. भुईमूग, उडीद, सोयाबीन, मिरची, वांगी, झेंडू, ढोबळी मिरची, कोबी, फ्लॉवर ही सगळी पिके गेली आहेत. नांदणीतून कोबी-फ्लॉवर तर कोथळी गावातून शंभर ट्रक टोमॅटो बाजारात जायचा.

पुराने गोरगरिबांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यांची घरे, दगड, विटा व मातीची असतात. माती भिजल्यामुळे घरे ढासळण्याचे प्रमाण अधिक आहे. पुरात सर्वात जास्त नुकसान शिरोळ तालुक्याचे झाले आहे. कारण कर्नाटकाच्या सीमेवर तालुका असून सर्व नद्यांचे पाणी येथेच येते.बऱ्याचदा आमच्याकडे पाऊस येत नाही पण पूर मात्र येतो. २००५ च्या पुरापेक्षा यावेळी ८ फूट पाणी जास्त होते. इतका पूर आमच्या कोणत्याच पिढीने कधी पाहिला नाही. २००५ च्या पुरात शिरोळातील नवीन वसाहत, दसरा चौक, शाहूनगर, एस.टी. स्टॅण्डची मागची गल्ली, जुना कुरुंदवाड रस्ता पूर्ण बुडला होता. तो अनुभव लक्षांत घेऊन लोक गावात थांबले होते. पणपाणी

घराच्या जिन्यावर गाद्या टाकून जनावरे टेरेसवर चढविण्यात आली.



वाढायला लागल्यावर ते हलले.

नवीन रस्ता व पुलांमुळे पाणी तटते. रस्त्यांची उंची वाढली पण पाणी जाण्यासाठी चर काढले नाहीत. पुलाला भराव केले. त्यांचा वापर बंधारा म्हणून केला जातो. २० ते २५ फुटांचे भराव आहेत. ते काढून उड्डाण पूल केले पाहिजेत. म्हणजे खालून पाणी वाहून जाईल. मांजरीला तो पूल केला तिथे प्रचंड मोठा भराव केला. त्यामुळे ९ दिवस गावात पाणी राहिले. शेवटी ४-४ फुटाने वाढले. त्यामुळे लोकांचे अंदाज चुकले.जनावरे तिसऱ्या



दत्तशिरोळ येथील पूरग्रस्तांची शरद पवार यानी भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या, शेजारी राजेंद्र यड्रावकर, हसन मुश्रीफ, रुपाली चाकणकर



मजल्यावर चढविली व क्रेनने खाली उतरविली. काही जनावरे विशेषतः जर्सी गायीला पोहता येत नसल्यामुळे त्या मेल्या. 'एनडीआरएफ'च्या बोटी व सगळी मदत ६-७ दिवसानंतर आली. शासनाचा एक रुपयाही मदत न घेता आम्ही लोकांकडून शिदा आणून रोज दोन वेळेला ६-७ हजार लोकांसाठी जेवण तयार केले. अर्जुनवाड, घालवाड, कनवाड, खुटवाड, हसूर, शिरटी, आरवाड, अलास आणि नरसोबाची वाडी येथे जे जवान काम करीत होते त्या एक ते दीड हजार लोकांना शिरोळात स्वयंपाक तयार करून मिलीटरीच्या बोटीतून पाठविला. ९ दिवस आचाऱ्यांनी मोफत काम केले. लोकांनी मोठ्या प्रमाणावर अन्न धान्य पाठविले. स्वच्छतेत लोकांनी व स्वयंसेवी संस्थांनी मोठा सहभाग घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पथकाने डीडीटी पावडर व फॉगर मशीन देऊन फवारणी केली. एका तासात ७ लिटर डिझेल लागणारी फॉगर मशिन्स मुंबई मनपाने दिली होती. मेलेली जनावरे लगेचपुरून टाकली. २०० ढंपरच्या वर कचरा निघाला. कोल्हापूर लॉरी असोसिएशनने ढंपर व मशिनरी दिली. पुराच्या पाण्यात पोहत जाऊन कर्मचाऱ्यांनी पिण्याचा पाणीपुरवठा चालू केला. डीपी बुडाली होती. ती लगेच चालू केली. लाईट बंद पडू दिली नाही. ट्रान्सफॉर्मवरचा लोड ट्रान्सफर केला. दत्तशिरोळ कारखान्याचे चेअरमन गणपतराव पाटील यांनीही अन्नछत्र चालवून हजारो लोकांची निवास व भोजनाची व्यवस्था केली.


**१२) श्री. अमित कोळी (ठेकेदार व अभियंता, मांजरी पाणीपुरवठा योजना, कर्नाटक)**

मांजरी ब्रीजपासून १९ कि.मी. अंतरावर चिकोडी गाव आहे. त्याला व अंकली, जैनापूर, कागवाड, शिरगुप्पी यासारख्या ७ गावांना मांजरीच्या जॅकवेल मधून पिण्याचे पाणी पुरविले जाते. महाराष्ट्रातील कृष्णा खोऱ्यातले सर्व पाणी आधी येथे येते. मांजरीपासून १४० कि.मी. अंतरावर आलमट्टी धरण आहे. राजापूर पासून गुलबर्गा जिल्ह्यापर्यंत म्हणजे २५३ कि.मी. अंतरात कर्नाटकात कृष्णा वाहते. २००५ च्या पुरात पाण्याची उंची समुद्रसपाटीपासून ५१६ मीटर होती. ती यंदा ५१९ मीटर झाली. ३ मीटरने पाणी वाढले. मांजरीच्या पुलाजवळ पाण्याची उंची २५ मीटर होती. वीजपुरवठा खंडीत झाल्याने १३ दिवस पाणीपुरवठा बंद होता. कर्नाटकातील ९४३ गावे पुराने बाधित झाली. धरणांतून सगळे पाणी एकदम बाहेर पडू शकत नाही. १४०-१५० कि.मी. तले पाणी एकदम कसे सुटणार ? आलमट्टीच्या पुढे नारायणपूर डॅम आहे. पुराने दोन दिवसात नारायणपूर धरणही भरले. कर्नाटकातील



अमरसिंह माने पाटील, नगराध्यक्ष, दत्तशिरोळ

कर्नाटकातील मांजरी जॅकवेल



पूरग्रस्तांशी संवाद साधताना शरद पवार, शेजारी राजेंद्र यड्रावकर, अमरसिंह माने पाटील व इतर मान्यवर.



ऊस पिकाचे पुराने प्रचंड नुकसान झाले. कर्नाटक सरकार गुंठ्याला १३३ रु. म्हणजे एकरी ५३२० रु. मदत देणार आहे. ती अत्यंत अपुरी आहे. यावेळी बसवेश्वर मंदीरही आलमट्टी धरणात पूर्ण बुडले होते.

**१३) श्री. राजेंद्र यड्रावकर (कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, कोल्हापूर जिल्हा आणि चेअरमन, शरद साखर कारखाना)**

शिरोळ तालुक्याची पावसाची सरासरी ४२५ मी.मी. आहे.त्यापेक्षा कमी पाऊस यावर्षी झाला. तरी देखील कृष्णा, वारणा, पंचगंगा, दूधगंगा या नद्यांना आलेल्या पुराचे पाणी शिरोळ तालुक्यात घुसल्याने बागायत व नदीकाठच्या गावांचे तर पूर्ण नुकसान झाले. पण माळरानावर असणारी जैनापूर, चिपरी, निमशिरगाव, तमदलगे, कोंडीग्रे, यड्राव, जांभळी, हरोली, संभाजीपूर आणि टाकळेवाडी या गावांचेही नुकसान झाले आहे. कारण वीज नसल्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही. त्या भागातल्या सर्व उपसा जलसिंचन योजना



राजेंद्र यड्रावकर



पूरग्रस्तांच्या छावणीमध्ये जाऊन त्यांची विचारपूस करताना अजित पवार, शेजारी राजेंद्र यड्रावकर, अमरसिंह माने पाटील.

बंद आहेत. परिणामी पिके जळायला लागली. म्हणजे जिरायती आणि बागायती दोन्ही गावांचे पुराने प्रचंड नुकसान झाले. २००५ पेक्षा यंदा ७ फूट पाणी अधिक होते आणि नरसोबाच्या वाडीला पाण्याची उंची २० फूट होती. २००५ ला लोकांनी पुराचे पाणी कुठवर येते हे समजण्यासाठी खुणा करून ठेवल्या होत्या. त्यापेक्षा वर पाणी चढणार नाही असा अंदाज होता. त्यामुळे टी.व्ही., फ्रीज, ओव्हन, कपडे असे महत्वाचे सामान वर ठेवून लोक घराबाहेर पडले. शनिवार-रविवारी काही रस्ते बंद व्हायला सुरुवात झाली. सोमवारी-मंगळवारला पाण्याने प्रचंड रौद्र रूप धारण केले. गुरुवार पर्यंत बोटी आल्याच नाहीत. सर्व सरकारी यंत्रणा आणि प्रसिद्धी माध्यमे यांचे लक्ष कोल्हापूर व सांगली शहरावरच होते. हायवे बंद झाल्यामुळे आमच्याकडे ग्रामीण भागात यायला वाहनांना काही मार्गच नव्हता. २००५ ला जिल्हा परिषदेने ज्या बोटी घेतल्या त्यातल्या ८० टक्के बोटी वापर नसल्याने भंगार झाल्या होत्या. दळणवळणासाठी ७-८ गावातल्या नावाड्यांच्या नावा सोडल्या तर अन्य साधन नव्हते.

तालुक्यात ५२ गावे आणि ३ शहरे आहेत. त्यातली २६ गावे १०० टक्के बाधित झाली. २० गावे ७० ते ८० टक्के बाधित झाली. कुरुंदवाड आणि शिरोळ ही दोन्ही शहरे पूर्ण बाधित झाली तर जयसिंगपूरच्या गल्ली नं. १ मधील १५० कुटुंबे बाधित झाली. आमच्या तालुक्यात जून-जुलैला आडसाली उसाची लागण करतात. जुना ऊस आता दोन-तीन महिन्यात तुटणार होता. ३५ ते ५० कांड्यांचा ऊस तयार होता. पावसाळ्यातला शेवटचा सल्फेटचा डोस टाकलेला होता. नवीन लागणीही पूर्ण झाल्या होत्या. जुना आणि नवा सगळाच ऊस गेला. आता परत नव्याने लागण करावी लागेल. शेतकऱ्यांनी १०० टक्के खर्च केला. पण उत्पन्न काहीच मिळणार नाही. उलट रानातले पीक काढून टाकून वाहून नेण्यासाठी एकरी १० ते १५ हजार रु. खर्च होईल. सरकार तर इतकं दळभद्री आहे ते एकरी ५ हजार रुपये मदत देणार आहेत. त्याने काय होणार आहे? एकरी १ लाख रु. मदत देऊन सगळे कर्ज माफ केले पाहिजे. राज्य शासनाने २३ ऑगस्टला एक जी.आर. काढला आहे. त्यात खरीप हंगामातील पीक कर्ज माफ करणार असल्याचे म्हटले आहे. पण आमच्या तालुक्यात १० टक्के सुद्धा खरीप कर्ज नाही. केळी, ऊस, हळद ही ८ ते १८ महिन्याची पिके तालुक्यात घेतली जातात. शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असणारा शेतकरी सरकारने पीककर्ज व खावटी दिली तरी बाकीच्या कर्जाचे उदा. घर बांधणे, गोठा उभारणे, जनावरांची खरेदी, नवीन कृषीपंप मोटारी व पाईपलाईन घेणे वगैरे. हप्ते कसे भरणार? या सगळ्याचा परिणाम साखर कारखानदारीवरही होणार आहे. एक ते दीड टक्क्याने साखरेचा उतारा कमी होणार. ऊस उत्पादन घटणार. परिणामी टनामागे ३०० ते ३५० रु. शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. साखर कारखाना ७० ते १०० दिवस चालणार. तोडणी मजूर व कारखान्यातील कामगार अडचणीत येणार. परिसरातले उद्योगधंदे, व्यापार, बारा बलुतेदारांचे व्यवसाय यावर विपरीत परिणाम होणार. अगोदरच मंदी मोठी. त्यात हे संकट...



रोहित पवार यांनीही शिरोळातील पूरग्रस्तांच्या छावणीला भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरद पवारसाहेब, माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, 'इस्मा'चे अध्यक्ष रोहित पवार हे सारे जण पुराच्या पाहणीसाठी आले होते. त्यांनी लोकांना धीर दिला.




आमचे म्हणणे मुख्यमंत्र्यांकडे जाऊन मांडले. २००५ च्या पुरात पवारसाहेब ३ दिवस या परिसरात राहिले. १५ ऑगस्टचे झेंडावंदन त्यांनी सैनिक टाकळीत केले. सध्याच्या मुख्यमंत्र्यांनी (देवेंद्र फडणवीस) आमच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. पूरग्रस्तांबाबत अत्यंत उदासीन असे हे सरकार आहे. त्यांना फक्त मते हवी आहेत. राज्य सरकार मदत करीत नसल्यामुळे पूरग्रस्त गावातले काही लोक आमचा कर्नाटकात समावेश करा. आम्हांला आता महाराष्ट्रात राहायचे नाही अशा प्रकारची मागणी करू लागले आहेत. कर्नाटक सरकारने घर पडलेल्यांना लगेच ५ लाख रुपये दिले. महाराष्ट्र सरकारने लोक वाऱ्यावर सोडून दिले.

**१४) श्री. विजय देशमुख (संचालक, शिरोळ बाजार समिती) व श्री. एम. एस. माने :**

उंच रस्ते व पुलांचे मोठे भराव यामुळे पाणी अडून राहते. पाणी बाहेर पडण्यासाठी चारी किंवा मार्ग केलेले नाहीत. त्यामुळे पाणी जागेवरून पुढे सरकत नाही. पुलांना बंधाऱ्याचे स्वरूप देण्याऐवजी फ्लायओव्हर्स केले पाहिजेत म्हणजे पुलाखालून पाणी वाहून जाईल. पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी व तातडीने मदत पुरविण्याकरिता श्री. राजेंद्र यड्रावकर यांनी त्यांच्या साखर कारखाना, शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत मोठी यंत्रणा राबविली. कॅम्पपर्यंत माणसे वाहून नेण्यासाठी शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि शरद इंजिनिअरींग कॉलेजमार्फत ३८ बसेस पुरविल्या. एका दिवसात २४ गावात १६० डॉक्टर व १५ दिवसांची औषधे पाठवून मेडिकल कॅम्प राबविले. पार्वती इस्टेट, सूतगिरणी,साखर कारखाना, जयसिंगपूर शहर येथे माणसे व जनावरांसाठी छावण्या उभारल्या. शरद साखर कारखान्यांमार्फत १०९ एकरातील ऊस जनावरांच्या छावण्यांसाठी उपलब्ध करून दिला.अग्निशामक बंबातून लोकांना पिण्याचे पाणी पुरविले. बायर कंपनी व सोशल फाऊंडेशन मार्फत संपूर्ण तालुक्यात औषध फवारणी केली.

**१५) श्री. गणपतराव पाटील (चेअरमन, दत्तशिरोळ साखर कारखाना)**

पुराने शेतकऱ्यांचे शेतातले पूर्ण पीक गेले आहे. ऊस पिवळा पडून मेला आहे. त्याची विल्हेवाट कशी लावायची असा शेतकऱ्यांना प्रश्न आहे. अजूनही ऊसाची काही राने पाण्याने तुडुंब भरलेली आहेत. प्रचंड चिखल आहे.हे पाणी कसे बाहेर काढायचे ? उभे पीक बाहेर काढण्यासाठी एकरी १०-१५ हजार रुपये खर्च येईल. शिवाय नव्याने लागण करण्यासाठी येणारा खर्च वेगळाच. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज पूर्ण माफ करून नवीन चांगले बियाणे व खते पुरविण्याची व्यवस्था केली पाहिजे. लवकरात लवकर स्थिती पूर्वपदावर येण्यासाठी पूरग्रस्तांना सर्व प्रकारची मदत तातडीने पुरवून धीर दिला पाहिजे. पुन्हा एकदा पूररेषेची आखणी करून पूररेषेच्या आतली अतिक्रमणे काढली पाहिजेत. नवीन गावठाणे वसवली पाहिजेत. कारखानदारीकडेही लक्ष दिले पाहिजे. पुराने खराब झालेला ऊस गळीतासाठी कारखाने आणू शकणार नाहीत. शिरोळ मधल्या ७० हजार हेक्टर उसाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे गाळप कमी होणार आहे. खर्चाचा बोजा वाढणार आहे. त्यासाठी कारखान्यांना व शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देणे गरजेचे आहे. पूरग्रस्तांच्या नियोजनासाठी व कारखान्यांच्या मदतीसाठी सरकारने तज्ज्ञांची एक समिती नेमावी.

पुरात सापडलेल्यांना लोकांना बाहेर काढण्यासाठी आपल्या जीवावर उदार होऊन ज्या नावाड्यांनी काम केले



**पुरातून लोकांना बाहेर काढण्यासाठी मदत केलेल्या नावाड्यांचा डॉ. सा. रे.पाटील फाऊंडेशनतर्फे सत्कार करताना गणपतराव पाटील, डॉ. सुधीर भोंगळे, नगरसेवक सर्जेराव पवार, एम. व्ही. पाटील, गुरुदत्त देसाई व इतर मान्यवर.**

त्यांचा डॉ. सा. रे.पाटील फाऊंडेशनच्या वतीने राष्ट्रवादी व कृषीतीर्थ मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे, फाऊंडेशनचे ध्यक्ष गणपतराव पाटील, नगराध्यक्ष अमरसिंह माने पाटील, कार खान्याचे व्यवस्थापकीय संचालक एम. व्ही.पाटील यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, पाच हजार रुपये देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार झालेल्या नावाड्यांची नावे पुढीलप्रमाणे :-

धुळाप्पा नरसिंह आंबी (आलास), दादेपाशा अफजल पटेल, लायकअली इस्माईल पटेल, रौफ निसार अहमद पटेल (सर्व औखाड) सदाशिव बापू आंबी व धुळाप्पा बापू आंबी (गणेशवाडी), लालासो मारुती आंबी (जुने दानवाड), कल्लाप्पा शिवाप्पा आंबी (खिद्रापूर), भारत आण्णू कोळी (कुटवाडा), शिवाजी बापू जाधव (हासूर), वसंत शिवाप्पा आंबी (शिरढोण), कल्लाप्पा बसप्पा घेरडे (कुरुंदवाड), भिमराव बंडू बेवाडे (बस्तवाड), सुरेश रामा आंबी (कवठेसार), कृष्णात भेंडे (अकिवाट), प्रताप कदम (घालवाड), संजय महादेव गावडे (नृसिंहवाडी), बाबासो राजाराम कोळी (कनवाड) आणि गुरूदत्त देसाई.

**१६) श्री. सुरेश पाटील (माजी महापौर, सांगली व प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)**

कोयना धरण ते आलमट्टी धरण हे अंतर २६४ कि.मी. आहे. सांगली पासून हिप्परगा बॅरेज १२४ कि.मी. अंतरावर आहे. कृष्णामाई संथ वाहते. कोयना ते सांगली ४० फूट उतार आहे. हिप्परगा बराज ते आलमट्टी अंतरही १६४ कि.मी. असून उतार ४५ फुटाचाच आहे. कोयना धरण पहिल्या तीन दिवसातच १०३ टीएमसी भरून टाकले आणि नंतर धरणात व नदीत येणारा आणि धरणाच्या खालचा सगळा येवा (पाऊस) खाली सोडून दिला. धरणपूर्ण भरण्याऐवजी ८० टीएमसीच भरले असते आणि हळूहळू पाणी वरून सोडत राहिले असते तर एकदम कोयनेतून पाणी सोडण्याची वेळ आली नसती. २७-२८ जुलैला आलमट्टी ८२ टीएमसीच होते. ९ ऑगस्टला मी स्वतः हिप्परगी बराजवर गेले होतो. कर्नाटकातील आलमट्टी धरणामुळे सांगली व कोल्हापूर बुडले हे खरे नाही. हा आरोप पटण्यासारखा नाही. पाऊस प्रचंड झाला. धरणातून एकदम मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले. पावसाचे पाणी व धरणातले पाणी नदीपात्रात मावले नाही म्हणून ते चोहोबाजूला पसरले. २००५ मध्ये सांगलीला आयर्विन पुलाजवळ पाण्याची उंची ५४.७ फूट होती. यावेळी ही



उंची ५८.९ फुटाला गेली. प्रशासन आणि पाटबंधारे खात्यातल्या अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वय नसल्यामुळे पुराचा तडाखा जनतेला बसला. आता अधिकारी माहितीचा गोलमाल करताहेत. ७० टक्के सांगली पाण्यात होती.लोकांना २० दिवस पाणी नाही, वीज नाही, अशा स्थितीत राहावे लागले. सरकारकडे बोटी नाहीत. ब्रह्मनाळला बोट उलटली. १७ माणसे मेली. शेवटच्या ९ तारखेपर्यंत एकही मंत्री भेटायला की बघायला आला नाही. मुख्यमंत्री ९ ऑगस्टला आले. त्या दिवशी रेड अॅलर्ट जाहीर केला होता. पण पाऊस आलाच नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री येडीयुरप्पा कितीही फोन केले तरी दाद देत नव्हते. दोघेही एकाच भाजप पक्षाचे असतानाही एकमेकांना सहकार्य करीत नाहीत याचे दर्शन जनतेला घडले.




सुरेश पाटील, माजी महापौर, सांगली

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी मी आलमट्टीला गेलो असताना माझ्याकडून माहिती घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला. मोदींनी ९ ऑगस्टला येडीयुरप्पांना फोन केला. तेव्हा कुठे साडे पाच लाख क्युसेक्सने आलमट्टीतून पाणी सोडले. पूर ओसरायला लागल्यावर बोटी आल्या असा सरकारचा सावळा गोंधळ आहे.

**१७) श्री. दौलत देसाई (जिल्हाधिकारी, कोल्हापूर)**

कोल्हापूर जिल्हा हा अती पावसाचा आहे. पंचगंगा, वारणा, घटप्रभा, दूधगंगा, हिरण्यकेशी, ताम्रपर्णी यासारख्या मोठ्या नद्या जिल्ह्यातून वाहत असून 13 मोठी धरणे आहेत. शिवाय कृष्णा खोऱ्यातील सर्व पाणी कोल्हापूर जिल्ह्यातच येते. कुरुंदवाड, शिरोळ, राजापूर, खिद्रापूर, बस्तवाड, आलास ही मोठी व सधन गावे असून त्यांना कायम पुराचा तडाखा बसतो. घरे, शेती व गावाविषयी प्रेम यामुळे लोकांची स्थलांतरीत होण्याची मानसिकता नसते. शिवाय रोजगाराचा प्रश्न मुख्य आहे. खिद्रापूर, राजापूर या गावांच्या पुनर्वसनासाठी टाकळीला 10 एकर जागा ठेवली आहे. बैठी घरे ही पुरात लगेच सापडतात. या भागात उंच घरे बांधली पाहिजेत. जनावरांचे गोठे वर बांधू शकत नाही म्हणून त्यांच्यासाठी सुरक्षित उंचीवरच्या जागा तयार करुन दिल्या पाहिजेत.

या भागातील लोकांना आपत्ती निवारणाचे प्रशिक्षण देऊन बोटी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत व नवीन बोटी विकत घेतल्या पाहिजेत. पूराचा सामना करु शकेल असे इन्फ्रास्ट्रक्चर या भागात उभे करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी सरकारने तज्ज्ञांची समिती नेमली पाहिजे.



दौलत देसाई, जिल्हाधिकारी, कोल्हापूर

दोन ते तीन ठिकाणी 4 ते 5 फूट पाणी असल्याने नॅशनल हायवे सात दिवस बंद राहिला. हायवेचे डिझाईन करताना पूररेषेचा विचार केला पाहिजे. शिरोली फाट्यापासून उचगावपर्यंत पूर्ण फ्लायओव्हर केला तरी कोल्हापूरचा जगाशी संपर्क तुटतो. वेदगंगा व इतर नद्या ज्या हायवेला क्रॉस करतात, तेवढाच फ्लाय ओव्हर न करता मागे-पुढे 2 कि.मी चा फ्लायओव्हर करावा. 2005 च्या पुरात रस्ते भराव टाकून उंच केले. पण त्यांना बाजूने पाणी जायला मोऱ्या, चर केले नाहीत. वीजेची सबस्टेशन्स, ट्रान्सफॉर्मर यांची उभारणी पूररेषा विचारात घेऊन केली पाहिजे. जॅकवेल, पंप यांची कनेक्टीव्हीटी आता मोबाईलवरही करता येते.

30 जुलै ते 10 ऑगस्ट या काळातील पावसाची सरासरी, धरणातून सुटणारे पाणी व धरणाच्या खालचा फ्री डीसचार्ज या सर्वांचा एकत्रित विचार करुन पाणी व्यवस्थापन केले पाहिजे. जास्तीचे पाणी इतरत्र वाहून नेणे शक्य असल्यास ते काम तातडीने सुरु करावे. चिकोत्रा आणि दूधगंगा ही तुटीची खोरी आहेत. तिथली धरणे दरवर्षी भरत नाहीत. फ्री कॅचमेंन्टचा डीसचार्ज दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची मदत घ्यावी.

वरील सर्व मुलाखतींवरुन व माहितीच्या आधारे या वर्षी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातल्या पुराची स्थिती नेमकी काय होती व लोकांना या पुराचा किती मोठा तडाखा बसला याचा अंदाज आला असेल. आता सरकार, जलसंपदा विभाग, महसूल खाते आणि अन्य यंत्रणांची जबाबदारी व कामगिरी याचा आढावा घेऊन नेमक्या समस्या काय आहेत ते तपासून पाहू.

## आलमट्टीची उंची व त्याची चर्चा

धरणावरील सांडव्याचे (स्पीलवे) दरवाजे असलेला आणि दरवाजे नसलेला असे दोन प्रकार आहेत. दरवाजे नसलेल्या सांडव्यावर आपले काहीही नियंत्रण नसते. त्यामुळे नदीपात्रात किंवा धरणात वरुन जे काही पाणी येईल ते सरळ खाली जाईल. पण दरवाजे असलेल्या सांडव्याचा वापर

पुराची तीव्रता कमी करण्यासाठी होऊ शकतो. उदा. समजा धरणात एक हजार क्युसेक्सचा येवा आहे आणि तो सर्व खाली सोडला तर धोका आहे. मग 300 ते 400 क्युसेक्स खाली सोडला आणि 600 ते 700 क्युसेक्स धरणात साठवून, अडवून ठेवला तर धरणाच्या मदतीने पुराची तीव्रता काही कालावधीसाठी आपण कमी करु शकतो. हे दरवाज्यांमुळे शक्य आहे. महाराष्ट्रात एकही धरण जरी पूर नियंत्रणासाठी बांधलेले नसले तरीही धरणाचा वापर प्रत्यक्षामध्ये वर वर्णन केल्याप्रमाणे पूर नियंत्रणासाठी करु शकतो.

धरण बांधून पूर्ण झाल्यावर दरवाजे वापरण्याची नियमावली (गेट ऑपरेशन शेड्यूल) आणि जलाशय कसे वापरावेत (रिझर्व्हायर ऑपरेशन शेड्यूल) (तांत्रिक भाषेत याला जीओएस आणि आरओएस म्हणतात.) या दोन गोष्टी प्रथम निश्चित कराव्या लागतात. त्या वरिष्ठांकडून मान्य करुन घ्याव्या लागतात. ज्या धरणांना दरवाजे आहेत त्यांना हे सक्तीचे आहे. धरणाचे किती दरवाजे उचलायचे आणि किती उंचीने उचलायचे याचे एक शास्त्र आहे. समजा उजनीला 41 गेट आहेत. त्यातली 5 गेट एक फुटाने उचलायची आहेत. नेमकी कोणती पाच गेट उचलायची हे ठरविणे म्हणजे गेट ऑपरेशन. नदीच्या पात्रात जाणारा विसर्ग हा नदीच्या तीराला धोका निर्माण न करता सरळ जावा हा त्यातला हेतू असतो. उजनीला ५.५ मीटर उंचीचे आणि १२ मीटर रुंदीचे दरवाजे आहेत. साधारणपणे आपल्या धरणांच्या दरवाज्यांची उंची ही साडेपाच, साडेसहा आणि आठ मिटर अशा तीन प्रकारची आहे. याला फक्त अपवाद अप्पर वर्धा आणि गोसीखुर्द धरणाचा आहे. आता 6 लाख क्युसेक्सचा पूर उजनीला आला व तो धरणात साठवून ठेवायला जागाच नसेल तर सर्व पूर खाली सोडावा लागतो. सगळे पाणी काही एकदम धरणातून बाहेर पडत नाही. त्यावेळी मात्र दरवाजे पूर्ण उंचीने व तेही क्रमाक्रमाने आणि टप्प्याटप्प्याने उचलायचे असतात. एकेक फुटाचे टप्पे ते ही एका ठराविक क्रमाने या पद्धतीने दरवाजे उचलावे लागतात.

जलाशय पातळीचे कसे व्यवस्थापन करावे याचेही एक शास्त्र आहे. साधारणपणे आपण असे गृहीत धरतो की 1 जूनला आपला पावसाळा सुरु होतो व 15 ऑक्टोबरला संपतो. पावसाळ्याच्या अखेरीस पाण्याने पूर्ण संचय पातळी गाठावी म्हणजे पावसाळा संपत आला की धरण पूर्ण भरावे. काही ठिकाणी 30 सप्टेंबरला पूर्ण संचय पातळी (एफआरएल) गाठली जाते. कोयनेला पावसाळा लवकर सुरु होतो. लवकर 15 सप्टेंबरला संपतो. धरण परिसरातले पाऊसमान लक्षांत घेऊन 'आरओएस' तयार केलेला असतो. प्रत्येक धरणात पाणी कसे टप्प्याटप्प्याने साचवावे याचे तक्ते नियमावलीत दिलेले आहेत. दर 10 ते 15 दिवसांचा हा तक्ता असेल तर त्याप्रमाणे पाणी साठवावे लागते. यासाठी मागील 30-40 वर्षांची आकडेवारी पाहून पाऊस कसा पडला, कोणत्या पंधरवड्यात किती येवा आला याचा अंदाज

**शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केल्यानंतर अलमट्टी धरणातून ५ लाख क्युसेक्सपेक्षा जास्त विसर्ग सोडण्यात आला.**





पुराच्या पाण्याने नदीलगतच्या जमिनीचा काठ कापून मोठ्या प्रमाणात माती वाहून नेली आहे. त्यामुळे नारळाची मोठी झाडेही पडली आहेत.

घ्यावा लागतो. धरण हाताळणाऱ्या माणसाला असा अंदाजाचा अनुभव लागतो. शिवाय वेधशाळा पावसाचा अंदाज देत असते. त्याच्याशी सांगड घालावी लागते.

खडकवासला, भाटघर, कोयना, भंडारदरा, वारणा, राधानगरी ही धरणे हमखास व नियमित पडणाऱ्या पावसाच्या प्रदेशात आहेत. मांजरा, जायकवाडी, उजनी, गोसीखुर्द ही पठारावरची धरणे आहेत. येथला पाऊस लहरी आहे पण वरच्या भागात पाऊस कसा पडतो यावर ही धरणे अवलंबून आहेत. धरण हाताळणारा माणूस हा प्रशिक्षित ज्ञानी व अनुभवी पाहिजे. अशी माणसे जलसंपदा विभागात किती आहेत? ती प्रशिक्षण देवून तयार केली आहेत का? त्यांची यादी विभागाने प्रसिद्ध करावी. आज वस्तुस्थिती अशी आहे की कनिष्ठ अभियंता आणि त्याच्या हाताखाली असलेला मजूर (बऱ्याचदा तोही कंत्राटी असतो) हे ही हाताळणी करतात. म्हणजे सध्याची परिस्थिती अशी आहे की त्यांच्याकडे ना कुशल, ना अकुशल मजुर आहे. शाखा अभियंत्यालाच प्रशिक्षण दिलेले नाही मग मजुरांना कोण देणार? सगळे शाखा अभियंता मोठ्या गावात, शहरात राहतात आणि त्यांचे वरिष्ठ पुणे, मुंबई, नागपूर औरंगाबादला राहतात. मग प्रश्न पडतो या धरणांचे वाली कोण?

राज्यात दरवाजे असलेले 100 पेक्षा जास्त जलाशय आहेत. बराज त्यात धरले तर ती संख्या आणखीन वाढेल. पावसाळ्यात प्रत्येक धरणावर तीन शिफ्टमध्ये काम करण्यासाठी चार प्रकारची म्हणजे 12 कुशल माणसे लागतात. 1) वायरमन इलेक्ट्रीक - जनरेटर चालविण्यासाठी 2) गेज रीडर धरणातील पाणी पातळी मोजणारा. 3) प्रत्यक्ष गेट ऑपरेट करणारा आणि 4) पुराचा संदेश घेणारा व देणारा अशी तज्ज्ञ, अनुभवी माणसे प्रत्येक धरणावर आहेत का? याचे खरं उत्तर नाही असे आहे.

कर्नाटक राजापूर बंधाऱ्याच्या पलिकडे आहे, तर महाराष्ट्र अलिकडे आहे. कृष्णेला मिळणाऱ्या सर्व नद्यांचा विसर्ग राजापूरला येतो. कुरुंदवाडच्या खाली राजापूर बंधारा आहे. तिथली नदीतल्या पुराची पाणी पातळी आणि जाणारा विसर्ग याचे अचूक मोजमाप कोण घेतंय, त्याची काय व्यवस्था आहे, हे जलसंपदा विभागाने सांगावे. या मोजमापावर पाणी नेमके किती सोडायचे हे अवलंबून आहे. ती मोजण्याची व्यवस्थाच नाही. सगळ्या बाजूने पाणी भरल्यावर दरवाजे ऑपरेट कसे करणार? वस्तुस्थिती अशी आहे की नदीची अचूक पाणी पातळी मोजण्याची व्यवस्थाच नाही. सगळ्या नोंदी अंदाजाने केल्या जाताहेत. धरण ज्या ठिकाणी आहे तिथे ही मोजणीची व्यवस्था करणे शक्य आहे. पण तिथे कुशल माणसे नाहीत ही अडचण आहे. शंभर धरणे हाताळण्यासाठी जलसंपदा विभागाकडे अशी अनुभवी, प्रशिक्षित किती माणसे आहेत? पूर येवो अथवा न येवो त्यांना दरवर्षी प्रशिक्षण दिले पाहिजे. आज सगळा अनागोंदी कारभार चालू आहे. माणसांची गेल्या किती तरी वर्षात भरतीच झालेली नाही. पाणी पातळी अचूकपणे मोजणे हे फार महत्त्वाचे काम आहे. ती पातळी कळल्यावर पाणी किती सोडायचे याचा निर्णय घेता येतो. मग ते काम सोपे आहे.

2005 ला काय घडले हे आपल्याला माहिती आहे. 2006 लाही बराच पूर आला आहे. पूर केव्हाही येतो. तो काही सांगून येत नाही. त्यामुळे संत तुकोबारायांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'रात्रंदिन आम्हा युद्धाचाच प्रसंग' अशी पूरप्रवण भागात काम करणाऱ्या आणि राहणाऱ्या सर्वांची स्थिती असते. एकवेळ शत्रूने सिमेवर हल्ला केला तर तो परतवून लावता येतो पण पुराचे नियोजन जमले नाही तर होत्याचे नव्हते होते. तो सगळ्यांचे सातबारे वाहून नेतो. नामोनिशाण पुसून टाकतो. निसर्गाची ताकद किती मोठी असते याचे दर्शन घडवितो. सांगली, कोल्हापूर, कर्नाटक राज्यातील 2019 च्या पुराचा फटका ज्या भागाला बसला आहे त्या परिसराची पाहणी करुन आल्यानंतर याची सत्यता पटते.

आज कर्नाटक आणि महाराष्ट्र दोन्ही राज्ये आपापल्या पद्धतीने वागताहेत. न्या. ब्रिजेशकुमार यांच्या अध्यक्षतेखालील दुसऱ्या लवादाने दिलेल्या निर्णयांचे अजून कायद्यात रुपांतरण झालेले नाही हे दोन्ही राज्यांना माहिती आहे. तेलंगणाने मध्ये

खोडा घालून ठेवला आहे. 2002 पासून म्हणजे 17 वर्षे झाली लवाद काम करतोय. लवादाचे निर्णय अंतिम होत नाहीत तोवर त्यांना पोसण्याचे काम सरकारला करावे लागते आहे. एक प्रकारे लवाद हा ही पांजरपोळ झालेला आहे. सर्वोच्च न्यायालयेही राज्यांना खेळवत ठेवताहेत. थोडक्यात कोणाचाच कोणाला ताळमेळ नाही ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये सामान्य माणूस भयभीत होऊन भरडला जातो आहे. 28 जुलैपासून वेधशाळा सतत अतिवृष्टीचा अंदाज देत होती. सावध करीत होती. सरकारातल्या एकाही मंत्र्याला, अधिकाऱ्यांना महाभयंकर पूर येणार आहे याची कल्पना येऊ नये याचे नवल वाटते आणि त्यांच्या ज्ञान व अनुभवाची किवही येते. पाऊस सतत पडत होता. वेधशाळेचे संदेश रोज कान ठोकत होते. का दावणीला बांधलेली जनावरे सोडली नाहीत? लोकांना का सक्तीने हलविले नाही? अनेक गोष्टीत सक्ती करणाऱ्या सरकारला ही गोष्ट का करता आली नाही? 2 ऑगस्टला सगळी धरणे भरुन ठेवली. धरण कशा पद्धतीने भरावे हे जलसंपदा विभागातल्या अभियंत्यांना समजत नाही असे म्हणणे धाडसाचे आहे. याबाबत त्यांना विचारले तर ते लोकांवरच ढकलतात आणि म्हणतात, 'पुढे पाऊस नाही झाला तर तुम्हीच म्हणाल पाऊस पडत होता तेव्हा धरण का नाही भरुन ठेवलं? आता पावसाळा संपल्यानंतर पुढच्या वर्षभर पाणी कोठून आणायचे?" या प्रश्नाचे उत्तर युक्तीवादात नाहीये. ते अनुभव आणि ज्ञान व निरीक्षण, अभ्यास यात दडलेले आहे.

राज्यातील सर्व नद्या व धरणांवर किती पाऊस पडतो, किती पाणी येते आणि दरवाज्यातून किती पाणी सोडले जाते याची दर 15 मिनिटांची माहिती उपग्रहाच्या मदतीने नाशिकमधील 'मेरी'च्या जलविज्ञान केंद्रात आपोआप एकत्रित होते. या एकत्रित झालेल्या माहितीचा पूर नियोजनासाठी उपयोग केला का? का त्यावर हळदीकुंकू वाहून पूजा केली. माहिती गोळा करुन त्याचा काय पोळा साजरा करायचा होता? मेरीतले तज्ज्ञ आधिकारी काय करतात? ही माहिती उशाला घेऊन झोपला होता काय? आधुनिक पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचा पूर टाळण्यासाठी उपयोग करता आला असता. तो दोन्ही राज्याच्या अधिकाऱ्यांनी केला नाही ही चूक दुर्लक्ष करण्यासारखी नाही.

नुसता धरणातला विसर्ग महत्त्वाचा नाही. धरणाखालील मुक्त क्षेत्रातला विसर्गही तितकाच महत्त्वाचा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांमधून सोडलेले पाणी आणि धरणाच्या खालच्या भागातील पावसाचे पडलेले पाणी यांची यावेळची आकडेवारी आपण पाहिली तर मुक्त क्षेत्रातला विसर्ग हा चार ते पाच पटीने अधिक आहे. हे दोन्ही विसर्ग नदीपात्रात सामावले जातील का याचा अभ्यास कोण करणार? सर्व नदीपात्रांची अवस्था आम्ही कशी करुन ठेवली आहे हे जरा डोळे उघडून बघा. ते कुणाला दिसत नाही असे नाही. जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. नदीपात्रात प्रचंड अतिक्रमणे झाली आहेत. ही कुणाची कृपा आहे? नद्यांना मोठमोठे घाट बांधून व त्यात विटभट्ट्या उभ्या करुन पात्र अरुंद झाली आहेत. अनेकांनी नदी, नाले, ओढे, ओहोळ बुजवून वा भराव टाकून त्यात शेती सुरु केली आहे. पाण्याचा निचरा व्हायला जागा नाही. वाळूचा उपसा प्रचंड चालू आहे. त्यामुळे भूगर्भात पाणी मुरत नाही. पुराचे पाणी आजूबाजूची जमीन कापते आहे. नद्यांचे काठ कापले गेल्याने नदीपात्र बदलण्याचा व वेगळे वळण घेण्याचा धोका निर्माण झाला आहे. शिवाय गावे व शहरांमधली सगळी घाण, कचरा, राडारोडा नदीपात्रातच टाकला जातो आहे. किती म्हणून गोष्टी सांगाव्यात. आम्हीच नद्यांचे वाटोळे केले आहे.

आज असंख्य लोक म्हणतात कर्नाटकातील आलमट्टी




कर्नाटकातील हिप्परगा बॅरेज

# लोक पुरात, मंत्री देवळात गणपती कसा पावणार?

मुंबईचे तीनही रेल्वेमार्ग मुसळधार पावसामुळे 4 सप्टेंबरला पूर्ण बंद झाले होते. लाखो लोक रेल्वे स्टेशनमध्ये अडकून पडले होते आणि त्याच वेळी केंद्रीय रेल्वेमंत्री पियूष गोयल हे गणपतींची दर्शने व प्रार्थना करण्यात गुंग होते. मिठी नदीने पुन्हा उग्र रुप धारण केले होते. मुंबईकरांचे मेगाहाल होण्यामागे मुंबई महापालिकाही तेवढीच दोषी आहे. संतप्त प्रवासी रेल्वेच्या विरोधात घोषणा देतात, रुळावर उतरतात, रेल्वेगाड्या अडवून धरतात पण ज्या शिवसेनेची गेली जवळपास 25 वर्षे मुंबई महापाालिकेत सत्ता आहे त्यांना काहीही जाब विचारत नाहीत. उलट मते देवून निवडून देतात. त्यामुळे महापालिका जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यापेक्षा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले तर ते म्हणतात, "रुळांवर साचणारे पाणी काढण्यासाठी डिझेलचे पंप बसविले आहेत. ते तंत्रज्ञान जुने व कालबाह्य झाले आहे. नेदरलँड हा देश समुद्रसपाटीखाली आहे. तिथे रेल्वे रुळांवर पाणी साचले तर ॲटोमॅटीक पंप चालू होतात आणि ते उपसून समुद्रात फेकतात. तशी व्यवस्था मुंबईत करायला हवी." याकामी शासन, मुंबई महापालिका आणि रेल्वे यांनी एकत्र येऊन पुढाकार घ्यायला हवा. सुदैवाने रेल्वेमंत्री पियूष गोयल हे मुंबईचेच राहणारे आहेत. परंतु जनतेकडे पाहायला त्यांना कुठे वेळ आहे?

धरणामुळे सांगली-कोल्हापूरला पूर येतो. सांगली-कोल्हापूरपासून आलमट्टीचे अंतर जवळपास 270 कि.मी. आहे. आलमट्टीची पाणी साठवण क्षमता 123 टीएमसी आहे. त्याच्या खाली नारायणपूर हे धरण आहे. त्याची साठवण क्षमता 50 टीएमसी आहे. दोन्ही धरणांची मिळून साठवण क्षमता 173 टीएमसी आहे. आलमट्टी धरणाची उंची 519 मिटर असून त्यांना ती उंची 524 मिटर करण्यास नवीन ब्रिजेशकुमार लवादाने परवानगी दिली आहे. परंतु लवादाचा निर्णयाचे सरकारने अजून नोटीफिकेशन काढलेले नसल्यामुळे त्यांना 524 मिटर उंचीपर्यंत पाणी साठविता आलेले नाही. त्यांनी या उंचीचे दरवाजे बसवून ठेवले आहेत. कर्नाटकाने 524 मिटर उंची करण्यास महाराष्ट्र आणि आंध्रने हरकत घेतली होती. या उंचीचे पाणी जेव्हा कर्नाटक साठवेल तेव्हा आलमट्टी व नारायणपूर या दोन्ही धरणात मिळून 375 टीएमसी पाणीसाठा होणार आहे. आज 123 टीएमसी साठ्यालाच जर सांगली आणि कोल्हापूर बुजत असेल तर 375 टीएमसी साठा आलमट्टीत होईल तेव्हा आपली काय परिस्थिती होईल याचा विचार व अभ्यास केला आहे का? 2005 च्या पुरातही आलमट्टीच्या उंचीचा प्रश्न


सांगलीतील कृष्णा नदीचे अतिक्रमणामुळे अरुंद झालेले पात्र...

निर्माण झाला होता. किंबहुना त्याही अगोदर या विषयीची म्हणजे बछावत लवादाने दिलेल्या निर्णयाची मुदत (31 मे 2000) संपत असताना या विषयीची चर्चा चालूच होती. गेली 25 वर्षे ही चर्चा नुसती चालू आहे. महाराष्ट्रातील जलसंपदा, महसूल व इतर संबंधित अधिकारी व अभ्यासकांनी 524 मीटर उंचीचा काय परिणाम महाराष्ट्रावर होईल हे अभ्यासाने नवीन लवाद व सर्वोच्च न्यायालयाला का पटवून दिले नाही? का न्यायालयच मुद्दाम आपल्या विरोधात होते? तसे असेल तर लोकप्रतिनिधी, खासदार काय करीत होते? त्यांनी संसदेत का आवाज उठविला नाही?

धरणातून सुटलेला विसर्ग आणि मुक्त क्षेत्रातला विसर्ग या दोघांची बेरीज खाली आलमट्टीत जाते. त्यातून आलमट्टीतून किती पाणी सोडावे याचे गणित तयार होते. आलमट्टीतून पाणी सोडण्यासाठी श्री. शरद पवार यांना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करावा लागावा आणि नंतर मोदींनी कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. येडीयुरप्पा यांना फोन करुन पाणी सोडायला सांगावे व त्यानंतर विसर्ग 5.30 लाख क्युसेक्सचा व्हावा हा दोन्ही राज्यातल्या जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांचा पराभव आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा नाही, संवाद नाही, सुसंवाद तर दूरच आहे.

जुलै महिन्यातच दोघांनीही आपली धरणे भरुन ठेवणे ही पहिली चूक आहे. पावसाळ्याच्या तोंडावर व तो सुरु झाल्यानंतर धरणात येणारा विसर्ग व पडणारा पाऊस लक्षांत घेऊन संबंधित तीनही राज्यांच्या अधिकाऱ्यांनी दर 15 दिवसांनी एकत्र येऊन पाणी साठविणे, सोडणे याचे नियोजन करायला नको का? ही व्यवस्था कुणी निर्माण करायची. तुंगभद्रेमध्ये जसे बोर्ड आहे तसे बोर्ड कृष्णेत निर्माण करायला हवे. काश्मीरमधले 370 कलम रद्द करणे केंद्र सरकारला महत्त्वाचे वाटते त्यापेक्षाही हा पाण्याचा विविध राज्यांमध्ये चाललेला वाद मिटविणे हे जास्त महत्त्वाचे आहे. त्यासाठी मोदी सरकारने राज्यघटनेत बदल करुन पाणी हा विषय केंद्र सरकारच्या अख्यत्यारीत घेतला पाहिजे. राज्यांच्या अखत्यारीत हा विषय ठेवणे ही मोठी चूक झालेली आहे. आता हाती दोन तृतियांश बहुमत असल्यामुळे ती चूक पंतप्रधानांनी पुढाकार घेऊन दुरुस्त करावी अशी नम्र विनंती आहे.

Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेक्स (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY ©

The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

# पूरग्रस्तांच्या मागण्यांसंबंधी राष्ट्रवादीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



# राज्यशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात

**मुंबई–** राज्यातील सांगली, कोल्हापूर, सातारा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि कोकणात महापूराची निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता राज्यशासनाने युध्दपातळीवर उपाययोजना कराव्यात याबाबतचे सविस्तर मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. या निवेदनात राज्यातील १० जिल्हे आणि ७० तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. अजूनही काही भागातील पूर पूर्णपणे ओसरलेला नाही. विशेषत: सांगली, कोल्हापूर, सातारा, कोकण, उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार व नाशिक, गडचिरोलीसह विदर्भातील काही भागात महापुराने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. लाखो लोक बेघर झाले असून हजारो कुटुंबांचे संसार उद्‌ध्वस्त झाले आहेत. राज्यात एकूण २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून यामध्ये आणखीही वाढ होण्याची शक्यता आहे.

हजारोंच्या संख्येने पशुधन पुरात वाहून गेले आहे. पुरामुळे पूरग्रस्त भागातील संपूर्ण पिके वाहून गेली असून शेतजमिनींचे मोठ्याप्रमाणावर नुकसानही झाले आहे. पुरामुळे दूध उत्पादनात प्रचंड घट झाली असून यामुळे दूध उत्पादक शेतकरी व दूध संघांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. ग्रामीण भागातील कच्ची, कुडाची, मातीची व पक्की घरे जमीनदोस्त झाली आहेत किंवा येणाऱ्या काळात जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहेत. पूर व अतिवृष्टीग्रस्त भागात हजारो वाहने जागेवरच उभी असून त्यामधील अनेक वाहने नादुरुस्त झाली आहेत. पूरग्रस्त भागात १५ ते २० फूट पाणी साचल्याने घरे व दुकाने सतत दोन – तीन किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी पाण्याखाली असल्यामुळे घरातील व दुकानातील चीजवस्तू व धान्याचे भरुन न येणारे नुकसान झाले आहे. यामुळे छोटा व्यावसायिक व स्थानिक व्यापारी पूर्णपणे कोलमडून पडला असून त्यांच्यापुढे भविष्याची चिंता निर्माण झाली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात, विशेषत: पूरग्रस्त भागात राष्ट्रीय महामार्गांपासून ग्रामीण रस्त्यांपर्यंत मोठेमोठे खड्डे पडले असून काही रस्ते तर पूर्णपणे वाहून गेले आहेत. शहरी व ग्रामीण भागातील अनेक पुलांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. नागरी तसेच ग्रामीण वस्त्यांमध्ये पुरामुळे प्रचंड कचरा वाहून आला असून सर्वदूर दुर्गंधी पसरली आहे. त्याचप्रमाणे गटारे, मलनि:स्सारण वाहिन्या व पाणीपुरवठा वाहिन्या, विद्युत पुरवठा लाईन्स, पोल, ट्रान्स्फॉर्मर व अन्य यंत्रसामुग्री नादुरुस्त झाली आहे. जिल्हा परिषद शाळा, दवाखाने, अंगणवाड्या व शासकीय कार्यालये या इमारतींचेही मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. शहरी भागातील परिवहन सेवेत असलेल्या वाहनांचेही नुकसान झाले आहे. एकूणच नागरी सुविधांचा पूर्ण बोजवारा उडाला आहे.

सांगली, कोल्हापूर, सातारा आणि कोकणात आलेल्या महापुरामुळे, अतिवृष्टीमुळे शेती, घरे, पशुधन, जनावरे, घरातील व दुकानातील चीजवस्तू, धान्यसाठा, उभी पिके, रस्ते, पूल, वाहने, नागरी सुविधा, विद्युत यंत्रणा, शासकीय कार्यालये व उपक्रमांच्या इमारती, दूध व भाजी उत्पादक यांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत जिल्हा प्रशासनाकडून,आपत्ती निवारण यंत्रणांकडून केल्या गेलेल्या उपाययोजना अतिशय तुटपुंज्या होत्या. सरकारने केंद्र सरकारकडे आग्रह धरुन राष्ट्रीय आपत्ती घोषित करण्यासाठी, लष्कराची तात्काळ मदत जागेवर पोहोचविण्यासाठी आणि एनडीआरएफ यंत्रणा कार्यरत करण्याची कोणतीही कार्यवाही केली नाही. ग्रामीण भागाशी तर पूर्णपणे संपर्क तुटला होता, राष्ट्रीय महामार्ग देखील बंद होता. पुरात

अडकलेल्यांना पिण्याचे पाणी, अन्न व औषधे दोन दिवस मिळाली नाहीत. हजारो कुटुंबे बेघर होऊन शाळा, धर्मशाळा किंवा अन्य ठिकाणी आश्रयाचा आली होती. त्यांनाही पुरेसे अन्न, पाणी, औषधे मिळाली नाहीत. होड्यांचीही कमतरता होती. म्हणूनच सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील ब्रम्हनाळ येथील १७ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. संपर्काचा पूर्णपणे अभाव होता, वीज पुरवठाही खंडित करण्यात आला होता. कोकणातील व इतर भागातील पूरपरिस्थितीकडेही दुर्लक्ष करुन चालणार नाही. कोकणातील चिपळूण, राजापूर, खेड, मंडणगड, दापोली, लांजा, संगमेश्वर, गुहागर, रत्नागिरी, रोहा, नागोठणे, म्हसळा, श्रीवर्धन, महाड या ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती होती. कोकणात आंबा, काजू, नारळ यासह मसाला पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. संपूर्ण भातशेती वाहून गेली आहे. काही ठिकाणी जमीन खरडून गेल्याने त्या कायम नापिकी झाल्या आहेत. त्यापूर्वी मुंबई, नवी मुंबई, पनवेल, डोंबिवली, बदलापूर हा संपूर्ण परिसर देखील जलमय झाला होता. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार व नाशिक तसेच विदर्भातील गडचिरोली व इतर जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. परंतु शासनाने कोकणातील नुकसानीसाठी अद्याप कोणतीही मदत जाहीर केलेली नाही.

पश्चिम घाटात सरासरीपेक्षा सुमारे ३०० टक्के जास्त पाऊस झाला. २८ जुलै नंतर दुसऱ्या दिवसापासून धरणातील पाणीसाठ्यातील वाढ नेहमीपेक्षा अधिक होती. याच काळात कोयना जलक्षेत्रात २४ तासात १२ टीएमसी पाणी साठले,यावरुन पाणी साठण्याच्या वेगाची कल्पना येईल. या भागातील नद्यांच्या उथळपणाचीही पूर्ण कल्पना संबंधित यंत्रणेला होती आणि पाणी वाहून जाण्याला मर्यादा निर्माण होत असल्याचेही लक्षात येत होते. त्यामुळे शासकीय यंत्रणेने वेळीच उपायोजना केल्या असत्या तर निश्चितपणे झालेली प्रचंड हानी रोखता आली असती. एवढेच नाही तर दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी हवामान खात्याने कोल्हापूर,सातारा आणि पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावर अतिमुसळधार ते अतिवृष्टी असा इशारा दिला होता. पण यंत्रणेने याकडेही दुर्लक्ष केले. वेगाने वाढणारा धरणांमधील पाणी साठा आणि विसर्गाच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळेच कोल्हापूर, सांगली, सातारा या परिसरात जलप्रलयासारखी स्थिती निर्माण होऊन मनुष्य व वित्तहानी झाली. अलमट्टीतून विसर्ग सुरु करण्यामध्ये अक्षम्य विलंब झाला. कारण अलमट्टीतून होणाऱ्या विसर्गात ९ ऑगस्टपासून वाढ करण्यात आली. शरद पवार यांनी पंतप्रधानांशी व त्यांनी नंतर कर्नाटकच्या मुख्यमंत्री महोदयांशी संपर्क साधला तेव्हा विसर्ग सुरु झाला, पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. हवामान खात्याने दिलेला इशारा, नद्यांमध्ये आणि धरणांमध्ये २८जुलैपासून होणाऱ्या पाणीसाठ्याचा कधी नव्हे एवढा वेग, या भागातील नद्यांचा स्वभाव व त्यामुळे पाणी वाहून जाण्यातील मर्यादा, धरणांमधील पूर्वीचा पाणी साठा, याबाबत जर २८ जुलैपासून योग्य पध्दतीने मॉनिटरिंग झाले असते आणि विसर्गाबाबत शास्त्रोक्तपणे निर्णय झाले असते तर सांगली, कोल्हापूर आणि सातारा या भागातील जनतेला महापुराच्या भयानक परिणामांपासून वाचवता आले असते. पण ही आपत्ती रोखण्यात, आपत्तीचा परिणाम कमी करण्यात आणि आपत्तीला तोंड देण्यात शासन पूर्णपणे अपयशी ठरले.

सांगली, कोल्हापूर, सातारा आणि कोकणातील पुराचे पाणी हळूहळू ओसरु लागले असले तरी पूरग्रस्तांचे जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. पूर परिस्थिती निवळल्यानंतर सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न, साथीचे रोग व अन्य प्रश्न निर्माण होणार आहेत. या आपत्तीत सापडलेल्या नागरीकांना दिलासा देण्यासाठी योजनाबध्दपणे एक विशेष कृती कार्यक्रम तयार करुन आपत्ती निवारणाचे काम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाकडे आम्ही मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी.



# राष्ट्रवादी काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा



# सरकारला घरी बसविण्यासाठी सज्ज व्हा

## राष्ट्रवादीचे विधीमंडळ गटनेते अजित पवार यांचे आवाहन

**शिरुर- हवेली-** शेतकऱ्यांच्या सहकारी बँका वाचवायच्या असतील... शेतकऱ्यांना न्याय हवा असेल... मुस्कटदाबी नको असेल तर आघाडीला सत्ता द्या असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी शिरुर हवेली येथील जाहीर सभेत केले. शिवस्वराज्य यात्रेतील तिसरी सभा शिरुर हवेली येथे जनतेच्या प्रचंड प्रतिसादात पार पडली. शिरूर हवेलीसाठी मी मनापासून निधी देण्याचे काम केले त्यात मी कधीच राजकारण आणले नाही. शेतकऱ्यांची पिकं जळू नये यासाठी मी सदैव प्रयत्न केल्याचे अजितदादा पवार यांनी सांगितले. सरकारे येतात-जातात परंतु सध्या सत्ताधाऱ्यांतर्फे प्रचंड त्रास दिला जात आहे असेही अजितदादा पवार म्हणाले.

महाराष्ट्रात पाणी साचतंय. पूर परिस्थिती आहे. खड्डेच खड्डे आहेत मुख्यमंत्री मात्र महाजनादेश यात्रा काढत आहेत अशी जोरदार टीकाही अजितदादा पवार यांनी केली. देशात प्रचंड मंदीचे वातावरण आहे. शेअर मार्केटमध्ये पैसे बुडाले आहेत. मोटार इंडस्ट्री कोलमडत आहे. मेक इन इंडियाचे काय झाले? किती कारखाने आले? असा सवालही सरकारला केला.

माहिती अधिकार कायदा या सरकारने कमकुवत करून ठेवला आहे. कोणाला काही विचारण्याची व्यवस्थाच ठेवली नाही. सरदार पटेल यांच्या स्मारकासाठी सीएसआरमधून पैसे दिले गेले. पण छत्रपतींचे स्मारक अद्याप बनवले गेले नाही असा आरोपही अजितदादा पवार यांनी केला. आघाडीचे सरकार आणण्यासाठी पावणे दोनशे पेक्षा जास्त जागा आपल्याला जिंकायच्या आहेत. त्यासाठी आतापासूनच कंबर कसा असे आवाहनही अजितदादा पवार यांनी केले. सरकार मूळ प्रश्नांना बगल देते पण आज तुमच्या कांद्याला भाव नाही, तुरीला भाव नाही ही गोष्ट लक्षात ठेवा. उद्या हे ३७० कलम हटवल्याच्या नावावर मत मागतील हा विषय राज्याचा नाही तो भारत सरकारचा निर्णय आहे. आपल्या महाराष्ट्रात असंख्य प्रश्न आहेत त्याबाबत सरकारला जाब विचारा असे आवाहनही अजितदादा पवार यांनी केले. महाराष्ट्रात महागाई आहे... बेरोजगारी आहे... ढासळलेली कायदा सुव्यवस्था आहे... आर्थिक स्थिती कोलमडली आहे. या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा घास या सरकारचा नाही. त्यामुळे या सरकारला घरी बसवण्यासाठी सज्ज व्हा असे जाहीर आवाहन अजितदादा पवार यांनी जनतेला केले.



# काम न केल्यामुळेच महाजनादेश यात्रा फडणवीसांना काढावी लागली

## अधोगतीला चाललेला महाराष्ट्र पुन्हा प्रगतीपथावर आणायचाय...

**राजगुरूनगर** : आज युगपुरुष शिवछत्रपतींचा जन्म झालेल्या शिवनेरीवर जाऊन त्यांच्या समोर नतमस्तक होऊन आम्ही सगळ्यांनी शिवस्वराज्य यात्रा ही शिवनेरी ते रायगड सुरू केलेली आहे. त्यातून तुम्हा सर्वांना भेटायला आणि संवाद साधायला आलेलो आहोत. पावसाळी वातावरण आहे आणि पाऊस धो धो पडतोय, तरी तुम्ही सगळे एवढ्या मोठ्या संख्येने येथे आलात, त्याबद्दल तुमच्या सर्वांचे आभार मानतो. नेहमीच तुम्ही आम्हाला साथ दिली, आशीर्वाद दिलेत. आदरणीय पवारसाहेब स्वर्गीय नारायणराव पवारांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाकरता आपल्याकडे येऊन गेले. सध्या राज्यात वेगवेगळे पक्ष वेगवेगळ्या राजकीय यात्रा काढत आहेत. सत्ताधारी भाजप काढतोय, सत्ताधारी शिवसेना काढत आहे. आज आम्ही सुरू केली आहे. काँग्रेसचा संपर्क चालू आहे. ऑक्टोबरमध्ये विधानसभेच्या निवडणुकीचे मतदान आहे. आपण देशपातळीवर नरेंद्र मोदी साहेबांना दुसऱ्यांदा संधी दिली. अपवाद शिरूर, सातारा, बारामती, रायगड मतदारसंघाचा आहे. काही आहेत. लोकशाही आहे. दिलेला निर्णय आम्ही सर्वांनी मान्य केलेला आहे. 370 कलम रद्द करण्यालाही आमचा पाठिंबा आहे. देशाची एकता, अखंडता...हा अठरा पगड जातींचा देश एकसंध रहावा, त्याच्यात जातीय सलोख रहावा, याबद्दल आमच्या कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. आणि तेच समाजकारण व राजकारण पवारसाहेब अनेक वेळा करत आलेले आहेत. आता पाकव्याप्त काश्मीरही आपल्यात यावा, ही तमाम भारतीयांची इच्छा आहे. अपेक्षा आहे.

केंद्रात दुसऱ्यांदा निवडून दिल्यामुळे ते त्यांचे काम करत आहेत. इथं विधानसभेच्या निवडणुका आहेत. राज्य पाच वर्षे कोणाच्या हातात द्यायचे, भाजप व शिवसेनेने गेल्या पाच वर्षात आपले प्रश्न सोडवले का, कर्जमाफीचा निर्णय दिला. माझ्या राजगुरुनगरच्या जनतेची कर्जमाफी झाली का. नाही झाली. पीक विम्याचे पैसे तुम्हाला मिळाले का, नाही मिळाले. ही खेड तालुक्यातील धरणे, चासकमान असेल, भामा आसखेड असेल,

# नव्या स्वराज्याचा नवा लढा सरकारला सत्तेवरून खाली ओढा

**जुन्नर – नव्या स्वराज्याच्या नव्या लढ्यासाठी राष्ट्रवादीच्या शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ शिवनेरीवरुन त्यांचा आशिर्वाद घेवून आज करण्यात आली. ढोलताशांच्या गजर आणि जल्लोषात या शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात झाली. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, खासदार अमोल कोल्हे, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते शिवनेरीवर उपस्थित होते. यावेळी शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर गडावरील देवीची पुजा व आरती करत नव्या स्वराज्याच्या लढ्याची सुरुवात करण्यात आली. भाजप– शिवसेना सरकारच्या विरोधात पदयात्रा, हल्लाबोल आणि परिवर्तन यात्रा यशस्वीपणे काढल्यानंतर राष्ट्रवादीने शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून सरकारच्या विरोधात शिवनेरीवरुन विरोधाची तुतारी आज फुंकली. या शिवस्वराज्य यात्रेने ६ ते २८ ऑगस्ट या काळात राज्यातील २२ जिल्हे, ८० तालुके आणि ३ हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. या यात्रेचा समारोप रायगड किल्ल्यावर २८ ऑगस्टला झाला.**





कळमोडी असेल, ही धरणे करण्याकरिता तुम्हा घरेदारे जमीन जुमला दिला. लोकांनी खूप काही सहन केले. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे टाकले. आज काय परिस्थिती आहे. माझ्या बारामती, पुरंदर, दौंड इंदापूरच्या कार्यकर्त्यांना परिसरातच थांबायला सांगितले आहे. तिथं जनता अडचणीत आहे. समाज अडचणीत आहे. आम्ही यात्रेच्या निमित्ताने चाललेलो आहे. जसं जयंत पाटील मतदारसंघात गेले, तसं सभापती– उपसभापतींना सांगितले. दत्ता भरणेंनाही सांगितले, तुम्ही इकडं येऊ नका. नीरा नरसिंहपूरला थांबा. खेडकरांनो, काही वेळाने नीरा नरसिंहपूर पाण्याखाली जाईल. दोन लाख क्युसेकपेक्षा जास्त पाणी उजनीचे सोडले आहे. एक लाख क्युसेकपेक्षा जास्त पाणी वीरचे सोडले आहे. संगम होतोय, नीरा नरसिंहपूरला. तिथे नीरा आणि भीमा नदीचा संगम होतोय. तिथून ते पाणी पांडुरंगा जवळून पंढरपूरहून कर्नाटकाला जाणार आहे. हे कोणामुळे घडले, या राज्यातील नाकर्त्या राज्यकर्त्यांमुळे घडलं. आज सांगत नव्हतं हवामान खातं, सातत्याने सांगत होते, पाऊस जास्त पडणार आहे. आमच्या काळातही पाऊस पडत होता. पण आम्ही पडणारा पाऊस आणि सोडायचे पाणी, कॅनाल सोडायचे, या पद्धतीने नियोजन करायचो. परंतु यांनी उजनीचे पाणी सोडायची वेळ आली तरी कॅनालला पाणी सोडले नाही. अशा पद्धतीच नियोजन असते का. माझ्या सोलापूर जिल्ह्याला फायदा झाला नसता का. तीच परिस्थिती इथली आहे. आज चासकमान, भामा आसखेड आहे. भामा आसखेडचे पाणी पुण्याला चालले आहे. हरकत नाही. लोकांचा पाठिंबा आहे. पण, हे पाणी जात असताना तिथल्या लोकांचे प्रश्न सुटले का. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजप व शिवसेनेचे सरकार आहे. का नाही त्या लोकांचे प्रश्न सुटत. याबद्दल उत्तर देण्याची तयारी देवेंद्र फडणवीस साहेबांची नाही.

प्रचंड मंदी आहे. टाटांच्या टेल्कोची काय अवस्था आहे. माहिती घ्या. ज्यावेळी आपले सरकार होते, त्यावेळी माझ्या तळेगावमध्ये, माझ्या चाकणमध्ये, आमच्या रांजणगावमध्ये आपण अनेक भागात कारखानदारी आणली. ही कारखानदारी आणत

असताना आम्ही कारखाने बंद पडू दिले का. रोजगार निर्माण झाला. कॅफे कॉफी डेचे मालक सिद्धार्थ यानी प्रत्येक शहरात शाखा काढल्या. भारताच्या बाहेरही त्याच्या शाखा आहेत. परंतु आज त्याला आत्महत्या कराव्या लागल्या. कशामुळे. मंदीचे हे द्योतक आहे. आज शेअर मार्केट गडगडले आहे. खेडकरांनो, आपल्या भारताच्या जगाच्या अर्थव्यवस्थेत पाचवा नंबर होता, तो सातवा झाला आहे.

हे भाजप शिवसेनेवाले अतिशय बनवाबनवी करत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने बालकोट व पुलवामा ही गोष्ट घडली. आणि लोकं आपले संसार अडचणीत आलेले विसरले. आपल्या मालाला भाव नाही. शेतकऱ्यांना आधारभूत किंमत मिळत नाही. माझ्या शेतकऱ्याच्या, सर्वसामान्य लोकांच्या मुला- मुलींना रोजगार मिळत नाही. नोकरी मिळत नाही. महागाई वाढली होती. तरी लोक विसरली. भारत म्हणून लोकांनी त्यांना मतदान केलं. आता नेमक्या विधानसभेच्या काही राज्यात निवडणुका आल्यात. आणि आता लोकांचे लक्ष विचलीत व्हावे, म्हणून त्यांनी नवीन काही तरी मुद्दा आणला आहे.

हे राजकारण माझ्या खेड आणि राजगुरुनगर परिसरातील जनतेने ओळखे पाहिजे. माझी आपल्याला विनंती आहे की, मागे तुम्ही शिवसेनेच्या उमेदवाराला सातत्याने निवडून देण्याचे काम केले. पण, या वेळेस नवा चेहरा आणि तुम्हा हवा असलेला उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्या रुपाने आम्ही तुम्हाला दिला. तुम्ही त्याचे सोने केले. लोकसभेला नेहमी कित्येक हजारांनी मागे असलेला हा माझा तालुका या वेळेस प्लसमध्ये गेला आणि तुमचा आवाज लोकसभेत उठविण्यासाठी डॉ. अमोल कोल्हे यांना तुम्ही प्रचंड बहुमताने विजयी केले. त्याबद्दल तुम्हाला मनापासून धन्यवाद, मनापासून आभार. याही वेळेस आपल्याला विधानसभेला निश्चितपणाने परिवर्तन करायचे आहे.

शिवस्वराज्य यात्रा कशासाठी काढली आहे, तर आपण सर्व लोकांना बरोबर घेऊन जावं. समाजात जो तणाव आहे, तो दूर व्हावा. बेरोजगारीचे संकट दूर व्हावे. मालक लोकांना, उद्योगपतींना गुंतवणूक करण्यासारखी परिस्थिती राज्यकर्त्यांनी निर्माण करायची असते. पण आताचे राज्यकर्ते तीच परिस्थिती निर्माण करण्यात कमी पडत आहेत. म्हणून अनेक जण कारखाने बंद करत आहेत. खूप कंपन्या बंद पडल्या आहेत.

माझी तुम्हाला विनंती आहे. प्रत्येक तालुक्यात काही ना काही मतभेत आहेत. पण ते कुठपर्यंत ताणायचे, त्याला काही मर्यादा आहेत. मी, दिलीपराव वळसे पाटील आम्ही मंत्रीमंडळात काम करत असताना राज्यात निधी देत असताना करोडो रुपये पुणे जिल्ह्यासाठी आणायचो. तुम्ही मला सांगा, या पाच वर्षात कळमोडीचे कोणते नवीन काम झाले. चासकमानचे कोणते नवीन काम झाले. भामा आसखेडचे कोणते नवीन काम झाले. काहीच करत नाहीत. लक्ष नाही. जे प्रश्न सोडायला पाहिजेत, त्यासाठी प्रशासनाला आदेश दिले पाहिजे. प्रशासनाला झुकायला लावले पाहिजे. तशा पद्धतीने काम हे राज्यकर्ते करत नाहीत. त्यामुळे आपल्याला तशा पद्धतीने बदल करायचा आहे.

मागच्या वेळेस या जिल्ह्याने अजित पवार, दिलीप वळसे पाटील आणि दत्ता भरणे, हे तीन आमदार निवडून दिले होते. एवढ्याने चालणार नाही. 21 जागा पुणे शहर, पिंपरी चिंचवड व ग्रामीण भागात मिळून आहेत. तुम्ही त्यांचा कारभार पाहिला आहे. तुम्ही म्हणसाल, अजित पवार तुम्ही उद्या सरकारमध्ये आल्यानंतर काय करणार. आम्ही पहिल्या चार महिन्यात कायदा करणार की, ज्या ज्या भागामध्ये जे जे कारखाने आहेत, तिथं 75 टक्के स्थानिक लोकांना जागा दिल्याच पाहिजेत. हा कायदा करणार. त्या दिल्या नाही, तर कारखाना सुरू करण्याला परवानगी मिळणार नाही. त्यांना कोणी तज्ज्ञ घ्यायचे असतील तर त्यांनी ते 25 टक्के घ्यावेत. परंतु बऱ्याचदा कारखाने येतात आणि स्थानिकांना वाऱ्यावर सोडतात आणि बाहेरचे लोक कामाला लागतात. त्यांनाही काम भेटले पाहिजे, त्याबद्दल आमचे दुमत नाही. अरे ज्यांचा जमीन जुमला गेला, ज्यांची घरेदारे होती, ती गेली. त्यांना पहिल्यांदा रोजगार मिळायला नको का. आणि त्यामुळे आपल्या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने हाही


उजनीतून सोडलेल्या पाण्याने पंढरपुरातली चंद्रभागा पूरमय झाली.




मुद्दा घेतलेला आहे.

पवारसाहेबांनी तुम्हाला 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. या सरकारने दिलेल्या कर्जमाफीतून किती जणांना रक्कम मिळाली. (प्रेषकातून – रुपया नाही आला). बघा. अक्षरशा मातीत घातलंय. त्यांनी काय टूम काढली. जर माझ्या एका शेतकऱ्यावर पाच लाख रुपये कर्ज आहे, तर त्याला सांगितले की, साडेतीन लाख रुपये भर. मग दीड लाख देतो. अरे शहाण्यांनो, त्याच्याकडे जर साडेतीन लाख रुपये असते, तर त्याने कशाला तुमचे दीड लाख रुपये घेतले असते. साधं गणित आहे. अक्कल नाही का. सरकारला कळत नाही. आणि द्यायचे असेल तर दानत दाखवा ना. दीड लाख तर दीड लाख देऊन मोकळे व्हा ना. बँकेला सांगितले आहे की शेतकऱ्यांनी पैसे भरल्यानंतर अकाउंटला पैसे जमा करायचे. ही कुठली पद्धत. ही काय कर्जमाफी आहे. तुम्ही काय बनवताय लोकांना. फसवताय. खोटं बोलताय. हे आपल्याला थांबवायचे आहे. म्हणून हा आपल्याला बदल करायचा आहे. आम्ही कर्जमाफी द्यायला तीन तीन वर्षे लावली नाहीत.

आज पश्चिम महाराष्ट्रावर या सरकारने सर्वात जास्त अन्याय केला. विजेचे कनेक्शन या खेड आणि राजगुरुनगरच्या लोकांना या पाच वर्षात मिळाले का? देतच नाहीत. खांब नाही म्हणतात. तारा नाही म्हणतात. यांचे सरकार आल्यानंतर सभागृहात सांगितले, जवळपास एक लाख शेतकऱ्यांना सोलर पंप देणार. आणि नंतर ती योजनाच मागे घेतली. अरे म्हणालो, काय झाले, त्या एक लाखाचे. नाही म्हणाले, ते जरा चुकलंच. अरे, पण खोटं कशाला बोललात. मत मिळण्यासाठी हे चालले आहे. माझ्या येथे बारामतीत येऊन धनगर समाजाला सांगितले की, पहिल्या कॅबिनेटमध्ये तुम्हाला आरक्षण देणार. अजून धनगर समाजाला आरक्षण दिले का, नाही दिले. मराठा समाजाला आम्ही लोकांनी दिले होते. ते दुर्दैवाने टिकले नाही. पुन्हा समाजाच्या रेट्यामुळे त्यांना ते द्यावे लागलं. आता सुप्रीम कोर्टात आहे, ते टिकावं, ही आमची भावना आहे. पण, हे आरक्षण देत असताना इतरांवरही अन्याय होऊन देऊ नका. आज ओबीसी समाजावर राजकीय आरक्षणाबाबत अन्याय झालेला आहे. मागासवर्गीयांच्या जागा कमी झाल्या. असं कसं चालेल. ओबीसी समाज 54 टक्के, त्यात त्यांना आरक्षण होते, 27 टक्के. आणि त्याच्यातूनही तुम्ही कमी करता. आणि आता मुख्यमंत्री सांगतायेत की, आम्ही त्यातून मार्ग काढू. अरे, कधी मार्ग काढणार. सरकार तुमचे आहे, तुम्ही मार्ग काढत नाही, अध्यादेश काढताय. आणि आता लोकांना काही थातूरमातूर सांगताय. लिंगायत समाजाला सांगितले की, तुम्हाला काही तरी देऊ. धनगर समाजाला सांगितले की, तुम्हाला एक हजार कोटी रुपये अर्थसंकल्पात देऊ. ही जी काही बनवाबनवी चालली आहे ती तुम्ही लक्षात घ्या.

या सरकारच्या पाच वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील सर्वात जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. कित्येक ठिकाणी आमच्या शेतकऱ्यांच्या मुली आत्महत्या करत आहेत. महिला आत्महत्या करत आहेत. शेतकरी आत्महत्या करत आहे. काल अकोला जिल्ह्यातील सहा शेतकऱ्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला, कारण त्यांना समृद्धी महामार्गाच्या योजनेचे पैसे मिळाले नाहीत म्हणून. कोण जबाबदार आहे त्याला. मुख्यमंत्र्यांनी का त्यांना समृद्धी महामार्गाचे पैसे दिले नाहीत. कोणी अडवलं होतं. का विष घेण्याची पाळी येते. का विषारी औषध घ्यावं लागतं. याबद्दल कोणी बोलायला तयार नाही.

आज वेगवेगळ्या पद्धतीने जातीजातीमध्ये तणाव आहे की नाही. जय श्रीराम म्हटले नाही तर एखाद्याला पार सोलून काढतात. दिलीपराव यांनी आताच सांगितल की, आपल्या सहकाऱ्याला हायकोर्टात जावं लागलं. आम्ही पण सरकारमध्ये होतो. तुमच्या समोर बोलणारा अजित पवार दहा वर्षे पालकमंत्री होता. म्हणून कसाही लोकांशी वागला नाही. आम्ही सत्तेचा गैरवापर केला नाही.


सत्तेची मस्ती आणि नशा डोक्यात शिरून दिली नाही. माझ्याही काळात विरोधक होते. पण, त्यांना कधी पोलिसी खाक्या दाखवला नाही. ठिक आहे, पाचही बोटं सारखी नसतात. काही लोकं असतात. त्याबद्दल दुमत नाही. पण, आज राजकारण कसं चाललंय. त्या कर्नाटकमध्ये आमदारांचा दर 20 आणि 40 कोटी चालला होता. पडलं सरकार. ही अवस्था.

हे कधी महाराष्ट्राने पाहिलंय. पण दुर्दैवाने हे घडतंय. म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा आहे. त्यासाठी डॉ. अमोल कोल्हे तुम्हाला भेटायला आले आहेत. त्याकरता विरोधी पक्ष नेते धनजंय मुंडे तुम्हाला भेटायला आले आहेत. तरुण आहेत. चांगलं काम करतील, हा आम्हाला विश्वास आहे. तुमचा आशीर्वाद पाहिजे. तुमचा पाठिंबा पाहिजे. आणि तो आघाडीला पाहिजे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, अशा अनेक समविचारी पक्षांना एकत्र आणून आम्ही तुम्हाला पर्याय देत आहोत. आम्ही चांगला कारभार करू. नाहीतर मी पुण्यातला आहे आणि तुम्ही पुण्यातले आहात. मला जाब विचारा की, तुम्ही शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आला होतात. आपलं काय त्यांच्या सारखं नाही, बोलून गेल्यानंतर ते तिकडे, तुम्ही इकडं. तुम्ही इकडं आणि मी पण इकडं. त्यामुळे तुम्ही दिलीपरावांना विचारू शकता. मला विचारू शकता. इतर सहकाऱ्यांना विचारू शकता. पाच वर्षे तुम्ही ज्यांना खासदार केले आहे, त्या डॉ. अमोल कोल्हे यांना विचारू शकता. आज निवडून गेल्यानंतर अमोल कोल्हे यांनी लोकसभेत तुमचा आवाज उठविण्याचे काम केले की नाही. मीही आमदार आहे बारामतीचा. मीही विधीमंडळामध्ये आवाज उठविण्याचा प्रयत्न करतो.

मला एका गोष्टीची जाणीव आहे. सामाजिक संस्कार माझ्यावर झालेले आहेत. माझ्या भागातील लोकांच्या सुख-दुखामध्येही मी सहभागी झालं पाहिजे. पण, माझं लोकसभेचं आणि विधानसभेचं काम असेल, तर तेही केलं पाहिजे. काही लोकं लोकसभेचे काम करायचे नाही. नुसतं सुख दुखामध्ये सहभागी असल्याचे दाखवायचे. पण, आवाज कोण उठवणार. उद्या बैलगाडा सुरू करायचा म्हटला, तर तिथं बोलायला नको. बोलणाऱ्याचं काहीही खपतं, न बोलणाऱ्याचा गहूही खपत नाही. ही जुनी रित आहे. त्यामुळे ज्यावेळी डॉ. अमोल कोल्हे यांचे भाषण चाललं होतं, त्यावेळी नवी कोरी पाटी असताना खासदारांनी इतकी चांगली भूमिका मांडली, की देशाच्या पंतप्रधानाला त्यांची नोंद घ्यावी लागली आणि कौतुक करावं लागलं. पवारसाहेबांनी तुम्हाला योग्य उमेदवार दिला आणि तुम्ही तो मतदान करून लोकसभेत पाठवला. काही लोकांचे चालले होते, आता चौकार. अरे, कुठं गेला चौकार. माझ्यावर तर एवढं घसरतात, मावळमध्ये माझा मुलगा पडला. मला त्याचे दुःख आहे. त्या दुःखात किती वेळ बसू. शेवटी माझी बहिण निवडून आली. माझा एक सहकारी अमोल कोल्हे यांच्या रूपाने निवडून आला. त्याचाही मला आनंद आहे. ती गोष्टही नाकारता येत नाही.

माझी आपल्याला विनंती आहे. आपल्या खेडमध्ये आदिवासी समाज आहे. बिगर आदिवासी समाज आहे. शेतीवाडी नसणारा सर्वसामान्य माणूस आहे.

आज या राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे महाराष्ट्र कर्जबाजारी झालेला आहे. महाराष्ट्राच्या शिक्षणाचा खेळखंडोबा झालेला आहे. आता कसलं पोर्टल आणलेलं आहे, पवित्र पोर्टल. तर कशाकरता, भरतीकरता. पण, तुम्हाला भरती करायचीच नाही. यांनी सांगितले होते की नाही, 72 हजार मेगा भरती करणार. परत निवडणूक आली. मेगाभरती झाली का. मी आपल्याला ग्वाही देतो की, आपलं सरकार आणा, पहिल्या सहा महिन्यातच या राज्य सरकारमध्ये जेवढ्या जागा रिक्त आहेत, तेवढ्या भरून टाकतो. काही लाख जागा रिक्त आहेत. पीडीसीसी बँकेत रमेश थोरात, दिलीप मोहिते सारखी मागणी करत



आहेत. बँकेकडे चारशे- पाचशे जागा रिक्त आहेत. ताबडतोब भरायला परवानगी देतो. थांबत नाही. जे गरजेचे असेल, ते केले जाईल. जे योग्य नसेल ते सांगितले जाईल की, हे योग्य नाही. फसवलं जाणार नाही. खोटं बोललं जाणार नाही. दिशाभूल करणार नाही. त्यासाठी ही शिवस्वराज्य यात्रा आहे.

त्या कॅफे कॉफी डेच्या मालक सिद्धार्थ यांनी आत्महत्या केली. त्यांच्या संपत्तीची तुलना होणार नाही. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस. एम. कृष्णा यांचे ते जावई. कृष्णासाहेब आपले राज्यपाल होते. काही दिवसांपूर्वीच ते भाजपमध्ये गेलेत. त्यांची धोरण एवढी अडचणीची आहेत की, सांगता सोय नाही. यांचं सरकार आल्यानंतर लोकांचे काही लाख कोटी रुपये शेअर मार्केटमध्ये बुडाले. आज जीएसटीमुळे तुम्हाला अडचण येत आहे. आज अनेक लोकांचे कारखाने बंद पडत आहेत. काही कारखाने तीन शिफ्टचे दोन शिफ्टमध्ये चालायला लागले आहेत. परवा आकडे आले होते, गाड्यांची विक्री कमी झालेली आहे. म्हणून उत्पादन कमी केलेले आहे. माझ्याकडे पीयाजो कंपनी आहे. तिथून तीन चाकी रिक्षा तयार होते. तिचं उत्पादन कमी झाले आहे. अहो, लोकांना भाविक करून मतं मिळतील, पण प्रश्न सुटत नाहीत. प्रपंच चालत नाही. आता आपल्या सर्वांचे म्हणणे आहे की, इव्हीएम नको बॅलेट पेपर. आम्ही शिक्का कोणाला मारला, हे आम्हाला दिसले पाहिजे.

भुजबळ साहेब शिवनेरीवर आले होते. त्यांच्या भागात पाणी येणार आहे. मीही आलोय. जयंत पाटीलही आले होते. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नका. आता गेलेत आणि आणखीही जातील. काही घाबरू नका. गेले तर गेले. तुम्ही आहात ना. मग काळजी करायची गरज नाही. तुम्ही मजबुतीने रहा. कार्यकर्ता मजबुत असेल तर पक्ष टिकतो. त्यामुळे भिण्याचे कारण नाही. तुम्ही फक्त एकोपा ठेवा. जातीपातीचे, नात्यागोत्याचे राजकारण आपण कधी केले नाही. तुम्ही पण करू नका.

रुमण्याचा हिसका दाखविल्याशिवाय बशा बैल उठत नाही. आता काही काही फिरतात. रुमणंही माहिती नाही, कसं पेरायचंही माहिती नाही. हे पेरताना बघतंय एकिकडं, टाकतंय एकिकडं. काय चाललंय. मला कोणाचीही चेष्टा आणि टिंगलटवाळी करायची नाही. शेवटी माझी पण जात शेतकरी आहे. इथं बसणारे आम्ही बहुतेक शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलेलो आहोत. आता जे कोण कोण यात्रा काढतात, त्यात कोण शेतकऱ्याची मुलं आहेत, ते तुम्हीच तपासा. आणि तुम्हीच विचार करा.

लोकसभेबद्दल भारताच्या जनतेने निर्णय घेतला. त्या निर्णयाबद्दल आम्हाला काही जास्त टीकटिपण्णी करायची नाही. पण विधानसभेच्या निवडणुकीला जस राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, तेलंगना, इथं लोकांनी विधानसभेला एका पक्षाला निवडून दिले. लोकसभेला वेगळ्या पक्षाला निवडून दिले. दिल्लीमध्ये आप पार्टी. अरविंद केजरीवाल तिथं आहेत. त्यामुळे मी जबाबदारीने सांगतो की, लवकरच आम्ही चांगल्या पद्धतीने कोणत्या जागा काँग्रेसला, कोणत्या जागा शेकापला, कुठल्या राष्ट्रवादीला, कुठल्या इतर मित्र पक्षांना, आरपीआयचे काही घटक पक्ष आपल्यासोबत आहेत. हे सगळं आम्ही करू, आघाडीचा जो कोणी उमेदवार दिला जाईल, २८८ मतदारसंघात. आपल्याला फक्त खेड विधानसभा मतदारसंघाचा उमेदवार निवडून आणायचा नाही. खेडला, आंबेगावला, जुन्नरला, शिरूर- हवेलीला आपण लीडला आहोत. आपण मानयनस आहोत, भोसरीला आणि हडपसरला. तिथंही आपण दुरुस्त करण्याचा प्रयत्न करू. इथलं सातत्य टिकवायचं आहे. तिथलं दुरुस्त करायचं आहे.



इथून मागं कधी पाऊस पडला नाही का. 2005 साली मुंबईची काय अवस्था झाली होती. तातडीने परिस्थिती पूर्वपदावर आणली की नाही. बॉम्बस्फोट झाल्यानंतर पवारसाहेबांनी परिस्थिती पूर्वपदावर आणली की नाही. लातूर- उस्मानाबादला भूकंप झाला. साहेबांनी दिवस रात्र तिथं काम केले. परिस्थिती सुधरवली. आता यांचे मुख्यमंत्री- मंत्री मुंबईत बसून आधार द्यायला पाहिजे म्हणतात. पालकमंत्र्यांनी भागाभागामध्ये गेले पाहिजे. मघाशी मला अशोक पवारांचा फोन आला. मांडवगणमध्ये पाणी शिरले आहे. मागच्या वेळेस मंत्री असताना बोट घेऊन आम्ही सर्वांचे प्राण वाचवले होते. आज तिथं कोणी जातंय. सरकार काय करतंय. मंत्री लोकं काय

करतायेत. मंत्री काल नाशिकमध्ये नाचत होता. आणि माझा महाराष्ट्र कितीतरी पुरामध्ये वेढला गेलेला होता. पुरामध्ये बुडाला होता. काल मी मुरबाडमध्ये होतो. पुण्यात शिरणारे सात पूल बंद होते. फक्त हॅरिस पूल चालू होता. हे कळत नाही सरकारला. पाणी किती सोडायचं. किती पाणी सोडल्यानंतर पुलावर पाणी चढणार आहे. नियोजनशून्य जो कारभार आहे, त्याबद्दल आपल्या परिवर्तन करायचे आहे. त्याकरता ही शिवस्वराज्य यात्रा आहे. या यात्रेच्या निमित्ताने अनेकांनी हातभार लावलाय. पैसा हे सर्वस्व नसतं. महाराष्ट्रातील सर्वात कमी पैशातील निवडणूक कोणती झाली असेल तर ती अमोल कोल्हे यांची. तुम्ही ठरवंल होतं. म्हणून म्हणतो, पैसा सर्वस्व नसतं. शिवस्वराज्य यात्रेनिमित्त परवाही बारामतीत पाच- सात लाख रुपये गोळा झाले. परवा शैलेश मोहिते यांनी दोन लाख रुपये दिले. ज्याला शक्य असेल त्यांनी या यात्रेसाठी फूल ना फुलाची पाकळी

नाव पुढे आलेले आहे. कोणाचे नाव पुढे आणायचे, हा त्यांचा प्रश्न आहे. आघाडीचा मुख्यमंत्री म्हणून तुम्हाला बहुजन समाजाचा चेहरा पाहिजे. याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. मी विश्वास देऊ शकतो. चांगल्या पद्धतीचा कारभार करू. आम्हाला अनुभव आहे. मी अर्थ मंत्रालय सांभाळले आहे. दिलीपरावांनी अर्थ मंत्रालय सांभाळले आहे. जयंतरावांनी अर्थ मंत्रालय सांभाळले आहे. अनेक चढउतार आम्ही पाहिलेले आहेत. पवारसाहेबांसारखा राष्ट्रीय नेता आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आमच्या पाठिशी आहे. त्यांना महाराष्ट्राची नस अन् नस माहिती आहे. त्यामुळे त्यातही काही अडचण नाही. महिला, कामगार, आदिवासी, ओबीसी, मागासवर्गीय या सर्व जातीधर्माच्या लोकांना योग्य पद्धतीने पुढे नेण्यासाठी आणि राज्य जे अधोगतीला चाललेले आहे, त्याच्याकरिता राज्य पुन्हा प्रगतीपथावर नेण्यासाठी, स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांचा महाराष्ट्र, युगपुरुष



पूरग्रस्तांची पाहणी करण्यासाठी गेलेल्या मुंबईच्या महापौरांनी महिलेचा हात पिरगळल्यानंतर महिलांनी त्यांना हाकलून लावले.



द्यावी. आपण सरकारमध्ये नाही. सरकारमध्ये असलेल्या लोकांना मदत मिळत असते. जे काही राजकीय पक्ष आहेत, त्यात सर्वात जास्त निधी भाजपला मिळाला. ते सत्तेवर असल्यामुळे त्यांना काही लोकांनी अधिकचा निधी दिलेला असेल. पण, आता ही निवडणूक आपली आहे. मालाला आधारभूत किंमत मिळवून घ्यायची आहे. आपल्याला विजेचे कनेक्शन, ट्रान्सफार्मर, सब स्टेशन, वेगवेगळ्या आपल्या काय समस्या आहेत, त्या सोडवायच्या आहेत.

आता आपल्याला दिलीपरावांनी सांगितले की, रस्त्यांची दयनीय अवस्था झालेली आहे. आता मला फौजियाताई बातमी दाखवत होत्या. मुंबईचे महापौर कुठं पाणी आहे, तिथे पहायला गेले. तिथं काही महिला होत्या. त्यांचं दुःख होतं. त्यांनी एका महिलेचा हातच धरला आणि पिरगळला. ही अवस्था आहे. अरे, आम्हीही सरकारमध्ये असताना लोकं आमच्यावर चिडायची. रागवायची. शेवटी आम्ही पण समजून घेतले पाहिजे. ऐकून घेतले पाहिजे. त्यांना जो राग येतोय, तो शांत केला पाहिजे. अडचणीत असलेल्यांना पुन्हा डाफरून काय उपयोग आहे. ही समाजाची रीत आहे. पण, या राज्यकर्त्यांना याचे काही घेणेदेणे नाही. यांचे कारनामे डोळ्यासमोर ठेवा. म्हणून तुम्हाला भाजपचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस पाहिजे का, की शिवसेनेचे मुख्यमंत्री म्हणून आदित्य ठाकरे यांचे

छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र, हा महाराष्ट्र खऱ्या अर्थानी चांगल्या लोकांच्या हातात देण्यासाठी आपण लोकांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आम्हा लोकांना आशीर्वाद द्या, हीच आग्रहाची, कळकळीची विनंती.

## कारखान्यात 75 टक्के जागा, भूमिपुत्रांना देण्याचा कायदा करू...

**पारनेर** : हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. त्यांच्यानंतर अनेक राज्यकर्ते होऊन गेले. अनेक सरकारे होऊन गेली. आताचंही भाजप- शिवसेनेचे सरकार पाहता, या सरकारने पण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले. जनतेला काही सांगितले. मला या शिवस्वराज्य यात्रेनिमित्त पारनेरकरांना प्रश्न विचारायचा आहे. पाच वर्षापूर्वी देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली जे भाजपाचं सरकार सत्तेवर आलं, त्यांनी कोणते प्रश्न शेतकऱ्यांचे सोडवले. कोणत्या समाजाला न्याय दिला. माझ्या तरुणांची बेकारी हटवली का. माझ्या आया बहिणींना नीटपणाने जगता येईल, अशी सुरक्षितता दिला का. नवीन कारखानदारी आली का.

आता नीलेश लंके यांनी सांगितले की, तुम्ही सुप्यात नोकरी महोत्सव घेतला. मागच्या काळात सुप्यात कारखाने आले, त्यात

लोकांना नोकरी लावण्याचा प्रयत्न तुम्ही केलात. परंतु मी ज्या पुणे जिल्ह्यातून येतो, त्या पिंपरी चिंचवडमध्ये टाटाची जी कंपनी आहे, टेल्कोचे जे युनीट आहे, तिथले कारखाने अनेक अडचणीत यायला लागले आहेत. माल खपाना. मंदी आहे. जगामध्ये पाचव्या क्रमांकावर असणारा, तुमचा माझा देश आज सातव्या क्रमांकावर गेला आहे. मेक इन महाराष्ट्र सांगितले, पण त्यानिमित्ताने कोणतेही नवीन कारखाने आले नाहीत. आज सहकारी साखर कारखानदारी अडचणीत आहे. शिक्षण संस्था अडचणीत आहेत. पतसंस्था अडचणीत आहेत. सरकार त्याच्या| लक्ष घालायला तयार नाही.

मित्रांनो, आपला पारनेर तसा बघितला तर दुष्काळी तालुका. वसंतराव झावरे यांनी मागच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार म्हणून या ठिकाणी काम केले. मधल्या काळात दोन वेळा आपला आमदार या ठिकाणी पराभूत झाला. मला या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने सांगायचे आहे की, बाबांनो तुम्हाला जर पीक विम्याचे पैसे मिळवायचे असतील, पिकवलेल्या शेतमालाला आधारभूत किंमत द्यायची असेल, तुम्ही जो दुधाचा व्यवसाय करताय, त्याला जर दोन पैसे चांगल्या पद्धतीने द्यायचे असतील, बेकारी हटवायची असेल, सर्व जातीधर्माला न्याय द्यायचा असेल, तर भाजप- शिवसेनेचे सरकार हटवून तुम्हाला आघाडीचे सरकार आणावे लागेल. ही विनंती करण्यासाठी मी आले आहे.

लवकरच आम्ही उमेदवार जाहीर करणार आहे. त्या भागातील लोकांची असलेली मागणी बहुमताने पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. पण, या वेळेस पारनेरचा आमदार आघाडीचाच करायचा, असा संकल्प घेऊन आपण सगळ्यांनी सभा संपल्यानंतर घरी गेले पाहिजे.

अतिशय जबाबदारीचा काळ आहे. आपण चुकल्यानंतर त्याची जबरदस्त किंमत मोजलेली आहे. देश पातळीवर तुम्ही नरेंद्र मोदींना निवडून दिलेत, त्याबद्दल मला काही बोलायचे नाही. कारण, ती निवडणूक आता झाली. आता महाराष्ट्राची निवडणूक आहे. देशाच्या निवडणुकीचे प्रश्न वेगळे असतात. 370 वे कलम काढून टाकले. चांगला निर्णय झाला. जे चांगले आहे, त्याला मी चांगले म्हणणार. परंतु मुख्यमंत्री म्हणतात, 10 लाख नोकऱ्या देणार. मला या सभेच्या निमित्ताने त्यांना विचारायचे आहे की, गेल्या पाच वर्षात किती युवकांना नोकऱ्या दिल्या. का तुम्ही मेगाभरती केली नाही. तुम्ही 72 हजार सरकारी भरती करणार होतात. नंतर तुम्ही 36 हजारावर आलात. कोणी तुम्हाला अडवलं नाही. का तुम्ही केले नाही. अनेक सहकारी बँकांत जागा शिल्लक आहेत. त्या भरायला तुम्ही परवानगी देत नाही. एक तर दुष्काळाचे सावट, त्यात तुम्ही जनावरांच्या छावण्या सगळीकडे दिल्या नाहीत. टँकरने सगळीकडे पाणी पुरवठा केला नाही. आता पाऊस पडतोय, तुमचे नियोजन बिघडले आहे. सरकारच्या भोंगळ कारभाराचे हे उदाहरण आहे. पारनेकरकरांनो, त्या उजनीतून दोन लाख क्युसेक आणि वीरमधून एक लाख क्युसेक पाणी सोडून दिले आहे. पंढरपूर पाण्याखाली गेलंय, पांडुरंगाच्या पायाला पाणी लागेल आणि हे सगळं पाणी चाललंय कर्नाटकात. अरे, ते पाणी जर महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना दिले असते, तर तुमचे काय बिघडले असतं. का नाही दिले.

पाच वर्षात येथे शिवसेनेचे आमदार निवडून दिले. सरकारमध्ये शिवसेना, केंद्रामध्ये व राज्यामध्ये शिवसेना व भाजप. माझ्या पारनेर तालुक्याला वरदान ठरणारा कोणता पाटबंधारे विभागाचा प्रश्न यांनी सोडवला. कशाकरता हे निवडून गेले. कोणी सोडवायचे होते, कोणी त्यातून मार्ग काढायचा होता. इच्छा शक्ती नाहीये. एक आपल्या समाजाबद्दल राजकीय इच्छा शक्ती असली पाहिजे. ती आस्था या राज्यकर्त्यांना राहिलेली नाही. त्याच्यामुळे पारनेरच नाही, तुम्ही बारामती घ्या, इंदापूर घ्या, दौंड घ्या, आता आलेला शिरूर हवेलीचा परिसर घ्या. महाराष्ट्रात तशा पद्धतीची कुठलीही कामे झाली नाहीत. म्हणून या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आपल्याला बदल करायचा आहे. त्याकरता आपल्याला पवारसाहेबांच्या विचारांचे सरकार आणायचे आहे. त्याच्या करता आपल्या महाराष्ट्राच्या जनतेला न्याय देणारे सरकार आपल्याला आणायचे आहे. गुंतवणूकदारांना पोषक वातावरण तयार करावे लागते. त्याकरता एक पोषक वातावरण तयार व्हावं लागतं, ते आपल्याला तयार करायचे आहे. आज मंदीच्या काळात शेअर मार्केट कोसळलंय. लोकांचे लाखो रुपये बुडाले. तरी सरकार काही बोलत नाही. आज शेतकरी आत्महत्या करत आहे. आकडे पाहिले तर विश्वास बसणार नाही. का, या भाजप- शिवसेनेने शेतकरी आत्महत्या करणार नाही, अशी धोरणे हाती घेतली. काही भागातील शेतकऱ्यांच्या मुलींना फी भरायला पैसे नाहीत. आपल्या आईबापांना त्रास नको, म्हणून मुली स्वतःचा जीव देतायेत. आत्महत्या करत आहेत.

आज महाराष्ट्राचा कितीतरी भाग जलमय झालेला आहे. जनता पाण्यात आहे. आणि मुख्यमंत्री यात्रा काढत आहे. मुख्यमंत्र्यांचे काम नाही. मुंबईमध्ये बसून महाराष्ट्रातील संपूर्ण धरणांवर कंट्रोल करायचे. तुम्हाला आठवतंय, जेव्हा महाराष्ट्रात दुष्काळ होता, त्यावेळस आम्ही मागणी केली. खालच्या सभागृहात आम्ही, वरच्या सभागृहात धनंजयनी सांगितले की, मुख्यमंत्री महोदय तुम्ही फिरा. कुठं छावण्या दिल्या पाहिजेत. कुठं कामं दिली पाहिजे. कुठं पाणी दिले पाहिजे. टँकर दिले पाहिजे, ते पहा. मुख्यमंत्री म्हणाले, मी मंत्रालयात बसतो. आणि व्हिडिओ कॉन्फरनसिंगद्वारे त्यांनी महाराष्ट्रातील जनतेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. आणि आता मात्र जनतेच्या या अडचणीच्या काळात हेड आफिसला बसायला पाहिजे, त्यावेळी मुख्यमंत्र्यांना राजकारण आठवतंय. ती रथयात्रा चाललेली आहे. त्या पाण्यामध्ये अडकलेल्या माणसाला कोण मदत करणार. ज्यावेळी असा प्रसंग येतो, त्यावेळी पवारसाहेब कृषिमंत्री असताना स्वतः राज्यामध्ये फिरायचे. आम्ही त्यांच्या बरोबर फिरायचो. मी पारनेर, जामखेड, कर्जत त्या भागात दौरे केले. इतर माझ्या कार्यकर्त्यांनी केले, नेत्यांनी केले. परंतु हे सरकार आपल्या जनतेशी समरस झाले नाही. या जनतेचे प्रश्न हे आपल्या घरचे प्रश्न आहेत, हे या जनतेने समजून घेतले नाही. आणि त्याच्यामुळे निव्वळ बोल घेवडे राजकारण केले. उद्योगपती आत्महत्या करत आहेत. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे.

हे सरकार चुकीचे चालले आहे. हे आपण बदलले पाहिजे.

त्याशिवाय तुमच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने समाधान दिसणार नाही. माहितीचा अधिकार कायदा आम्ही आणला. एक जरब बसावी म्हणून आणला. पण, यांनी माहितीच्या अधिकार कायद्यामध्ये बदल केला. का बदल केला, याचे उत्तर सरकार देत नाही. आज सरकार नोकर भरती का करत नाही, याचे उत्तर सरकार देत नाही.

पारनेरकरांनो, मी तुम्हाला शब्द देतो. तुम्ही उद्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत तुमच्या नगर जिल्ह्यातून, महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आमदार निवडून द्या. पावणेदोनशे आमदार निवडून दिल्यानंतर मी आज तुम्हाला सांगतो की, तुमच्या भागात जे कारखाने येतील, 75 टक्के जागा भूमिपुत्रांना देण्याचाच कायदा आम्ही करू. जी तुमची गरज आहे, ती आम्ही कृतीतून करू. कायदा केल्यानंतर कुठल्याही मालकाला बदलता येणार नाही. त्या कायद्यातून पळवाट काढता येणार नाही. तरुणांना त्याच्यातून रोजगार निर्माण होईल. आमचं सरकार आल्यानंतर जागा भरू. राज्यात कितीतरी जागा रिक्त आहेत. तुम्ही पारनेरमध्ये बघा, कितीतरी ग्रामसेवक कमी आहेत. झाल्यावर करणार काय. आज महाराष्ट्रात काही भागात टँकर व छावण्या चालू आहे. हे कोणाचे पाप आहे. का सरकार लक्ष देत नाही. या सरकारच्या काळात 17 रुपये दर घसरला होता. आमच्या काळात 27 रुपये लिटर दर होता. तुम्ही म्हणसाल तुम्ही काय केले होते. आमच्या काळात टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यावर काही संकट आले, कांदा उत्पादक शेतकऱ्यावर काही संकट आले, ऊस उत्पादक शेतकऱ्यावर, कुठल्याही शेतकऱ्यावर अडचण आली, तर आम्ही साहेबांना सांगायचो. साहेब, निर्णय घ्यावा लागेल. धोरण बदलायला लागेल. माल परदेशात निर्यात करावी लागेल. साखर परदेशात पाठवावी लागेल. त्याशिवाय मार्केट सुधारणार नाही. दुधाची पावडर परदेशात पाठवावी लागेल. त्या शिवाय दुधाला डिमांड येणार नाही. माझ्या शेतकऱ्याचा हाताला 15 दिवसाला पैसा देणारा तो व्यवसाय आहे. त्याच्यातून शेतकरी कुटुंब संसार चालवत आहे. दुष्काळी भागाला वरदान ठरणारा हा धंदा आहे. त्याच्यातून मदत झाली पाहिजे. कुकुटपालनाला मदत झाली पाहिजे. साहेब ते



दोन- दोन, तीन- तीन गावांना मिळून तलाठी देतायेत. तलाठी कमी आहेत. शिक्षक कमी आहेत. कृषी खात्यातील अधिकारी कमी आहेत. पोलिस दलात लोकं कमी आहेत. पाटबंधारे खात्यात लोकं कमी आहेत. ऊर्जा खात्यात लोकं कमी आहेत. भरत नाहीत. का. लोकांना काम मिळेल म्हणून भरत नाहीत. मी तुम्हाला शब्द देतो, आमचे सरकार आणा. पहिल्या सहा महिन्यात जेवढ्या लाख जागा रिक्त आहेत, तेवढ्या जागा भरण्याचा प्रयत्न करू. सर्व समाज घटकांना न्याय देण्याचे काम करू.

आम्ही सरकारमध्ये असताना 71 हजार कोटींचे कर्ज माफ केले. तुमचे आता कर्ज माफ झाले का. तीन तीन वर्षे कुठं कर्ज माफ करत असतात का. शेतकऱ्यांना वीज देऊ. आज माझ्या पश्चिम महाराष्ट्रातल्या सरकारला वीज मिळत नाही. आज प्राथमिक शाळेत शिक्षक नाहीत. शिक्षक नसतील तर पोरं शिकणार काय आणि मोठं करायचे, पण आताच्या सरकारमध्ये ते करायला कोणी तयार नाही. हे आशा यात्रा करत नाही.

हे बघा, कांदा उत्पादकांना दोन रुपये अनुदान दिले नाही. नाही दिल तर दाबा बटण आमचं, आम्ही देऊ. का काळजी करताय, आपल्यात धमक आहे. त्याच्यात नाही दिलं तर आम्हाला जाब विचारा. माझा पुणे जिल्हा लांब नाही. तुम्हाला लागूनच पोपटराव गावडे यांचा भेट वगैरे भाग येतो. त्याच्यामुळे कधीही हक्काने येऊ शकतो. पारनेरकरांनो, मी भाजप- शिवसेनेसारखं खोटं बोलणार नाही. ते म्हणतात, पाच वर्षाने काय ते पाहू, आता सांगू.

धनगर समाजाला माझ्या बारामतीत येऊन आरक्षण देतो म्हणून सांगितले होते, मिळालं. नाही. कोण जबाबदार आहे. सरकार जबाबदार नाही? त्यांच्या भावनांशी खेळत नाही. लिंगायत समाजाला आता निवडणुका आल्यावर काही तरी आश्वासन देण्याचे

काम चालले आहे. मतं कशी मिळतील, एवढा त्यांचा एकमेव कार्यक्रम असतो.

त्यांना ग्रामीण भागाशी काही देणंघेणं नाही. आज रस्त्यांची अवस्था काय आहे. करोडो रुपयांची भाषा करतात, पैसा जातो कुठं. पाच वर्षात यांनी चिक्कीमध्ये घोटाळा केला होता. धनंजय मुंडेंनी काढला की नाही. उत्तर काय दिलं. आदिवासी मुलामुलींना जो साहित्याचा पुरवठा होतो, त्यात भ्रष्टाचार केला. त्याच्याबद्दल बोलायला तयार नाही. एकनाथराव खडसेंना का काढले, त्याचं उत्तर द्या महाराष्ट्राला. त्याबद्दल सांगत नाही. मध्यंतरी जयंत पाटलांनी वेगवेगळ्या मंत्र्यांचे घोटाळे काढले. त्याचे उत्तर दिले नाही. धनंजय मुंडे यांनी 22 मंत्र्यांचे घोटाळे सभागृहात पुराव्यानिशी दिले. नाही म्हटले, सगळं क्लीन आहे. काय पद्धत आहे. अरे, खरं ते खरं बोलायला शिका ना. मी सांगतो, यांनी काही काही पतसंस्थाही अडचणीत आणल्या आहेत. मला वाटतंय, आता नवीन कायदा करतायेत. पतसंस्थांनाही इनकम टॅक्स लावत आहेत. जिथं जिथ टॅक्स लावताय येईल, तिथं तिथ टॅक्स लावण्याचे काम चालू आहे. शेतकऱ्यांच्या मार्केट कमिट्या कशा अडचणीत येतील, हा धंदा या राज्यकर्त्यांचा चाललेला आहे. याला उत्तर काय, हे सरकार बदलणे, एवढेच उत्तर आहे. त्याकरिता हे सरकार बदलले पाहिजे.

मी इथं येऊन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नमस्कार केला. ही आपली दैवते आहेत. आजही आपण त्यांच्या पुढे नतमस्तक होतो. त्यांनी दाखवलेल्या रस्त्याने पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. पण, यांनी त्यांची स्मारक केली नाही. जनतेच्या भानवेशी खेळले. तुम्ही तुमच्या पारनेरच्या आमदाराला विचारले पाहिजे, काय काम केले. पीक विम्याची रक्कम कुठे जमा केली. काल मुख्यमंत्री जाणार म्हणून सहा शेतकरी विष प्याले.

पण, हे रथयात्रा काढतायेत. त्यात सांगा ना किती कर्जमाफी केली. किती तरुणांना रोजगार दिली. पण, हे सांगातायेत काय, आमचे 220 आमदार निवडून येणार आहेत. यांच्या काकांनी सांगितलंय. काही लोकं स्वार्थासाठी चालली आहेत. काही लोकं उगवत्या सूर्याला नमस्कार करणारी असतात. पण, कार्यकर्ता निष्ठेने काम करत असतो. चढउतार येत असतात. प्रपंच करत असतानाही अडचणी येत असतात. कधी सुगीचे दिवस असतात. कधी दुष्काळाचे दिवस असतात. कधी दुष्काळात तेरावा महिना येत असतो. असलेही दिवस आपण पाहिलेत. आता आपण नवीन चेहरे देण्याचा प्रयत्न करतोय. नवीन उमेदवार देण्याचा प्रयत्न करतोय. आपण काही महिलांना उमेदवारी देतोय. जे खरोखर समाजाचे भले करणार आहेत, अशांना आपण उमेदवारी देणार आहोत. पारनेरमध्ये तुमच्या सगळ्यांच्या मनातला उमेदवार देण्याचे मी काम करेन. फक्त कुठंही वाद घालू नका. लोकशाहीत प्रत्येक कार्यकर्त्याला मागणी करण्याचा अधिकार असतो. त्यांनी का मागणी केली म्हणून कोणी टिकटिपण्णी करू नका.

आपल्याला कॉँग्रेसलाही बरोबर घ्यायचा आहे. शेकापलाही बरोबर घ्यायचा आहे. मागच्या वेळी वंचित आघाडीने उमेदवार उभे केले आणि आम्ही उमेदवार उभे केले. मतांची विभागणी झाली आणि आपल्या आणि त्यांच्या कित्येक उमेदवारांचा पराभव झाला. तशा पद्धतीने आपण सगळे एक राहिलो, तर महाराष्ट्रात 100 टक्के बदल होऊ शकतो. त्याच्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही. हे आपण लक्षात ठेवा. मागच्या वेळेस लोकांनी नरेंद्र मोदीसाहेबांना पाहून मतदान केले. आता महाराष्ट्राचे राजकारण नरेंद्र मोदी करणार नाहीत. तर तुम्ही आम्ही करणार आहोत. भाजप शिवसेनेचे लोकं करणार आहेत. त्यामुळे लोकांचे मतपरिवर्तन करून, तुमचे लक्ष विचलित करून, आजचे जे तुमचे प्रश्न आहेत, त्यांना बगल देऊन काही तरी नवीन मुद्दा पुढे आणण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या त्या तसल्या बनवाबनवीला बळी पडू नका. आपण आता खरं काय आणि खोटं काय, हे ओळखले पाहिजे. कोण आपल्याला खरं सांगतोय, कोणाला शेतकऱ्यांचे प्रश्न माहिती आहेत. कोणी मागं काम करून दाखवलं आणि कोणी दिशाभूल केली, हे सगळ्यांना माहिती आहे. पवारसाहेबांचा सांगावा मी घेऊन आलो आहे. तुम्ही आघाडीचा उमेदवार निवडून दिला पाहिजे. गहाळ राहू नका. रात्र वैऱ्याची आहे. आता फसायचे नाही. आघाडीचेच सरकार आणायचे.




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



# आता रडायचं नाही तर लढायला शिका

**छगन भुजबळ**

**जुन्नर :** एक दिन वक्त भी आपका गुलाम होगा... या शायरीचा किस्सा सांगत आता रडायचं नाही तर लढायला शिका असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपमुख्यमंत्री आमदार छगन भुजबळ यांनी जुन्नर येथील जाहीर सभेत केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेवून कर्जमाफी देण्याची घोषणा केली परंतु किती लोकांना मिळाली. आज छत्रपती असते तर यांचा सगळ्यांचा कडेलोट केला असता असेही छगन भुजबळ म्हणाले.

विम्याच्या बाबतीत तेच करण्यात आले. १४३ कोटी फायदा एका जिल्ह्यात झाला आहे आणि आज सत्तेतील लोक पीकविमा कंपन्यांवर मोर्चा काढत आहेत असा टोला शिवसेनेला लगावला. या सरकारने पाच वर्षांत दोन लाख कोटी कर्ज वाढवले आहे. कॉफी डेच्या मालकाने आत्महत्या केली. आज व्यापारीही आत्महत्या करत आहेत. मात्र अदानी अंबानी यांनाच चांगले दिवस आले असल्याचे छगन भुजबळ म्हणाले.

आजपासून ही यात्रा सुरु करत आहोत ते यश तुमच्या हातात आहे. येत्या काळात कोण सत्तेत येणार हे ठरणार आहे. कुणाचे आरक्षण कमी करु नका असे सांगूनही आरक्षण कमी केले जात आहे. याचा विरोध आपण केला पाहिजे. पवारसाहेबांनी जे दिले ते काढून टाकण्याचे काम हे सरकार करत आहेत असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. जर पुन्हा सत्तेत येणार आहात तर न घाबरता बॅलेटपेपरवर निवडणूका घ्या असे आव्हान छगन भुजबळ यांनी सरकारला दिले. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा परंतु आपसात नाही असे सांगतानाच या शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून हे सरकार घालवल्याशिवाय थांबायचे नाही असे आवाहनही छगन भुजबळ यांनी केले.

शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी द्यावी व त्यांचा सातबारा कोरा करून नवीन पीक कर्ज द्यावे या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सतत तीन वर्षे संघर्ष केला, लढा दिला, संघर्ष व परिवर्तन यात्रा काढली, गावोगावी मोर्चे काढून आंदोलन केले. विधानमंडळाचे कामकाज बंद पडले. प्रसंगी आमदारांनी निलंबन सोसले पण सरकार इतके कठोर हृदयाचे की त्याने काही सरसकट कर्जमाफी दिली नाही. सत्तेवर येण्यापूर्वी संपूर्ण कर्जमाफी करू, धनगर, लिंगायत यांना आरक्षण देऊ, असे आश्वासन दिले होते. एकाही आश्वासनाची सरकारने पूर्तता केली नाही. अच्छे दिनाच्या नावाखाली सरकारने लोकांना वाईट दिवस आणले असून नोटबंदी व जीएसटी सारखे चुकीचे निर्णय करून लाखो लोकांवर बेकारीची कुऱ्हाड मारली आहे. मोदी सरकारच्या या निर्णयांमुळे लाखो उद्योगधंदे बंद पडले असून आज जनतेला आर्थिक मंदीचा मोठा सामना करावा लागत आहे. या मंदीतून लवकर अर्थव्यवस्था बाहेर पडण्याची शक्यता नसून ती दिवसेंदिवस आणखीन गहिरी होत जाईल असे भाकीत व्यक्त होत आहे. त्यामुळे मोदी व फडणवीस सरकार हे जनतेच्या मूळावरच आले आहे असे चित्र आपण पाहात आहोत. यातून बाहेर पडण्यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीत युती सरकार सत्तेवरून खाली खेचणे हाच आपल्यापुढे पर्याय आहे, असेही भुजबळ म्हणाले.

# भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून मतदान करा...

## जयंत पाटील




**जामखेड** : आपल्या भागाला दुष्काळाची झळ किती बसली आहे, याची आम्हा सर्वांना जाणीव आहे. महाराष्ट्रात एका बाजूला पूर आहे. निसर्गाची दोन अवस्था गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राने, देशाने पाहिले आहे. ज्या भागात दुष्काळ आहे, त्या भागातील शेतकऱ्याला कसं जगावं, हा प्रश्न पडलेला आहे. आपल्या तालुक्यातही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आपल्या पलिकडील नगर तालुक्यातील तीन जणांनी तीन ऑगस्टपासून 24 ऑगस्टपर्यंत आत्महत्या केल्या. राज्य सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना माझ्या राज्यात आत्महत्या होत आहेत आणि माझ्या राज्यातला बराचसा भाग दुष्काळामुळे होरपळत आहे. माझ्या राज्यातला बराचसा भाग पूर आल्यामुळे संकटात आहे. याचं शल्य नाहीये. महाजनादेश यात्रा काढून महाराष्ट्रभर फिरायचे आणि पुन्हा आपली सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा, हे काम राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे चालू आहे. अशी महाजनादेश यात्रा काल आपल्या गावात आली होती. पाच वर्षात या सरकारला जे जमले नाही, दुष्काळातल्या प्रत्येक खेडेगावात आणि शहरात टँकरचे पाणी देण्याचे काम रोहितदादांनी सुरू केल्यानंतर या सरकारला जामखेडच्या पाणी पुरवठ्याची आठवण झाली. पाच वर्षे तुमचे हात कोणी धरले होते. आता तुमचे सरकार येणार की नाही, हे माहित नाही. या भागातल्या लोकांचा पाठिंबा कमी झालेला आहे. म्हणून या भागातील आपल्या मंत्रीमंडळातील मंत्री निवडून यावा म्हणून राज्याच्या प्रमुखांनी येथे येऊन काही घोषणा केली. तुम्ही पाच वर्षे सत्तेत आहात, तुमचा निवडून गेलेला माणूस याच जिल्ह्यात पालकत्व करत आहे. उजनीच्या बॅकवाटरमधून पाणी आणायला तुम्हाला काय पाच वर्षे लागली. आज महाराष्ट्रातील आणि जामखेडमधील माणसं तोंडात शेण घालायला लागली, त्यावेळी त्यांना उजनीच्या बॅकवाटरमधून पाणी आणायची घोषणा करावी लागली. त्याचे श्रेयही रोहितदादांना द्यावे लागेल. यात माझ्या मनात शंका नाही.

आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणखी एक गोष्ट केली. अजून निवडणुका लांब आहेत. आचारसंहिता जाहीर झालेली नाही. पण येणाऱ्या निडणुकीमध्ये मी या माणसाला मंत्री करणार आहे, हे मुख्यमंत्र्यांना इथं येऊन सांगण्याची गरज वाटली. देवेंद्र फडणवीसांना मला सवाल आहे की, निवडून आला तर याला मंत्री कराल. जर तुमचा माणूस निवडूनच आला नाही, तर त्याला मंत्री कसा करणार. तुम्हाला या ठिकाणी आमच्या रोहितदादांचा प्रभाव लक्षात आल्यानंतर घोषणा करावी लागली. सांगावं लागलं की, या शहराला पाणी देतो. आमच्या या मंत्र्याला पुन्हा मंत्री करतो. महाराष्ट्र तुमच्या ताब्यात देण्याचे काम अजून महाराष्ट्रातील जनतेने केलेले नाही.

महाराष्ट्रामध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पक्षांतराचा बाजार




मांडला आहे. जो दिसेल त्याला म्हणतात, ये पक्षात. काहींच्या मागे चौकश्या लावल्या आहेत. काहींच्या मागं वेगवेगळ्या ईडीसारख्या गोष्टी लावण्याचे काम चालले आहे. दिसेल त्याला भिती घालायची आणि आपल्या पक्षात बोलवायचे, असं काम चाललं आहे. असा पक्ष कधी वाढतो का. भाजपमध्ये ज्यांनी गेल्या 40-50 वर्षे खस्ता खाल्ल्या ते आज सतरंजी उचलण्याचे काम करत आहेत आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधून गेलेले त्यांना भाषण ठोकायला लागले आहेत. ही भाजपच्या कार्यकर्त्यांची अवस्था आहे.

महाराष्ट्रात अनेक नेत्यांना वेगवेगळी आमिषे दाखविण्याचे काम चालू आहे. आपल्या जिल्ह्यातच ज्यांच्या गाडीवरचा दिवा कधी शरद पवारसाहेबांनी विझू दिला नाही. ज्यांना कायम सत्तेत ठेवलं. ज्यांना कायम सत्तेची झूल पांघरण्याचे काम पवारसाहेबांच्या ताकदीतून झालं, ही माणसं शरद पवारसाहेबांना सोडून गेली. जाताना म्हणाली, मतदारसंघाचा विकास झाला नाही, तो करण्यासाठी आम्ही भाजपमध्ये चाललोय. गेली 30- 40 वर्षे जेव्हा जेव्हा मंत्रीमंडळ झाले, त्यावेळी मधुकारराव पिचड यांना मंत्रीमंडळात स्थान कोणी दिलं, तर शरदराव पवारसाहेबांनी दिलं. थोडेसे अडचणीचे दिवस झालं तर सोडायची काय गरज होती. एवढा मोठा विश्वास पवारसाहेबांनी टाकला. आणि संकट आल्यावर तुम्ही पळून गेला. असे अडचणीचे दिवस सगळ्यांना येत असतात. अ गेला तर ब आहे. ब गेला तर क आहे आणि क गेला तर ड आहे. कारण, आमच्याकडे शरद पवार नावाचे विद्यापीठ आहे. मला तर बरं वाटतं की, ज्यांनी अनेक वर्षे खुर्च्या अडवून ठेवल्या होत्या, ती माणसं आता बाजूला होत आहेत. पक्ष सोडून जायला लागली आहेत. जे सत्ता सोडून जगू शकत नाहीत, ते दुसऱ्या बाजूला जाऊन दुसऱ्या पक्षाला मिळायला लागले आहेत. मला नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची एक नवी संधी मिळाली आहे.

रोहितदादांसारखा एक नवा चेहरा या मतदारसंघात येत आहे. या नव्या चेहऱ्याचे तुम्ही कसे स्वागत केले, हे मी पाहिलंय. हा आमचा शिवस्वराज्याचा झंझावात महाराष्ट्रात सगळीकडे जात आहे. त्याचे नेतृत्व डॉ. अमोल कोल्हे आणि काही तरुण करत आहेत. राष्ट्रवादीमध्ये नव्या चेहऱ्यांना नेहमीच संधी दिली होती. 99 मध्ये ज्यावेळी राष्ट्रवादीचे पहिल्यांदा सरकार आले. त्यावेळी पवारसाहेबांनी आम्हा सर्वांना कामाची संधी दिली. आता पुन्हा 20 वर्षानंतर पुन्हा एकदा संकटात जेव्हा कार्यकर्ते आणि नेते कळतात, त्या निष्ठावंतांना संधी देण्याचे काम आमचा पक्ष करणार आहे.

मी आपणा सर्वांना विनंती करतो की, अनेक बातम्या ऐकल्या असतील. चिंता करू नका. शरद पवार नावाचा हा एक विचार आहे. ती आता काय व्यक्ती राहिली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा त्यांच्या विचारातून तयार झालेला पक्ष आहे आणि याच पक्षाची धास्ती भाजप

आणि शिवसेनेला जास्त आहे.

आज देशाची परिस्थिती काय आहे. लोकसभेच्या निवडणुकीत आम्ही सांगितले की, नोटबंदी आहे. अर्थकारणाची संकटे तयार होतील. जीएसटी चुकीच्या पद्धतीने लादली आहे. आपली फार वाईट अवस्था होईल. देशभर मांडलेल्या या मुद्द्यांना लोक प्रतिसाद देत होती. पण पुलवामामध्ये अचानक स्फोट झाला. आपण पलिकडे पाकिस्तानवर हल्ला केला. आणि देशातील जनतेचे मन हे फार मोठ्या प्रमाणावर राष्ट्रप्रेमाने भारून आलं. आमचा पराभव झाला. आम्ही तक्रार करत नाही. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जनतेच्या मनात जे आलं, त्याचा आम्ही आदर करतो. पण, लोकसभेच्या निवडणुकीवेळी आम्ही जे मुद्दे मांडत होतो, ते मुद्दे मित्रांनो आज खरे व्हायला लागले आहेत.

लोकसभेच्या निवडणुका होऊन गेल्या. काही महिन्यांचा काळ उलटलेला आहे. तुमच्या घराघरातील मुलं सुप्याच्या, नगरच्या, पुण्याच्या, पिंपरी चिंचवडच्या कारखान्यात नोकरी करत

एकेकाळी डॉ. मनमोहन सिंग आपल्या देशाचे प्रधानमंत्री होते. त्याच्या आधी देशाचे अर्थमंत्री होते. त्यांच्या काळात अर्थव्यवस्थेभोवती जी कवचकुंडले डॉ. मनमोहन सिंग यांनी तयार केलेली होती, त्यामुळे जगात कोठेही मंदी आली, तरी भारतातील सर्वसामान्य माणसाच्या डोक्यावर कधी कुऱ्हाड कोसळली नाही. अमेरिकेत लेमॅन नावाची वित्तीय संस्था बुडाली. त्यानंतर संपूर्ण अमेरिका आणि युरोप खंडामध्ये बेकारी निर्माण झाली. फार मोठे आर्थिक आरिष्ट्य निर्माण झाले. त्यातून दोन्ही खंडांना बाहेर येण्यासाठी काही वर्षे लागली. पण, भारतामध्ये मनमोहन सिंग असल्यामुळे कोणाच्या नोकऱ्या गेल्या, कोणाचे उत्पादन घडले, कोणाची विक्री कमी झाली, असं कधी झालं नाही. यंदा मात्र भारतामध्ये मंदी आली. ती रोखण्याची ताकद दिल्लीत बसलेल्या सरकारमध्ये नाही. आणि म्हणून सगळ्यांवर बेकारीची कुऱ्हाड आली. मागच्या वर्षामध्ये एक कोटी 10 लाख लोकांचा रोजगार भारतातील गेला आहे. परवा औरंगाबादला जाण्यासाठी माझ्या



असतील, तर त्यांना जाऊन विचारा की, बाबा तुझी नोकरी व्यवस्थीत आहे की नाही. तोच तुम्हाला सांगेल, बाबा मी प्रयत्नाची शिकस्त करतोय, पण मी ऐकतोय की आमचा कारखाना बंद होणार आहे. आमच्या कारखान्यात कामगार कमी होणार आहे, त्याचा परिणाम म्हणून मी गावाकडे येणार आहे. दुष्काळ असला तरी माझ्या वाट्याची जमीन माझ्याकडे द्या, ती मी करणार आहे. ही अवस्था महाराष्ट्रातली नाही, तर संपूर्ण भारतातील आहे. सहा लाखापेक्षा जास्त कारखानदारी बंद झाली आहे. पारले बिस्कीटचे 10 हजार कामगार कमी करण्याची घोषणा केली. या राज्यात आणि देशातील गाड्यांच्या कारखान्यांची उत्पादने कमी झाली. या देशात फार मोठी मंदी येण्याचे कारण, या देशात मागच्या पाच वर्षात फार चुकीची आर्थिक धोरणे राबविण्याचे काम झाले.

पीएला विमानाचं जेटचं तिकीट काढायला सांगितले. तासाभराने त्याने सांगितले, साहेब रेल्वेनेच जायला लागेल. विचारले, का रे बाबा. ते म्हणाले, ते जेट कंपनी बंद आहे. त्याचे दिवाळे निघाले आहे. विषय संपलेला आहे. सकाळचे विमान रद्द झालेले आहे. विमान रद्द झाल्याचा फक्त विषय नाही. लिबरायझेशननंतर सगळ्यात उत्तम कंपनी म्हणून जेट कंपनी नावारुपाला आलेली. या देशात विमान प्रवासाचे सूत्र बदलण्याचे काम त्या कंपनीच्या प्रभावी कामगिरीने झाले. पण, यांच्या काळात त्या जेट कंपनीचे दिवाळे निघाले. आज लाखो लोकं त्या कंपनीत काम करणारे बेकार झाले.

बीएसएनएलचे काय झाले पहा. रिलायन्सच्या जिओला काम मिळाले पाहिजे म्हणून बीएसएनएल कंपनी जी राष्ट्राच्या मालकीची होती. जी खेडोपाड्यात पोचलेली होती, त्या बीएसएनएल कंपनीचा

पगार थकवलेला आहे. त्यांच्यावर आर्थिक कुऱ्हाड कोसळलेली आहे. केंद्र सरकारने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. आपल्या समोर अशी मी 56 उदाहरणे देईल.

आणि म्हणून नरेंद्र मोदी आणि सरकारविषयी आम्ही लोकसभेवेळी जो मुद्दा सांगत होतो, तो आता खरा ठरायला लागला आहे. हे आपल्याला सांगायचे आहे. माझी आपल्या विनंती आहे. येणारी विधानसभेची निवडणूक आहे. भावनिक होऊन मतदान करण्यापेक्षा तुमचं माझ्या दारात काय आहे. उंबऱ्यावर काय आलेलं आहे, याचा विचार करून आपण मतदान केले पाहिजे. आपल्या विनंती आहे. कुठल्यारी रस्त्याने जाणाऱ्या ट्रकवाल्याला विचारा, बाबा रे तुझा धंदा वाढला का कमी झाला. रस्त्यावर वाहणाऱ्या ट्रकची संख्या कमी झाली. त्या ट्रक व्यवसायावर काम करणारे लाखो लोकं आज घरात बसायला लागले. कारण, या देशाची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली आहे. आम्ही सांगत होतो, रिझर्व बँकेला हात नका लाऊ, ज्या दिवशी या देशातील तीन रिझर्व बँकेच्या गव्हर्नरनी एका पाठोपाठ एक राजीनामा दिला. त्यावेळी जगाला संदेश दिला गेला की, भारताच्या अर्थव्यवस्थेचे आता काही खरे नाही. आणि ज्यावेळी केंद्र सरकारने रिझर्व बँकेतून पैसे काढायला सुरवात केली, त्यावेळी जगाच्या पाठिवरील वित्तीय कंपन्यांनी भारतीत कंपन्यांचा पैसा काढायला सुरवात केली आणि म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण विचार करून मतदान करण्याची भूमिका घेतली पाहिजे. सत्तेत येण्यापूर्वी भाजपने 183 आश्वासने दिली होती, त्यातल्या 148 आश्वासनांवर या सरकारने कुठलाही विचार केला नाही. रामोशी, पारधी, बेरड समाजातील जणगणना, त्यांच्या कल्याणाच्या योजना कधीच आल्या नाहीत. दहावी पास झालेल्या मुलींसाठी जिजाऊ वसतिगृहाची निर्मिती, पण मी एकही पाहिलेली नाही. साठपेक्षा जास्त वय असलेल्या महिलांसाठी मायेचा आधार ही मासिक पेन्शन योजना कोणाकडेही पोचलेली नाही. टोलमुक्त महाराष्ट्र झाला नाही. अन्नदाता महाराष्ट्र योजना आली नाही. जागतिक स्तराचे विद्यापीठ आले नाही. स्वयंभू पाणी योजना, प्रत्येक घराला स्वच्छ पाणी आले नाही. पाणीच नाही तर स्वच्छ पाणी लांब आहे. आंबेडकरांचे स्मारक पाच वर्षात पूर्ण करू. महाराष्ट्र कुपोषणमुक्त करू, ज्येष्ठ नागरिकांना सगळीकडे मोफत उपचार देऊ. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृहे बांधू. अशा 56 योजना आहेत. ज्याकडे एकही विषय घेऊन या सरकारने स्पर्श केलेला नाही. आणि म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, येणाऱ्या काळात भाजपच्या मागे उभे राहण्यापेक्षा जे बोलेल ते करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागे आपण उभे राहिले पाहिजे.

मला आनंद आहे की, अमोल कोल्हेंसारखा नेता आमच्यासोबत महाराष्ट्रभर फिरतोय, ज्या नेत्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी राजे यांना प्रत्यक्षपणाने लोकांच्या मनात उतरवले. अनेक ठिकाणी मिरवणुका असताना लोकं लांबून मुजरा करायची. लोकांना वाटायचे ज्याच्यावर आपले प्रेम आहे, अशा छत्रपती संभाजी महाराजांनाच आपण बघतोय. त्या भावनेने संभाजी महाराजांना प्रत्यक्षात आणणारे आमचे अमोल कोल्हे आहेत.

सगळ्या महाराष्ट्रात ही परिस्थिती आहे. आज आमच्या राष्ट्रवादीच्या झेंड्या बरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असणारा झेंडाही फडकायला लागला आहे. शशी थरूर नावाचे एक खासदार आहेत. त्यांना परवा एकाने इंग्लडमध्ये प्रश्न विचारला की, जर समजा भारतात ब्रिटीश आलेच नसते, तर तुमच्या मराठा साम्राज्याचे राज्य राहिले असते तर काय झाले असते, केरळच्या खासदार शशी थरूर यांनी भाषणात सांगितले की, मराठा साम्राज्य जर राहिले असते तर छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या मुस्लीम समाजापासून बारा बलुतेदारांचा आदर करणारी व्यवस्था भारतात तयार झाली असती. या देशातील गोरगरीब जनतेला बरोबरीची वागणूक देण्याचे काम छत्रपतींच्या विचारातून झाले असतं. हे शशी थरूर नावाचा खासदार केरळमधून जाऊन इंग्लंडमध्ये सांगतो. आणि म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन ही शिवस्वराज्य यात्रा आपल्या दारात आली आहे.

मला खात्री आहे, रोहितदादांचा विजय आजच झाल्यासारखा मला वाटतोय, कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नका. भारतामध्ये सगळे पक्ष म्हणतात, ईव्हीएम बंद करा आणि शिक्क्यावर आणा. फक्त एकच पक्ष घाबरतो, तो म्हणजे भाजप. सगळे पक्ष सांगतात, ते ईव्हीएम बंद करा आणि ते जुन्या बॅलेटवर निवडणूक घ्या. पण, राज्याचे मुख्यमंत्री आणि नरेंद्र मोदी यांनाच गौडबंगाल माहिती आहे की, आपण कसे निवडून आलो. त्यामुळे त्याच्यावर ते काही बोलत नाही. आमचं काही म्हणणं नाही. सगळं तुमच्या हातात आहे. इथून परत जाताना या मतदारसंघामध्ये ज्यांना पाच वर्षे मंत्रीपद मिळूनही ज्यांनी या मतदारसंघाचा विकास केला नाही, त्यांना एकदा घरी बसवा आणि ज्यांनी आपल्या सर्वांबरोबर भावासारखे प्रेम दिले त्यांना निवडून द्या.

आपल्या जामखेड मार्केटयार्डात 200 कोटी देणार, म्हणून मी ऐकले होते. मी चौकशी केली, दोनशे कोटी आले का. पाच कोटी आले, पण ते कर्जाऊ आले आहेत. या खर्ड्याच्या किल्ल्यामध्ये सुधारणेसाठी आम्ही पैसे दिले आणि तुम्हाला माहिती नसेल, भगवाडनगडाला पहिले पैसे कोणी दिले असतील, तर ते आमच्या सरकारमध्ये मी अर्थमंत्री असताना. चौंडीला तर दिलेच. सालकराच्या मुलाने दहा कोटीचा बंगला बांधला. अरे त्यांनी बांधला आणि आपण बघत बसलो. त्यांनी बांधून काढला. सालकराच्या मुलाने सहानभूती मिळवली आणि चांगले घर बांधले. आम्हाला चांगलं वाटलं. आमच्या काय पोटात दुखत नाही. लोकांना द्यायचे का घरात न्यायचे, ते ज्याने त्याने ठरवायचे आहे. निवडणूका आल्यावर लोकं निर्णय घेतात, तुम्ही घेतलेला निकाल माझ्यासमोर आहे. त्यामुळे निवडणुकीत काय होणार, हे कोणी सांगायचे नाही. आपलीच सीट येणार. शिक्के नीट मारा. मला खात्री आहे, येणारा काळ राष्ट्रवादीचा आहे. काही लोकं आपला पक्ष सोडून जातायेत, आणखी काही टाळकी जातील. काळजी करू नका. जाऊ नये, असं माझं मत आहे. एखादा गेला की, नवीन चेहरा देण्याचे काम शरद पवारांच्या धोरणातून करत आहे. पण एवढंच सांगतो की, राष्ट्रवादीच परत महाराष्ट्रात सत्तेत येणार.



## पक्ष बदलाचा बाजार भाजपाने मांडलाय

**बीड – अंबाजोगाई –** पक्ष बदलाचा बाजार भाजपाने सुरु केला आहे अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी अंबाजोगाई येथील जाहीर सभेत केली वेगवेगळ्या माध्यमातून विरोधकांना संपवण्याचे प्रकार भाजपकडून सुरु आहे असेही जयंत पाटील म्हणाले. पवारसाहेबांनी सगळं काही दिलं. खुर्चीशिवाय त्यांना कुठेही बसवलं नाही ते लोक पक्ष सोडून गेले आहेत असा समाचार घेतानाच त्यांच्या जाण्याने नवीनांना संधी मिळाली आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. माध्यमात येणाऱ्या गोष्टींपेक्षा जमीनीवरील परिस्थिती आज वेगळी आहे याची माहिती प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावेळी दिली. पवारसाहेबांसारखा जाणता राजा आहे शिवाय तरुण बहाद्दरांची फळी आमच्याकडे आहे त्यातून आम्ही नवा महाराष्ट्र घडवल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील व्यक्त केला. पुरपरिस्थिती होती त्यामुळे मी शिवस्वराज्य यात्रेत नव्हतो परंतु परिस्थिती निवळल्यानंतर आलो आहे असेही आमदार जयंत पाटील यांनी सांगितले.

## देवेंद्र व नरेंद्र यांच्यामुळे आपलं भवितव्य चांगलं नाहीय

**गेवराई –** आपलं भवितव्य आपणच ठरवायचं आहे. देवेंद्र व नरेंद्र यांच्यामुळे आपलं भवितव्य चांगलं नाहीय असे आवाहन राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी गेवराई येथील जाहीर सभेत तरुणांना केले. बॅलेटपेपरवर मतदान घ्या सगळी जनता मागणी करत आहे परं पहायला मिळत आहे. जेटमध्ये लाखो लोक बेकार झाले आहेत. नोकरीसाठी वणवण भटकावे लागत आहे. गाड्या तयार करणारे कारखाने बंद होत आहेत. सहा लाख कंपन्या बंद पडल्या आहेत. मागणी नाही पुरवठा करणारी यंत्रणा नाही याचा अर्थ काय देशाच्या अर्थव्यवस्थेसोबत खेळ सुरु आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी केला. या देशात नोकऱ्या लागल्या नाहीत तर यांच्या काळात नोकऱ्या गेल्या आहेत. १८३ आश्वासनांपैकी १४८ आश्वासनांकडे देवेंद्र फडणवीस सरकारने लक्षच दिलेले नाही. ज्याच्यामागे चौकशी लागलीय ते पक्ष सोडून जात आहे. शरद पवार यांच्या विचाराशी बांधील असलेला सच्चा कार्यकर्त्यांनी पक्ष सोडला नाही असे सांगतानाच ज्यांचा २० – २० वर्ष लालदिवा हटला नाही त्यांनी का पक्ष सोडावा हा खरा प्रश्न आहे अशी जोरदार टीका जयंत पाटील यांनी केली.

## पक्ष सोडून कितीही गेले तरी आमच्याकडे शरद पवार नावाचे विद्यापीठ आहे

**उस्मानाबाद – वाशी :** 'अ' गेला तर 'ब' आहे आणि 'ब' गेला तर 'क' आहे आणि कुणीही पक्ष सोडून गेले तरी आमच्याकडे शरद पवार नावाचे विद्यापीठ आहे त्यामुळे जाणारे खुशाल जावू देत अशी स्पष्ट भूमिका प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी वाशी येथील जाहीर सभेत मांडली. येत्या निवडणुकीत कुणी फंदफितुरी केली तर त्याचा पाडाव करुन निवडणूका जिंकायच्याच आहेत असा आत्मविश्वास जयंत पाटील यांनी निर्माण केला. पाच वर्षात काय केले हे लोकं विचारतील म्हणून आता अनेक घोषणा मुख्यमंत्री करत आहेत अशी जोरदार टीकाही जयंत पाटील यांनी केली.

## ज्यांनी स्वाभिमान गहाण ठेवलाय ते पक्ष सोडून जात आहेत

**सातारा– दहीवडी :** ज्यांनी स्वतः चा स्वाभिमान गहाण ठेवला आहे ते आज पक्षातून गेले आहेत त्यामुळे आम्हाला काही वाईट वाटणार नाही अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी आपली स्पष्ट भूमिका दहीवडी येथील जाहीर सभेत मांडली. प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी पक्षांतर करणाऱ्या पक्षातील लोकांचा चांगलाच समाचार घेतला. माणूस दुसऱ्या कामासाठी भेटला तरी पक्षात प्रवेश कधी करणार असे विचारले जाते हे पक्षाचे मुख्यमंत्री आहेत की राज्याचे अशी

विचारणा करतानाच भाजपाने राजकीय व्यभिचार वाढवला आहे अशी जोरदार टीकाही जयंत पाटील यांनी केली. शरद पवार साहेबांना सोडणारा लोकांच्याबद्दल चीड निर्माण झाल्यानेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठया संख्येने शिवस्वराज्य यात्रेत सहभागी होत आहेत. नवीन चेहरे, नवे नेतृत्व उदयाला येत आहेत. त्यामुळे तुमची सर्वांची ताकद शरद पवार यांच्या पाठीशी उभी करण्याची वेळ आली आहे असे आवाहन जयंत पाटील यांनी केले. आघाडीशी बेईमानी केली त्यांना पुन्हा निवडून न देण्याचे काम आपल्याला करायचे आहे असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले. ८० वर्षाचा शरद पवार नावाचा हा तरुण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कोणताही प्रश्न निर्माण झाला तर सर्वांच्या आधी पोचतो आहे त्यामुळे त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार केला पाहिजे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. लोकसभेला आघाडीचा धर्म पाळला नाही त्याचं काय करायचं हे शोधण्याचे काम शिवस्वराज्य यात्रा करणार असल्याचेही जयंत पाटील म्हणाले.

## सत्तापदाच्या एका तुकड्यासाठी लाचार

**सातारा –** ज्यांना लढण्याची ताकद नाही... हिम्मत नाही ते पक्ष बदलत आहेत सत्तापदाच्या एका तुकड्यासाठी लाचार होतायेत अशी जोरदार टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी साताररच्या जाहीर सभेत केली. दरम्यान शिवेंद्रसिंहराजे यांचं नाव घेवून तर उदयनराजे यांचे नाव न घेता प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी जोरदार हल्लाबोल केला. शरद पवार यांच्या छायेत राहून लाल दिवा मिळाला ते सोडून गेले आहेत. वीक पॉईंटवर बोट ठेवून भाजप प्रवेश करुन घेत आहेत असा आरोप जयंत पाटील यांनी केला. सातारकरांना काटा जरी टोचला तरी वडीलांसारखे धावून येतात ते शरद पवार.. शिवेंद्रसिंहराजे यांना वडीलांसारखं प्रेम दिलं मात्र ते प्रेम विसरले. आता एक गेला म्हणून दुसऱ्यानेही विचार करावा काय म्हणावं या छत्रपतींना असा सवाल करतानाच जे जाण्याचा विचार करत आहेत त्यांना सुबुद्धी देवो असा जबरदस्त टोलाही आमदार जयंत पाटील यांनी लगावला.

दु:ख वाटते एवढी मोठी माणसं पक्ष सोडून जातात परंतु तसा आनंदही होतो कारण पक्षातील नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे असेही जयंत पाटील म्हणाले. महाराष्ट्रात कुठेही भाजप शिवसेनेचे वातावरण दिसत नाही. वातावरण फक्त शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्रात दिसत आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. महाराष्ट्रात राष्ट्रवादी पुन्हा ताकदीने उभा राहणार त्यासाठी तरुणांची साथ मिळणार आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

छत्रपती शिवाजी आणि छत्रपती संभाजी यांचा खरा इतिहास कुणी सांगितला असेल तर अमोल कोल्हे यांनी असे जयंत पाटील यांनी सांगितले. शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून जनजागरण करण्याचे काम आम्ही करत आहोत असे जयंत पाटील म्हणाले.

## भाजपाने राजकीय व्यभिचाराचा कळस गाठला

**पंढरपूर :** भाजपाने राज्यातील राजकीय व्यभिचाराचा कळस गाठला आहे असा थेट आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. काहींना आमिषे दाखवली जात आहेत. त्यामुळे काहीजण जात आहेत मात्र तरुणांनी शिवस्वराज्य यात्रा उचलून धरली आहे. तरुणांचा व जनतेचा फार मोठा पाठिंबा मिळत आहे अशी माहितीही प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी दिली. पवारसाहेबांमुळे अनेकांना खुप काही मिळाले आहे.मी सभेत सोडून जाणाऱ्यांची कारणे सांगितली. सत्तेचा आश्रय हवा म्हणून ते लोक गेले व जात आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. काँग्रेससोबत चर्चा करण्यासाठी छगन भुजबळ साहेब उपस्थित होते त्यामुळे त्यांच्याबाबतच्या उलटसुलट चर्चा मान्य नाही. जाणाऱ्यांची सत्तेची सूज कमी झाली आहे. त्यामुळे तरुणांना संधी दिली जाणार आहे. राष्ट्रवादीचे खासदार जास्त आहे. पक्षाची ताकद जास्त आहे म्हणूनच राष्ट्रवादी फोडण्याचा प्रयत्न होत आहे असेही जयंत पाटील म्हणाले. लोकसभेत जे केले ते विधानसभेत करतील असं वाटत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेवर माझा पुर्ण विश्वास आहे असे मत जयंत पाटील यांनी व्यक्त केले. विधानसभेत व विधानपरिषदेत प्रभावी भूमिका राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मांडली आहे. त्यामुळे विरोधी पक्ष म्हणून आम्ही ताकद दाखवून दिली आहे. दुसऱ्या कुठल्या पक्षांचे अस्तित्व ठेवायचे नाहीय. म्हणून पक्ष बदलांचा बाजार भाजपाने मांडला आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी केला. शिवसेनेमुळे भाजपला धोका नाही तर शिवसेनेच्या मुळावरच भाजप येणार आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले.



# अहो फडणवीस, कुठं नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा?

**खासदार डॉ. अमोल कोल्हे**



**राजगुरूनगर** : आदिशक्ती तुळजाभवानी, उभ्या हिंदुस्तानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी महाराष्ट्रातल्या माणसांना जगावं कसं हे शिकविल्यानंतर याचं महाराष्ट्रातल्या माणसांना शेवटच्या श्वासापर्यंत लढावं कसं, हे शिकविणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करतो.

नक्की कशासाठी शिवस्वराज्य यात्रा, अनेकांनी विचारले. महाराष्ट्रात दोन यात्रा सुरू असताना ही तिसरी यात्रा अचाकन. मला पत्रकारांनी विचारले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष का यात्रा काढत आहे. मी म्हणालो की, हा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसला विचारण्यापेक्षा जे सत्तेत पाच वर्षे बसलेत, त्यांना विचारा की, बाबांनो, जर पाच वर्षे कामे केली असती, तर ती कामं बोलली असती, तर यात्रा कशाला काढायला लागली असती. हा प्रश्न जर तुम्ही सत्ताधाऱ्यांना विचारला असता, तर जास्त बरं होईल. आणि शिवस्वराज्य यात्रेचं खरं कारण, खरी गरज ही अशासाठी निर्माण झाली, की ज्या छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव या भाजप सरकारने घेतले होते, कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, या जाहिराती बघितल्या असतील. एक तरुण टीव्हीवर यायचा आणि सांगायचा, मला रोजगार नाही, रोजगाराची संधी नाही. रोजगार नाही आणि कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा. एक माउली टीव्हीवर यायची आणि तावातावने सांगायची की, सिलींडरच्या किमती एवढ्या भडकल्यात की कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा. आणि या सर्व परिस्थितीमध्ये स्वतःला आरशात बघा आणि स्वतःला विचारा की, किती रोजगाराच्या संधी आहेत. 1 लाख 38 हजार कंपन्या बंद पडल्यात आणि 44 लाख रोजगार नाहिसे झाले. 44 लाख लोकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्यात. 1 लाख 38 हजार उद्योगधंदे बंद पडलेत. ही रोजगाराची परिस्थिती आहे. आता सांगा, कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

जेव्हा गुन्हेगारीबाबत बोलत होता, त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे शहर असलेले नागपूर क्राईम कॅपिटल झालं आहे. दिवसाढवळ्या खून होतायते. दिवसाढवळ्या खंडणीसारख्या गोष्टी



होत आहेत. राज्याला स्वतंत्र गृहमंत्री नाही. आणि ज्यांच्याकडे गृहमंत्रालय आहे, त्याच मुख्यमंत्र्यांच्या शहराचे आज क्राइम कॅपिटल झाले आहे. आणि आता गुन्हेगारीच्या बाबतीत विचारा, कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

आता परवा बातमी आली होती, सागाच्या पानावर मोदी सरकारबद्दल आत्महत्या करताना लिहून ठेवलं. मध्यंतरी स्वाती पिठले या आपल्या भगिनीने एसटीच्या पाससाठी 260 रुपये नाहीत म्हणून मृत्यूला कवटाळले. इतक्या आत्महत्या होत असताना आता सांगा कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

परवाचं गहुंज्याचं प्रकरण, बलात्कार आणि हत्या प्रकरणामध्ये तीन वर्षात सरकार फाशीची शिक्षा देऊ शकले नाही, म्हणून आरोपीची फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली. आणि रांझ्याच्या पाटलाचा चौरंगा करणाऱ्या महाराजांच्या महाराष्ट्रात बलात्कार करून हत्या करणाऱ्याला राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे तीन वर्षात फाशीची शिक्षा देता आली नाही. म्हणून जर शिक्षा देता येत नसेल तर उत्तर द्यावं, कुठं नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा. आणि या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आणि सगळ्या प्रश्नांचा जाब तुम्हा सर्वांना येत्या विधानसभा निवडणुकीत विचारायचा आहे.

खेड विधानसभेची ज्यावेळी आपण गोष्टी करतो, खेड-आळंदी विधानसभेत लोकसभेवेळी जो प्रेम, प्रतिसाद, होता. मी ठामपणे सांगत होतो, मागचं 65 हजारांचं लीड तोडून त्यावर लीड मिळणार आणि तुम्ही साडेआठ हजारांचं लीड दिलं. पण, हे होत असताना मुंडेसाहेबांनी मघाशी एक प्रसंग सांगितला. इतिहासाची बऱ्याचवेळा पुनरावृत्ती होत असते. तुमच्या वाचनात येत असेल की, अमूक एक पक्ष सोडून गेला. अमूक एक अफवा कानावर येत असते. अमूक कोण जाणार, अशी चर्चा कानावर येत असते. साडेतीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात अशी एक परिस्थिती आली होती. आदिलशाहीचा सर्वांत मोठा सरदार अफजलखान स्वराज्यावर चालून आला होता. पत्रकार बांधवांना सांगतो की, मी अजून कोणालाही कोणतीही उपमा दिलेली नाही. नाहीतर ब्रेकिंग न्यूज सुरू व्हायची.

ब्रेकिंग न्यूजमध्ये तुम्ही अफजलखान म्हणाले की, आम्हाला हातात वाघनखे घालावीच लागतील. परंतु, इतिहासाची जी ही घटना आहे, अफजलखान नावाचा एक मोठा सरदार महाराजांना नेस्तानाबूत करण्यासाठी महाराष्ट्रावर चालून आला. स्वराज्यावर चालून आल्यावर अफजलखानाची शक्ती मोठी, फौज मोठी, त्याचं सैन्यबळ मोठे. अफजलखानाकडून प्रत्येक सरदाराला व मावळ्याला खलिते जायला लागले. आमच्या गोटात सामील व्हा, नाहीतर घरादारावरून नांगर फिरवू. अनेक सरदारांनी विचार केला की, घरादारावर नांगर फिरण्यापेक्षा जाऊ अफजलखानाकडे. सध्याच्या परिस्थितीत यामध्ये साधर्म्य आढळत असेल, तर तो फक्त योगायोग समजावा.

पण, याच महाराष्ट्राच्या मातीला इतिहास आहे की, जेव्हा अफजलखानाकडून हा खलिता आला की, घरादारावरून नांगर फिरवू, त्यावेळी कान्होजी जेधे नावाचा एक माणूस उभा राहिला आणि त्याने महाराजांना फर्मान दाखवले आणि सांगितले की, महाराज फर्मान आलंय. अफजलखानाकडून फर्मान आलंय की, घरादारावरून नांगर फिरवू. महाराज म्हणाले, मग जा आणि अफजलखानाला जाऊन मिळा. कान्होजी जेध्यांचं रक्त सळसळलं, श्वास लागला आणि झटकन बाजूचा पाण्याचा तांब्या उचलला आणि हातवरून पाणी सोडलं आणि महाराजांसमोर जाऊन बसला आणि म्हणाला, महाराजांसाठी वतनावर पाणी सोडलं. वतन राखण्यासाठी जे धडपडतील, त्यांना सामील व्हावं लागेल आणि शिवस्वराज्यासाठी जर वतनावर पाणी सोडण्याची तयारी असेल तर कान्होजी जेध्यांचे वंशज आज महाराष्ट्रात ठिकठिकाणी दिसतील. याविषयी खात्री बाळगा.

बारामतीमध्ये मध्यंतरी एक कार्यक्रम झाला. तब्येत बरोबर नव्हती. अहिल्यादेवींचा कार्यक्रम होता. भाषण करताना मी फक्त एवढंच म्हणालो, आधी अजितदादांनी त्यांची भूमिका स्पष्ट मांडली होती आणि अजितदादा त्यांच्या भाषणात म्हणाले होते, धनगर समाजाला आरक्षण मिळावे, ही भूमिका नक्कीच आहे. परंतु, हे आरक्षण देत असताना कोणलाही घटनेने दिलेले आरक्षण काढून घेऊन, त्यांच्या घशातला घास काढून आरक्षण द्यावं, ही भूमिका नक्कीच नाही. त्यामुळे आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता धनगर समाजाला आरक्षण देण्यात यावं, ही रास्त भूमिका कायम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आहे आणि तीच अजितदादांनी मांडली. आणि त्या भूमिकेनंतर माझं म्हणणं एवढंच होतं, जे अजितदादा म्हणाले, त्या पद्धतीने ही गोष्ट व्हावी. या विधानाचे फ्लेक्स संघटनेच्या नावाने लागत होते, त्याच संघटनेचा जिल्हाध्यक्ष अतुल बेनके यांच्या गाडीतून उतरतो आणि बघतो की, अरे आपल्या संघटनेचे फ्लेक्स लागतायेत, इथं कसेकाय लागतायेत. म्हणून त्याने फ्लेक्स लावणाऱ्याला पकडले आणि विचारले की, फ्लेक्स कोणी लावायला सांगितले. 15 वर्षे खासदारकी उपभोगल्यानंतर काही लोकांना कदाचित त्रास होत असेल. त्यांनी काही लोकांना सांगितले असेल, त्यातल्या काही जणांनी ते फ्लेक्स लावायला सांगितले असतील, असं त्या माणसाने सांगितले. आता बघा, विधान कुठले, बातमी काय आली आणि त्याचे फ्लेक्स काय लागले. असं होत असताना एक चांगली गोष्ट जुन्नर तालुक्यात घडली. आदिवासी समाजाचा हिरडा प्रकल्पाचा एक बहुचर्चित किंवा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, त्या संबंधित जी काही मदत करता येईल, ती मदत आपण करू, असं आश्वासन दिल्यानंतर आजपर्यंत त्यांच्याकडे न फिरकलेली माणसंसुद्धा आदिवासी समाजाकडे फिरायला लागली. त्यामुळे आदिवासी समाजाला प्रामाणिकपणाने सांगतो, की खेड, आंबेगाव, जुन्नर या भागातील आदिवासी बांधवांनी या लोकसभा निवडणुकीत अत्यंत मोलाची कामगिरी बजावली आहे. याचं मला नक्कीच भान आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांच्या विकासासाठी तुम्हाला मुख्य प्रवाहात घेऊन विकास करण्यासाठी मी कायम कटिबद्ध राहिल. याविषयी कोणताही किंतुपरंतु बाळगू नका.

दुसरी महत्त्वाची गोष्ट की, आज शिवसेना-भाजपचे सरकार मराठा आरक्षणाचे संपूर्ण श्रेय घेण्याचे प्रयत्न करत आहे. अजितदादांनी ही गोष्ट ठामपणाने सांगितली आणि ती गोष्ट तुम्हाला-आम्हाला सर्वांना माहिती आहे की, मराठा आरक्षणाचे जे काही यश आहे, ते समाजाने केलेल्या आंदोलनाचे यश आहे, यात कोणत्याही सरकारचा सहभाग नाही. पण, सरकारचा दुटप्पी चेहरा कसा समोर येतो, तो जर बघितला, तर एकिकडे मराठा आरक्षणाचे श्रेय घ्यायचे आणि मराठा क्रांती मोर्चा संदर्भात जेव्हा आंदोलन करण्यात आले, ते आंदोलन करत असताना विद्यमान आमदार होते, माजी आमदार होते. असं असताना केवळ राजकीय आकसापोटी केवळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दिलीपअण्णा मोहित्यांसारख्या एका नेत्यावर कारवाई केली जाणार असेल, तर ही कारवाई खपवून घेतली जाणार नाही. त्या संपूर्ण लढाईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिलीपअण्णांच्या पाठिशी उभा होता. आदरणीय पवारसाहेब ठामपणे उभे होते. अजितदादा असतील, वळसे पाटील असतील, मुंडेसाहेब असतील, यांनी स्वतः मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन अशा राजकीय आकसापोटी कारवाई करू नये, असं सांगितले होते. न्यायप्रक्रियेवर आमचा विश्वास आहे. कायदा हातात घेणार नाही. परंतु, जर न्यायप्रक्रिया विश्वास उडत आहे, असं वागत असेल, तर खपवून घेणार नाही. आणि याचं उत्तर येणाऱ्या विधानसभेत दिल्याशिवाय राहणार नाही. येणाऱ्या विधानसभेत याचे उत्तर नक्कीच मिळेल. मागच्या लोकसभेत कोणी तरी म्हणाले होते, रुपालीताई गेल्या. त्यांचे माहेर गोऱ्यांचे आहे. आणि आपल्या चाकणच्याच आहेत. मागच्या लोकसभेच्या





निवडणुकीत कोणी तरी म्हणाले होते, ते जरी माझे पाहुणे असले तरी, घरी जेवायला बोलवील, मत काही देणार नाही. पण, मी पुढचा आहे हो. हिसाब बराबर होगा. त्यावेळी मी सांगत होतो, माझे हात दगडाखाली आहेत. लय डिवचू नका. डिवचणाऱ्यांना फाडल्याशिवाय राहणार नाही, ही गोष्ट लक्षात ठेवा.

लोकसभेच्या माध्यमातून तुम्ही संधी दिली. त्यातून जी कामं मार्गी लावायची ती आपण लावत आहोत. नारायणगाव बायपासचे काम सुरू झाले आहे. खेड बायपासचे काम सुरू झाले आहे. ही खरोखर श्रेयवादाची लढाई नाही. पण, जेव्हा आवर्जून कोणी तरी टिका करतं, त्यावेळी जनतेने कौल दिला आहे, तो स्वीकारावा. आम्ही वयाने लहान आहोत. वयाचा मान ठेवतो. पण तुम्ही वयाचा मान न ठेवता वाटेल तसे आरोप करत असाल, तर आम्हाला सांगावे लागेल, की एकदा आमनेसामने येऊन लोकांना सांगा ना की, जो खेड घाटाचा बायपास अडीच किलोमीटरचा होता, तो साडेचार किलोमीटरचा का केला. कुठली शाळा वाचविण्यासाठी तुम्ही जनतेला भूखंड दिला, हे सांगा. आणि कोणाची 96 एकर जमीन बाजूला आहे, तेही सांगा. आणि हे जर खुलेपणाने सांगणार असाल, तर खुलेपणाने समोर येऊन आरोप करा.

काल मी वाचले की, कोणीतरी अभिमानाने सांगितले की, गेल्या 15 वर्षांत मी 22 वेगवेगळ्या विषयांवर बोललो. मग मी विचार केला की, 15 वर्षात 22 विषय म्हणजे, एका वर्षात किती विषय. दीड विषय. अहो, आता जो खासदार निवडून दिलाय, तो एकाच अधिवेशनात तीन विषय बोललाय. बैलगाडा शर्यतीबाबत तुम्ही आतापर्यंत जो आवाज उठवलात, तो एका बाजूला आणि आता तुम्ही सांगायचं, बैलगाडा शर्यतीबाबतीतली सगळी भाषणं तुम्ही बघितलीत. तुमचा हा पठ्ठ्या बैलगाडा शर्यतीविषयी जे बोलला, ते तुम्हाला पटलं का नाय पटलं ते सांगायचं. (प्रेषकांतून आवाज- पटलं) पटलं. आणि आता येतानाच या बैलगाडा शर्यतीबाबत आदरणीय वळसे पाटील साहेबांसोबत चर्चा झाली. आदरणीय पवारसाहेबांसोबत याची चर्चा झाली आहे. या बैलगाडा शर्यती लवकरात लवकर सुरू करण्यासाठी तोडगा काढण्याकरिता आपण प्रयत्नात आहोतच. आणि बैलगाडा शर्यत सुरू करण्यासाठी जे काही प्रयत्न करावे लागतील, त्यासाठी कटिबद्ध आहे. हे करण्यासाठी येणाऱ्या विधानसभेला, लोकसभेला तर तुमची ताकद आहे, लोकसभेला तुमचा हक्काचा माणूस आहे, विधानसभेला जर तुमच्या हक्काचा माणूस दिलात, आणि महाराष्ट्र विधानसभेचे चित्र बदलणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. हे चित्र बदलत असताना खेड- आळंदीचा उमेदवार, पुढचा आमदार हा काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीचाच असला पाहिजे. एवढीच तुम्हाला विनंती करतो. या शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून तुमचे विचार, तुमचा आवाज महाराष्ट्रभर बुलंद होणार आहे. प्रत्येकाने मावळा व्हा. मतदार राजा जागा हो, परिवर्तनाचा धागा हो...एवढीच तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती करतो.

## एखाद दुसरा बुरूज ढासळला म्हणून कधी किल्ला पडत नसतो

**पारनेर :** महाराष्ट्रात सध्या तीन यात्रा सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांची महाजनादेश यात्रा, एक जनआशीर्वाद यात्रा आणि आता शिवस्वराज्य यात्रा. पण, यातला फरक जो स्पष्ट झाला, तो फरक असा आहे, की

मुख्यमंत्र्यांची महाजनादेश यात्रा जात असताना ठिकठिकाणी काळे झेंडे दाखवले जातात. ठिकठिकाणी यात्रा अडवली जाते आणि निघोजला येईपर्यंत शिवस्वराज्य यात्रेला पाच ठिकाणी प्रेमापोटी थांबावं लागलं. काळे झेंडे नाही, तर हारतुरे देण्यासाठी.

ते अधिकारवाणीने सांगतायेत, मी मुख्यमंत्री, मी मुख्यमंत्री. महाराष्ट्र कोणाची जहागीर नाही की, हा मुख्यमंत्री. महाराष्ट्रातील मराठी माणूस, महाराष्ट्रातील शेतकरी, महाराष्ट्रातील माता भगिणी आणि महाराष्ट्रातील युवक ठरवेल, तोच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होऊ शकतो. हे सांगण्याची आज वेळ आलेली आहे.

माझ्या माता भगिणी बसलेल्या आहेत. 2014 ला सिलेंडरचा भाव किती होता. आता किती आहे. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी आज्ञापत्रकात म्हटले होते की, शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, त्याच महाराजांच्या महाराष्ट्रात सरासरी रोज आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत. परवाच एक बातमी वाचायला मिळाली की, एक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीने मुख्यमंत्र्यांकडे इच्छामरणाची भावना व्यक्त केली. महाराष्ट्रावर 2014 साली असलेले 2.85 लाख कोटीचे कर्ज आज 5 लाख कोटींवर म्हणजे दुप्पटीने कर्ज वाढले आहे.

नीलेशभाऊ लंके मी तुमचं दोन गोष्टींसाठी कौतुक करेन की, तुम्ही आजच्या सभेसाठी जे हिंदवी शिक्षण संस्थेचे ग्राउंड निवडलेले आहे, हिंदवी स्वराज्याची संकल्पना मांडलेल्या शिवाजी महाराजांच्या नावाच्या शिवस्वराज्या यात्रेसाठी हे ग्राउंड निवडले, त्याबद्दल धन्यवाद मानतो. तुमच्या नावाने कुठलं तरी हिंदी गाणे बनवले आहे. सामान्य कुटुंबातील एखाद्या कार्यकर्त्यामागे जेव्हा इतक्या खंबीरपणे सर्वसामान्य जनता उभी राहते, तेव्हा माझ्यासारख्या सर्वसामान्य राजकारणाची पार्श्वभूमी नसलेल्या माणसाचा उर भरून येतो, की आपल्यासारखाच वाट चालणारा आणखी कोणी तरी आहे. वाट कदाचित सुरवातीला अवघड असेल, माळरान तुडवावे लागेल. माळरान तुडवताना काटे बोचतील, पण एकदा माळरान तुडवत गेले की, हळूहळू पायवाट तयार होते आणि त्या पायवाटेचा हमरस्ता कधी बनतो, ते कळत नाही आणि हा हमरस्ता पारनेरच्या सर्वांगीण विकासाचा असेल, अशी अपेक्षा तुमच्याकडून करतो. आणि या पारनेरचेच भूमीपुत्र असलेल्या सेनापती बापटांचे जे प्रचंड मोठं योगदान आहे, सेनापती बापटांनी म्हणून ठेवलेले आहे, महाराष्ट्र मेला तर राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले. खरा वीर वैरी पराधिनतेचा, महाराष्ट्र आधार भू भारताचा. आणि आज हा महाराष्ट्र पुन्हा ठाम उभा करायचा असेल, तर अठरा पगड जातींना एकत्र घेऊन जाणारे, जातीपातीत भेद न करणारे, जातीपातीत आग न लावणारे, धर्माच्या नावावर राजकारण न करणारे, विकासाचे राजकारण करणारे आदरणीय पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाचे नेतृत्वाची आज महाराष्ट्राला गरज आहे.

मुंडेसाहेब म्हणाले, बरेच जण सोडून गेले, मग नाक्यावर, पारावर चर्चा होती, आता काय होणार. आता यांचा फोटो आलाय, यांच्या बरोबर. यांचा फोटो त्यांच्या बरोबर दिसला. पत्रकारांकडून बातमी येते, हे नाराज. हे प्रवेशाच्या तयारीत. एकच सांगतो, एखाद दुसरा बुरूज ढासळला म्हणून कधी किल्ला पडत नसतो. आणि छातीचा कोट करून लढणारा मावळा कधी मागं हटत नसतो. त्यामुळे कोणी गेले तर, भिताडाकडे बघा, वरच्या चार विटा पडल्या म्हणून भिताड पडलं, असं कोण म्हणतं का. जोपर्यंत खालच्या विटा भक्कम आहेत, तोपर्यंत भिंत खचत नाही. ही खालची वीट म्हणजे तुमच्या सारखा राष्ट्रवादीचा आदरणीय पवारसाहेबांच्या विचारांवर विश्वास असणारा कार्यकर्ता आहे, जोपर्यंत ही वीट हलत नाही, तोपर्यंत भिंत पडत नाही. अनेक चर्चा होत असतात. त्या होत असताना एकच सांगतो की, या शिवस्वराज्य यात्रेचे फलित काय असेल, तर शेतकऱ्यांना आपले वाटेल, असे शासन दिसेल. जेव्हा माता भगिनींना आपले वाटेल, असं शासन दिसेल. माता भगिणींबाबत परवा भाजपच्या मेळाव्यात काय झाले, ते आपण पाहिले. रुपालीताईंनी आंदोलन केले. एका भगिनीवर काय झाले. मुंबईत एका भगिनीचा हात शिवसेनेचे महापौर पिरगळतात, मग प्रश्न पडतो, परस्त्रीला माते समान मानणाऱ्या शिवछत्रपतींचे नाव घेण्याची पात्रता यांची उरली आहे का? शिवस्वराज्य यात्रेची अनेकांना धडकी भरली बहुतेक. ट्रोल करायला सुरवात केली आहे. लगेच बातमी फिरायला सुरवात केली, एका महत्त्वाच्या विधेयकावर बोलायला अमोल कोल्हे लोकसभेत उपस्थित नाहीत, अशी चर्चा विनाकारण पसरवायला सुरवात केली. ही केवळ चर्चा आहे. त्यात मतविभागणी मागण्यात आलेली नाही. आणि विधेयक पारीत झालेले आहे. आणि आता महाराष्ट्र पूर्ण घडवायचा आहे, महाराष्ट्र पूर्ण बदलवायचा आहे.



महाराष्ट्रात परिवर्तन घडवायचे आहे. त्यासाठी तुमच्या खांद्याला खांदा लावून हा आज महाराजांचा मावळा उभा आहे. आणि म्हणून जर कोणाला वाटत असेल की, कोणाच्या जाण्याने फार मोठी पोकळी तयार झाली, तर एकच सांगतो, पाण्याची बादली घ्या, बादलीत हात घाला. हात गरगरा फिरवा. काय तयार होतोय, भवरा तयार होतो. थोडा खड्डा होतोय, पाणी थोडा वेळ निवूद्या. खड्डा बुजतोय, परत लेवल. निसर्गाचा नियम आहे. कोणाच्या जाण्याने खड्डा पडत नाही. कशाला घाबरताय. आणि जर कोणी असा विचार करत असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून एवढीच खात्री देतो, जे असतील त्यांच्या सोबत, जे जातील त्यांच्याशिवाय आणि जे आडवे येतील, त्यांच्या छाताडावर पाय देऊन राष्ट्रवादीचा झेंडा फडकवायचा. म्हणजे फडकवायचा. त्यासाठी एक शपथ घ्या, शिवराज्याची ती सनद आहे. ही राष्ट्रवादी काग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याची शपथ आहे. हे वचन आहे या मातीला, हे वचन आहे या जनतेला. हे वचन आहे महाराष्ट्राला.

ही शपथ आहे, शिवराज्याचा जागरूक नागरिक म्हणून मी शपथ घेतो की, स्वराज्यातील प्रत्येकाला चांगलं आयुष्य मिळवून देणं, हे माझं कर्तव्य आहे. त्यासाठी मी प्रत्येकाला चांगलं शिक्षण मिळवून देईन. युवकांना उच्च शिक्षण देण्यासाठी मी साह्य करीन. भूमीपुत्रांना नोकऱ्यांमध्ये 75 टक्के आरक्षण मिळवून देईन. पाणी, वीज, कृषीमालाचा दर असे शेतकऱ्यांचे प्रश्न मी सोडवीन. माता भगिनी सबल, सक्षम आणि सुरक्षीत होण्यासाठी मी कष्ट घेईन. स्थानिक उद्योगवाढीसाठी मी कटिबद्ध असेन. सामाजिक न्यायासाठी मी प्रामाणीकपणाने लढेन. अल्पसंख्यांक, मागासवर्गीय आणि उपेक्षित घटकांना मी सर्वतोपरी मदत देईन आणि संरक्षण करीन. आदिवासी बांधवांना मुख्य धारेत आणण्यासाठी मी प्रयत्न करेन. बहुजन समाजाचे हीत जपण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. शहरी आणि ग्रामीण भागाचा समतोल राखण्यासाठी काम करेन. प्रत्येकाला चांगली आरोग्यसेवा देण्यासाठी प्रयत्न करेन. तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या सोईसुविधा प्रत्येक घटकापर्यंत पोचवीन. प्रत्येक कामगाराला कामाची शाश्वती. सुरक्षितता आणि उत्तम भविष्य मी मिळवून देईन. ज्येष्ठ नागरिकांसाठी सन्मानदायी आणि सुरक्षित वातावरण मी निर्माण करीन. आणि या सर्वांद्वारे निर्माण होणारे स्वराज्य जपण्यासाठी मी प्राणपणाने लढेन. हा प्राणपणाने लढणारा लढा शिवस्वराज्याकडे घेऊन जाण्यासाठी तुमच्यातील प्रत्येक मावळ्याच्या मनात हात घालतोय.



## रयतेचं राज्य पुन्हा आणायचं

**अहमदनगर :** नगर शहरात पाऊल ठेवल्यापासून ज्या बातम्या पसरवल्या जात होत्या, की इथं घरघर लागली. इथं पडझड झाली, इथं संभ्रम आहे आणि इथं अफवा आहे, हे सगळं तुम्ही खोडून काढलं. तुम्हा सर्वांना जय शिवराय.

आता सुरू झालंय की, ही शिवस्वराज्य यात्रा कशासाठी, अजितदादांनी सांगितलयं त्याप्रमाणे, ज्या छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले तरी महाराष्ट्रातील प्रत्येक माणसची छाती अभिमानाने भरून येते, त्या महाराजांना अपेक्षित असणारं रयतेचं राज्य पुन्हा आणण्यासाठी ही शिवस्वराज्य यात्रा आहे.

नेमकं कसं असतं रयतेचं राज्य, नुसतं म्हटलं आणि झालं, असं नाही. जेव्हा राज्यातल्या प्रत्येकाला, हे सरकार, हे राज्य आपलं आहे, असं वाटतं. हे सरकार माझं आहे आणि हे सरकार माझ्या हक्कासाठी आहे, याची जाणीव होते, तेव्हा ते रयतेचं राज्य होतं. जेव्हा प्रत्येक माता भगिनीला सुरक्षिततेची भावना निर्माण होते, समान संधीची भावना निर्माण होते, तेव्हा ते रयतेचं राज्य होतं. जेव्हा प्रत्येक तरुणाला त्याच्या भविष्या विषयीची चिंत भेडसावणे बंद होते आणि त्याला रोजगाराची संधी मिळते, सन्मानाने जगण्याची संधी मिळते, तेव्हा ते रयतेचं राज्य होतं. असं हे रयतेचं राज्य आणण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा आहे.

राज्यात तीन यात्रा सुरू आहेत. त्यातील एक यात्रा अजितदादांनी जागं केल्यानंतर स्थगित करण्यात आली. महाराष्ट्रात काही ठिकाणी पूरस्थिती आहे. काही ठिकाणी ओला दुष्काळ आहे. अनेक ठिकाणी पाण्याचा दुर्भिक्ष्य आहे. आणि असं असताना ज्यांना पाच वर्षे काम करण्याची संधी दिली होती, ते काम करण्यात पूर्णपणे अपयश आल्यामुळे लोकांना सांगावं लागत आहे की, पुन्हा एकदा साथ द्या. या सत्ताधाऱ्यांचे काम लोकांचे प्रश्न सोडवणं आहे, ही अजितदादांनी जाणीव करून दिल्यानंतर आता कुठं तरी महाजनादेश यात्रेला ब्रेक लागला आहे. ज्यांना महाराष्ट्राच्या प्रश्नाची जाण आहे, जो महाराष्ट्राचे प्रश्न सोडवले, अशीच व्यक्ती मुख्यमंत्री व्हायला



पाहिजे. हा महाराष्ट्राचा कल दिसल्याशिवाय राहणार आहे.

काही लोकांचे असतं खोटं बोल, पण रेटून बोल. ही तरुण पोरं आहेत. त्यांच्या हातात स्मार्ट फोन आहे. त्यावर मध्येच एक फोन येतो, त्यावर लिहिलेले असते, आदरणीय पवारसाहेबांनी महाराष्ट्रासाठी काय केले. त्या पोराला हे समजत नाही की, या महाराष्ट्रातील शेती असेल. महाराष्ट्रातील जिरायती शेती बागायती होणं असेल, या महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला बळकटी येणं असेल, महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना वाढ मिळणे असेल, हे सगळं पवारसाहेबांच्या दूरदृष्टीकोनातून झालेले आहे. माता भगिनींना 33 टक्के आरक्षणाचा मुद्दा असेल, हा पवारसाहेबांच्या क्रांतीकारी निर्णयातून झाला. आणि आज युवकांना रोजगार देण्याची जी पायाभरणी झालेली आहे, ती पवारसाहेबांच्या दूरदृष्टीकोनातून झालेली आहे. आणि मग त्यातून आलेली सुबत्ता आणि त्यातून हातात आलेला स्मार्ट फोनमधून विचारले जातंय की त्यांनी काय केले, त्यावेळी तो स्मार्ट फोन खाली ठेवावा आणि आपल्या वडिलांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्याकडे पहावे आणि त्या सुरकुत्यांमध्ये जे सुख वाटतं, ते पवारसाहेबांच्या दूरदृष्टीकोनातून आणि द्रष्टेपणातून वाटत आहे.

जेव्हा नगर शहराचा आपण विचार करतो, तेव्हा मागच्या काळात संग्रामभैय्यांच्या बाबतीत जी गोष्ट घडली, एक प्रकरण घडत आणि त्यात केवळ एक उमदं युवा नेतृत्व पुढे येतंय म्हणून केवळ राजकीय सूडापोटी त्या नेतृत्वाला जर गोवण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याचं उत्तर समस्त नगरकरांनी संग्रामभैय्यांवर विश्वास दाखवून सडेतोड त्याचे उत्तर दिलेले आहे. स्वतः आमदार ज्यावेळी सांगतात की, आरोप आहे, तर चला मी येतो तुरुंगामध्ये, सिद्ध करून दाखवा. मी येतो तुरुंगामध्ये हे सांगण्याचे काळीज संग्रामभैय्यांकडे आहे. आणि त्यासाठी तुमचं कौतुक करतो. पण, एवढं करून तुम्ही सहानभूती घेण्यासाठी थांबला नाहीत, तर आयटीसारखा उद्योग आणून नगरातल्या तरुणांसाठी जास्तीत जास्त रोजगार मिळेल आणि इथलं स्थलांतर होणार नाही, याचा जेव्हा तुम्ही विचार करता, तेव्हा ती कौतुकास्पद गोष्ट आहे.

प्रत्येकवेळी अनेकांविषयी सोशल मिडीयातून अफवा पसरवल्या जातात. पक्षाविषयी अनेक जण विचारतात की, शिवस्वराज्य यात्रा राष्ट्रवादीला तारणार का. अरे, राष्ट्रवादीला तारण्याची गरजच नाहीये. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात आहे, प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात आज पवारसाहेबांचा विचार आहे. यात्रेला काल सुरवात झाल्यापासून आजची पाचवी सभा आहे. पुढं मराठवाड्यात जाणार आहे. मघाशीच मी दादांना सांगितले की, मराठवाड्यातून आताच फोन सुरू झालेत की, आम्हाला गावागावात यात्रेचे स्वागत करायचे आहे. कारण, महाजनादेश आणि जनाशीर्वाद या यात्रा लादलेल्या आहेत आणि शिवस्वराज्य यात्रा ही मनाने स्वीकारलेली यात्रा आहे.

येणाऱ्या विधानसभेत बदल घडवायचा आहे. लोकसभेच्या निवडणुकीवेळी आपण पाहिले. नगरकरांनी प्रामाणिकरणाने उत्तर द्यावे, लोकसभेला जे मतदान झालं आणि मतदानानंतर जे आकडे समोर आले, त्या आकड्यावर अजून बसतोय. जर बसत नसले तर अशी परिस्थिती फक्त नगर मतदारसंघात नाही, तर अनेक ठिकाणी आहे. अनेक ठिकाणच्या उमेदवारांना लोकांना खात्री होती. अनेक गावं अशी आहेत. की, जी गावं सांगतात की, नाही आम्हाला ठाम खात्री आहे, हाच उमेदवार निवडून येणार, पण निकाल वेगळेच लागले. साडेतीनशेपेक्षा जास्त ठिकाणी नोंदणी झालेल्या मतदारांच्या संख्येपेक्षा पडलेल्या मतांची संख्या याच्यात तफावत दिसली. आणि जेव्हा ही तफावत दिसते, त्यावेळी महाराष्ट्राच्या गल्लीबोळात, चौकाचौकात एक दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली आहे, एक संशयाचे वातावरण तयार झाले आहे, ईव्हीएमविषयी. मला एक पत्रकार म्हणाले की, हे बहुमताचे सरकार म्हणायचे की, मशिन घोटाळ्याचे सरकार. जर ही सर्वसामान्य माणसांची भावना असेल, तर जेव्हा आपण शिवछत्रपतींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवतो, की

जेव्हा स्वतःच्या पोटाच्या मुलावर संशय घेण्यात आला, त्यावेळी पोटच्या मुलालादेखील न्याय निवाड्यासाठी दरबारात उभं केलं. त्या शिवछत्रपतींचे रयतेचे राज्य आणायचे असेल तर रयतेच्या मनात इव्हीएमविषयी संशय असेल तर आता इव्हीएम नको बॅलेट पेपरवर निवडणूक झाली पाहिजे. एकदा कळूद्याना लोकांना आपण दिलेले मत बरोबर गेले आहे. तुम्ही केलाय तर कशाला घाबरता.

ही लढाई सुरू झाली आहे भावांनो, ही लढाई सुरू झाली आहे आपल्या हक्कांवर. त्यामुळे येणाऱ्या अफवांवर, चर्चांवर, बाजार गप्पांवर विश्वास ठेवू नका. एकच गोष्ट मनात ठेवा, जे असतील त्यांच्या सोबत आणि जे जातील त्यांच्याशिवाय आणि जे कोण आडवे येतील, त्यांच्या छाताडावर पाय देऊन शिवस्वराज्य आलंच पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झालेच पाहिजे.

## शिवस्वराज्य यात्रेतून युवकांच्या डोळ्यात भविष्य

**गंगापूर** : माध्यमात बातम्या सुरू आहेत की, मुख्यमंत्र्यांची महाजनादेश यात्रा स्थगित आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची शिवस्वराज्य यात्रा सुसाट. आज नगरमधून निघाल्यानंतर प्रत्येक ठिकाणी जोरदार स्वागत होत होतं, आणि हा प्रतिसाद पाहिल्यानंतर सोशल मिडियावर एक प्रतिक्रिया आली. सर्वसामान्य माणसाची ती प्रतिक्रिया इतकी बोलकी आहे आणि ते तुमच्या कष्टाचे यश आहे. ते प्रतिक्रिया अशी आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खिंडार पडलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भगदाड पडलं, असं जर कोणी म्हणणार असेल, अशा बातम्या जर कोणी देत असेल, तर त्यांनी शिवस्वराज्य यात्रेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद बघावा आणि नंतर कोणी बोलण्याची हिंमत करणार नाही. आपल्या नावापुढे कधी छत्रपती लावायचे नाही. कारण, आपण फक्त छत्रपतींचे मावळे आहेत.

अफवा पसरवल्या जातात की, या जिल्ह्यात हे गेले, त्या जिल्ह्यात ते गेले. जेव्हा कधी अफवा पसरवल्या जातात, तेव्हा लक्षात ठेवा की, इतिहासाची पुनुरावृत्ती होत असते. पवारसाहेबांनी सहाचे साठ आमदार करून दाखवले आहेत. ही पानगळ सुरू आहे. आणि जेव्हा पानगळ झाली की नवीन पालवी फुटते, हा निसर्गाचा नियम आहे. ही नवीन पालवी फुटणार आहे. ज्या पद्धतीने माता भगिनी या शिवस्वराज्य यात्रेचे स्वागत करत आहेत. पत्रकार बंधूंमध्ये एक उत्सुकता दिसत आहे. त्या पद्धतीने युवकांच्या डोळ्यात शिवस्वराज्य म्हटल्यावर भविष्याची आशा दिसते, एक विश्वास दिसतोय की, इथं भवितव्य बदलणार आहे. या तरुणांच्या हातात ताकद आहे. मूठभर मावळ्यांसोबत घेऊन महाराजांनी स्वराज्य निर्माण केले होते. त्याच शिवनेरीची माती कपाळाला लावून ही शिवस्वराज्य यात्रा सुरू झालेली आहे.

पारदर्शी कारभार म्हणून 2014 मध्ये आलेल्या सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी कधी जाहीर केली नाही. या सरकारने नक्की किती गुन्हेगारी आहे, ते सांगावं. या सरकारने नक्की किती उद्योगधंदे बंद पडलेत, ते सांगावं. या सरकारने किती तरुणांना रोजगार बुडलाय, ते सांगावं. या सरकारने शेतमालाला हमीभाव देत असताना 16 पिकांचा समावेश झाला असताना 12 पिकांचा समावेश अजून का करता आला नाही, हे सुद्धा सांगावं.

चंद्रपूर जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांची गाडी खड्ड्यात अडकली आणि यात्रा स्थगित झाली. याला विकास म्हणतात. महाराष्ट्र म्हणतोय, हातच्या काकणाला आरास कशाला. 2014 ला म्हणाले होते, कुठं नेऊन ठेवलाय म्हाराष्ट्र माझा. आता तुम्हीच खड्ड्यात नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा.

महाराष्ट्रात दुष्काळ स्थिती असताना राज्याचे एक मंत्री नृत्य करताना महाराष्ट्राने पाहिले. त्यांचे नृत्य कौशल्य पाहिले. मला प्रश्न खरोखर प्रश्न पडला की, खरंच या मंत्र्यांना जनतेच्या प्रश्नाची जाण व चाड राहिली आहे का? एकीकडे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी जाणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व दिसतात, तर दुसरीकडे ही अशी नेतृत्व असतात. राज्यातल्या नेतृत्वावर जनता अविश्वास दाखविताना दिसत आहे. जेव्हा युवकांना दिवसभर मी भेटलो. त्यांच्या डोळ्यात भवितव्याची चिंता दिसते. घरचे सांगतात, कॉलेजला जा, अभ्यास कर. सगळं शिकतो. अभ्यास करतो. मान मोडून अभ्यास करतो. डिग्री मिळवतो. डिग्री मिळविल्यानंतर



नोकरी आहे का. नाक्यानाक्यावर दिसणारे तरुणांचे टोळके ही साधी गोष्ट नाही, ही प्रचंड शक्ती आहे. या तरुणांची शक्ती पाण्याच्या प्रचंड साठ्यासारखी आहे. त्याने नंदनवन फुलते, पण भिंत फुटली तर महाप्रलय येतो. ही तरुणांची शक्ती महाराष्ट्रात खदखदत आहे. त्यावेळी अजितदादा छातीठोकपणे सांगतात की, भूमिपूत्रांना 75 टक्के जागा देणार आणि सरकार आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत शासकीय भरती पूर्ण करणार, त्या आश्वासनाला महाराष्ट्राच्या तरुणाईची साथ हवी. येताना मी शहीद काकासाहेब शिंदे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आलो. ज्या काकासाहेबांनी मराठा आरक्षणासाठी जलसमाधी घेतली. आरक्षण समोर आल्यानंतर ते सुप्रीम कोर्टात टिकावे. कारण, आघाडी सरकारने दिलेले आरक्षण दुर्दैवाने कोर्टात टिकले नाही. हे होत असताना ओबीस समाजाला दिलेले राजकीय आरक्षण टिकले पाहिजे. आणि हे वारंवार पहायला मिळते की, एका समाजाला दुसऱ्या समाजाच्या विरोधात उभे केले जाते, तर तिसऱ्या समाजाला चौथ्याच्या विरोधात उभे केले जाते. तुम्ही आपापसात भांडत बसा आणि आम्ही सत्ता करतो. त्यामुळे बारा बलुतेदार आणि सोळा आलुतेदार एकत्र आणण्यासाठी ही शिवस्वराज्य यात्रा आहे. आणि हे मी म्हणत नाही, तरुण सोशल मिडियीवर म्हणत आहे. 370 कलमाविषयी न बोलता अमोल कोल्हे शिवस्वराज्य यात्रा करत आहेत, असं ट्रोल केलं जात आहे. अरे, अजितदादांनी त्या विषयी भूमिका मांडली आहे. देशहिताचं जे आहे, त्याचं समर्थन केले पाहिजे. पण, त्यावेळी माझ्या युवकाला सांगितलं पाहिजे की, 370 कलम रद्द केल्याने तुला आनंद होणं स्वाभाविक आहे, पण त्याने तुझ्या आयुष्यात नेमका काय फरक पडणार



आहे. त्याने तुझ्या चेहऱ्यावरची चिंता मिटणार आहे का. घरी आल्यानंतर दोन पैसे कमावतो की नाही, हा प्रश्न विचारला जाणार आहे का. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहे का, हाही प्रश्न विचारला पाहिजे. म्हणून विरोध केला म्हणून ट्रोल करणं चुकीचं आहे. विवेक शाबूत ठेवून त्याचा वापर करा.

मला नगरमध्ये विचारले गेले की, पंतप्रधानांच्या अभिनय कौशल्याविषयी आपले काय मत आहे. मी म्हणालो, मी सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. देशाच्या पंतप्रधानांविषयी बोलण्याइतका मोठा नाही. ही पवारसाहेबांची शिकवण व संस्कृती आहे. महाराष्ट्राचे प्रश्न सुटले पाहिजे म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा आहे.

गंगापूरमध्ये एक नवीन गोष्ट पुढे येत आहे. येथील विधानसभेसाठी बिरबलाच्या खिचडीच्या गोष्टी सारखी आहे. रुग्णालयाचे उद्घाटन झाले का. किती दिवस झाले, नारळ फुटून. उपजिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होऊन किती दिवस झाले. झाले का उद्घाटन. क्रीडासंकुल 10 वर्षे चाललय. झालं का ते. ही बिरबलाची खिचडी नाही का. सगळ्यात मोठा विनोद कानावर आला की, सन्माननीय आमदारांविषयी त्यांचेच आमदार मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करतात. मला वाटतंय, ही एक वेगळीच गोष्ट आहे. आमदारांनी सांगितले होती की, टेंभापुरी धरणातून जायकवाडीचे पाणी आण्याची. 2009 ला आश्वासन दिले होते. मग सर्वपक्षीय बैठकीत सांगितले होते की, आश्वासने द्यायची असतात, पण पाळायची नसतात. तर ध्यानात घ्या, भाकरी फिरवायची वेळ आली आहे. ती येणाऱ्या निवडणुकीत फिरवायची आहे. पवारसाहेब जो उमेदवार देतील, त्या उमेदवाराच्या मागे पाठिशी तुमची ताकद दिली



पाहिजे. जर उरात हिम्मत आणि मनगटात ताकद असेल तर कोणतीही गोष्ट शक्य करता येते. ही गोष्ट तुम्ही येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीवेळी लक्षात ठेवा. आमदार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचाच असला पाहिजे. पुन्हा आघाडीचे सरकार आणण्यासाठी तुम्ही कंबर कसली पाहिजे.

## तर रावाचा रंक व्हायला वेळ लागणार नाही

महाराष्ट्रातील माता भगिनींची एवढी भीती का वाटते असा सवाल करतानाच अहो भगिनींनी आशिर्वाद दिला तर रंकाचा राव होतो परंतु त्यांनी शाप दिला तर रावाचा रंक व्हायला वेळ लागणार नाही हे लक्षात ठेवा असा इशारा डॉ. अमोल कोल्हे यांनी पंढरपूर येथील जाहीर सभेत दिला. पंढरपूरच्या सभेत राज्यात महिलांवर होत असलेल्या अत्याचाराचा पाढाच वाचला आणि मग इथे आया बहिणींची सुरक्षितता कुठे आहे असा सवालही डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्र्यांना केला. पुन्हा मलाच मुख्यमंत्री करा हे सांगण्यासाठी महाजनादेश यात्रा आहे अशी टिका डॉ. अमोल कोल्हे यांनी केली. ज्यांनी महापुरुषांच्या फोटोत भ्रष्टाचार केला त्यांनी आम्हाला भगवा कसा पेलायचं हे सांगू नका असा टोला विनोद तावडे यांचे नाव न घेता लगावतानाच त्यांच्या चांगलाच समाचार घेतला. कर्जमाफी झाली नाही तर सत्तेला लाथ मारु म्हणणारे उध्दव ठाकरे सांगा का मारली नाही अजून लाथ... जसे गुळाला डोंगळे चिकटून राहतात तसे का राहिला आहात असा सवालही डॉ. अमोल कोल्हे यांनी केला. भगवा दाखवला आणि तरुणांची माथी भडकवली होती त्याच तरुणांना सांगायचं आहे हा भगवा माथी भडकवण्यासाठी नाही तर रक्षण करण्यासाठी आहे हे सांगण्यासाठी आम्ही भगवा हाती घेतला आहे असेही डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले.



## तुमच्या माझ्या डोक्यावर हुकुमशाहीचा वरंवटा हे सरकार फिरवल्याशिवाय राहणार नाही

राष्ट्रवादीचे युवा आक्रोश आंदोलन होणार होते परंतु त्याला परवानगी नाकारण्यात आली. अनेक प्रकारे त्रास देण्याचा प्रकार सध्या घडत आहे. कायद्याच्या चौकटीत बसवून तुमच्या - माझ्या डोक्यावर हुकुमशाहीचा वरंवटा हे सरकार फिरवल्याशिवाय राहणार नाही असा इशारा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी इंदापूर येथील जाहीर सभेत दिला. या इंदापूरच्या सभेत फायनलच करायला आलोय की, भविष्यात भाजप- सेनेचे सरकार असणार नाही असेही अमोल कोल्हे यांनी सांगितले. कमळ जेव्हा फुलते त्यावेळी त्याच्या आजुबाजुला भुंगे खुप येत असतात परंतु भुंगे पाकळ्यांच्या आत आल्यावर कमळ पाकळ्या बंद करते आणि मग आतमध्ये गेलेले भुंगे गुदमरुन मरतात ही गोष्ट लक्षात ठेवा असा इशाराही अमोल कोल्हे यांनी भाजपात प्रवेश करणाऱ्या लोकांना दिला. पवारसाहेबांनी सांगितले खासदारकीचा राजीनामा दे क्षणाचा विचार करणार नाही आणि राजीनामा देईन कारण मी पवारसाहेबांचा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. मला पदाचा कुठलाही मोह नाही. मी सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून रहायला आवडेल असेही अमोल कोल्हे यांनी स्पष्ट केले.

## छत्रपतींचा भगवा पेलण्याची नीतीमत्ता नसल्यानेच भगवा आम्ही खांद्यावर घेतलाय

भगवा पेलण्यासाठी नीतीमत्ता असावी लागते. मात्र तुमची ती नीतीमत्ता नसल्यानेच आम्हाला छत्रपतींचा भगवा हाती घ्यावा लागला आहे. कारण तुम्ही जी फसवणूक केलात ती फसवणूक उघड करण्यासाठीच असल्याचे जाहीर आव्हान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी वाशीच्या जाहीर सभेत भगव्याची मक्तेदारी घेतलेल्यांना दिला. महाराष्ट्रातील तरुण, महिला, शेतकऱ्यांनी ठरवलं आहे शिवस्वराज्य आणायचं म्हणूनच राज्यात निघालेल्या शिवस्वराज्य यात्रेला भरभरुन प्रतिसाद मिळत आहे आणि मुख्यमंत्र्यांच्या महाजनादेश यात्रेला काळे झेंडे दाखवले जात आहेत हा दोन यात्रेतील फरक लक्षात घ्या असे आवाहन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी यावेळी केले. लाथ मारेन तिथे पाणी काढण्याची ताकद तरुणांमध्ये आहे आणि हीच ताकद शिवस्वराज्य आणणार असल्याचा विश्वास खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रवादीच्या झंझावातासमोर कमळाची पाकळीही शिल्लक राहणार नाही

राज्यात राष्ट्रवादीचा झंझावात असा येणार आहे की, कमळाची पाकळीही शिल्लक राहणार नाही असा जबरदस्त इशारा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी जामखेडच्या जाहीर सभेत दिला. उमदं नेतृत्व जामखेडमध्ये उदयाला येत आहे. एक महत्वाचं इथे घडलं आहे ते म्हणजे दोघेजण आमनेसामने येण्याची पहिली वेळ या जामखेडच्या रथयात्रेच्या माध्यमातून घडली आहे असेही अमोल कोल्हे म्हणाले. खबरदार मशीनमध्ये घोटाळा केला तर हीच तरुणाई रस्त्यावर उतरुन पळता भुई थोडी करेल हे लक्षात ठेवा असा इशाराही खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी देतानाच असुदे मशीन घाबरुन जाऊ नका घ्या छत्रपतींचे नाव आणि करा परिवर्तन असा आत्मविश्वास डॉ. अमोल कोल्हे यांनी जनतेच्या मनात निर्माण केला. तीन वर्ष कर्जमाफी शेतकऱ्यांना दिली जात आहे. ती तत्वत:, शाश्वत होती हे लक्षात घ्या असा टोला सरकारला लगावला. जामखेड कर्जतमधील शेतकऱ्यांची शेती नुसतीच करपली नाही तर तरुणाचं भविष्य करपुन गेले आहे असेही अमोल कोल्हे यांनी सांगितले. नुसते मेकअप करुन करुन मिरवणारे बॅनरमंत्री तुमचा विकास किती केला आहे हे चंद्रावर गेल्याचे समाधान रस्त्यावरील खड्ड्यातून जाताना मिळाले अशी जोरदार टिकाही नाव न घेता पालकमंत्र्यांवर केली.



# महाराष्ट्रातील दळभद्री सरकार आता उलथून टाकायचे

## विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे आवाहन

**राजगुरूनगर** : आज सकाळी साडेआठ वाजता मी आणि डॉ. अमोल कोल्हे साहेबांनी शिवनेरी गड चढायला सुरवात केली. मला माहिती नाही, डॉ. कोल्हेंच्या मनात त्यावेळी काय चाललं होतं. पण, जसाजसा मी शिवनेरीची एक एक पायरी चढत होतो, त्यावेळी गेल्या दीड दोन महिन्यांचा प्रत्येक दिवस मला ती पायरी चढताना आठवत होता. शिवाई मातेचं नतमस्तक होऊन दर्शन घेतलं. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मठिकाणी जाऊन आम्ही नतमस्तक झालो. आणि तिथलीच माती आम्ही सर्वांनी आमच्या कपाळी लावली आणि आम्ही सर्वांनी संकल्प सोडला, की आता आपल्याला या महाराष्ट्रातील शिवसेना आणि भाजपचे दळभद्री सरकार उलथून टाकायचे आहे.

खरं तर दोन यात्रा अगोदरच चालू आहेत. एक भाजपची महाजनादेश यात्रा चालू आहे. त्याचे नेतृत्व मुख्यमंत्री करत आहेत. मला त्या महाजनादेश यात्रेचा अर्थच नेमका कळाला नाही. ती महाजनादेश यात्रा कशासाठी आहे, जो राज्याचा विद्यमान मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या जनतेला महाजनादेश यात्रेच्या निमित्ताने जाऊन सांगतोय की, पुढे मीच मुख्यमंत्री. शिवसेनेच्या युवराजाची जनआशीर्वादयात्रा आहे. युवराजांचे वय काय. ते ज्या वयात आहेत, त्या वयात आशीर्वादच घ्यावा, याबाबत दुमत नाही. पण, शिवसेनाही त्या जनआशीर्वादाच्या माध्यमातून सांगत आहे, की येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत आमचे युवराजच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. आता महाराष्ट्रात शिवसेना आणि भाजपच्या या ज्या दोन प्रमुख यात्रा चालू आहेत, त्या दोन्हीही यात्रेमध्ये जनतेसाठी काय केले, ते सांगत नाहीत. मीच मुख्यमंत्री आहे, एवढंच सांगितलं जातय. म्हणून आज ज्यावेळी आम्ही श्री शिवछत्रपतींच्या जन्मठिकाणाची माती कपाळी लावली, आणि तिथून निघालो, त्यावेळी ही शिवस्वराज्ययात्रा कशासाठी आहे, छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणारे, जे स्वराज्य आहे, जे रयतेचं राज्य आहे. ते जनतेचे राज्य पुन्हा या महाराष्ट्रात आणायचे आहे, म्हणून ही शिवस्वराज्य यात्रा आहे. इथं फडणवीसांचं आणि ठाकरेंचं राज्य आणायचे म्हणून नाही. एकीकडून फडणवीस फिरतायेत, मीच मुख्यमंत्री म्हणून. दुसरीकडे युवराज ठाकरे फिरतायेत, मीच मुख्यमंत्री म्हणून. मध्येच पुण्यात भाजपचे अध्यक्ष, महसूलमंत्री, नेक्सट सीएम त्यांनी पत्रकार परिषद घेतली. पत्रकाराने त्यांना विचारले, चंद्रकांतदादा तुम्ही आता अध्यक्ष झालात. मुख्यमंत्रीपदाबाबत तुमचं काय मत आहे. ते म्हणाले, तसं काही नाही. पण, पक्षाने जर मला सांगितले, मुख्यमंत्री व्हायला, तर माझी काहिच हरकत नाही. म्हणजे एक सांगत फिरतोय, मीच मुख्यमंत्री आणि दुसरीकडे हे म्हणतोय,



# छत्रपतींच्या अपमानाचा विधानसभा निवडणुकीत बदला घ्या...

मिळालं तर मी पण. पण, या दोन्हीही यात्रेमध्ये आणि ज्या पक्षांनी या यात्रा काढल्या, ते सत्तेत असणारे पक्ष आहेत. पण, त्यांना या महाराष्ट्रातील जनतेचे दुःख दिसत नाहीत. त्यांचे प्रश्न दिसत नाहीत. हे दुर्दैव आहे. आणि ते दुःख राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला दिसलं. गेली पाच वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने रस्त्यावर उतरून आणि सभागृहात संघर्ष केला. मग तो महागाई विरोधात असेल, या महाराष्ट्रातील सामान्य शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा असेल, वेगवेगळ्या शहरांच्या अडचणीचा असेल. पण, संघर्ष केला. मग तो कधी आरक्षणाच्या बाबतीत असेल. संघर्ष करण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कधी कमी पडली नाही. आणि आजही अशा परिस्थितीत ज्यावेळी शिवसेना आणि भाजप असं दाखवत आहेत की, आता या महाराष्ट्रात विरोधी पक्षच शिल्लक नाही. अनेक मान्यवरांना घ्यायला लागले आहेत. कोणी कोणाला घ्यावं, याबाबत आमचं म्हणणं नाही. पण काल-परवा मी एबीपी माझावर एक कार्यक्रम पाहिला, ते मी म्हणत नाही की, भाजप हा काशीचा घाट झाला आहे. काशीचा घाट माहिती आहे, तिथं जाऊन एकदा का अंघोळ केली. सबंध आयुष्याचे पाप निघून जाते आणि माणूस शुद्ध होतो. आज विद्यमान मुख्यमंत्र्यांनी विजयकुमार गावित यांच्यावर फक्त सभागृहात आरोप केले नाहीत, तर औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. ज्या बबनराव पाचपुतेंच्या विरोधात भ्रष्टाचाराचा स्कॅम ज्या देवेंद्र फडणवीसांना सभागृहात मांडला, ते भाजपमध्ये गेले आणि शुद्ध झाले. जे आता कोणी गेले, ते कशासाठी. वाईट एकाच गोष्टीचं वाटतं, आजची एंशीव्या वर्षीही साहेबांना चिंता आहे ती, महाराष्ट्रातील सामान्य जनतेची. ज्या जनतेच्या सेवेसाठी आपल्याच पक्षातील असंख्य लोकांना 15-15, 20-20, 25-25 वर्षे मंत्रीपद ठेवले, पाच वर्षे पक्ष सत्तेच्या बाहेर काय गेला, तर या वयात साहेबांना सोडून माणसं निघून गेली. अरे, आज हे सगळं आठवल्यानंतर मला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आठवतो. त्या इतिहासातही छत्रपतींचे घर फोडायचा प्रयत्न कोणी केला होता, (प्रेषकातून आवाज-अनाजीपंत) आणि आता या एकविसाव्या शतकात आपल्या छत्रपतींच्या घरात फूट पाडण्याचे काम कोणी केले, याच्यासाठी ही शिवस्वराज्य यात्रा आहे.

ज्यावेळी मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मठिकाणी नतमस्तक होऊन आलो, त्यावेळेस एकच प्रार्थना त्या ठिकाणी केली, युगपुरुष म्हणून आपण या ठिकाणी जन्माला आलात, माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या पोराला एवढी शक्ती दे, की ज्या सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केलाय, त्या सरकारमध्ये असलेला कुठलाही पक्ष पुढची 25 वर्षे महाराष्ट्रात दिसला नाही पाहिजे.

दोन वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक व्हावे, यासाठी देशाचे पंतप्रधानांनी भूमिपूजन केल्याचे आपण दिवसभर टीव्हीवर पाहिले. पण, दोन वर्षे झाली तरी अरबी समुद्रात शिवस्मारकाची एक वीटही फडणवीस आणि ठाकरे सरकारकडून रोवली गेली नाही. त्यानंतर गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मारकाचे भूमिपूजन झाले एक वर्षांनी. ते स्मारक उभं राहिलेलं आपण पाहिले. पण, आपल्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक यांनी केले नाही. हा अपमान तुमचा नाही का, हा अपमान शिवाजी महाराजांचा नाही का, हा प्रश्न मी आपल्याला या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आपल्या सर्वांना विचारतो. हा जर अपमान तुम्हाला वाटत असेल तर ज्यांनी हा अपमान केलाय, त्याचा बदला घेण्याची वेळ विधानसभेच्या निवडणुकीत आपल्या सगळ्यांना येणार आहे. त्यावेळेस मात्र यांना सोडू नका.



दुसऱ्यांना एतिहासिक कर्जमाफीची घोषणा केली. दिली दिड लाखाची आणि त्या योजनेला नाव दिले, छत्रपती शिवाजी महाराजांचे. नाव छत्रपती शिवाजी महाराजांचे. कर्जमाफी दिड लाखाची. तीही फसवी. खरी आहे का नाय. सलग तीन वर्षे कर्जमाफी चालत आहे. जर या योजनेतून शेतकऱ्यांची फसवणूक होत असेल तर जी योजना युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे नावानी काढली, त्या छत्रपती शिवाजी महाराजांचाचा तो अपमान नाही. इंदू मिलमध्ये दोन वर्षापूर्वी माननीय प्रधानमंत्र्यांच्या हस्ते डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे भूमिपूजन तुम्ही केले. कुठं आहे ते स्मारक. हा त्यांचा अपमान नाही. दीड वर्षापूर्वी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या तरुणाईला हाताला रोजगार मिळण्यासाठी मेगाभरतीने 72 हजार रोजगार आम्ही या महाराष्ट्रात निर्माण करणार. किती जणांना मिळाले. आज महाराष्ट्रातल्या तरुणाईला कळाले, अरे रे रे. ही मेगाभरती आपल्यासाठी नव्हतीच. आता जी भाजप मेगाभरती करत आहे, तीच मेगाभरती होती. दुसरी नाही. हा या महाराष्ट्रातील तरुणाईचा अपमान आहे. मग वारंवार जर महाराष्ट्रातील सामान्य जनतेचे अपमान होत असतील, तर असं अपमान करणारं सरकार या पुरोगामी महाराष्ट्रात चालणार नाही. हेच उभ्या महाराष्ट्रात शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने सांगणार आहे. या शिवस्वराज्य यात्रेला काय पाहिजे, तर तुमचा आशीर्वाद. आणि तो आशीर्वाद शिवस्वराज्य यात्रेला यशस्वी होण्यासाठी नाही, या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने या महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने परिवर्तन व्हावं, आणि महाराष्ट्रातील जनतेचं रयतेचं राज्य या महाराष्ट्रात यावं, यासाठी आपल्या शिवस्वराज्य यात्रेला आशीर्वादाची गरज आहे.

ईव्हीएम हटाव, देश बचाव, हे तुमच्या मनात आहे की, नाही. माझ्या जिल्ह्यात गेल्या 25 वर्षांपासून कुठलीही निवडणूक असूदे ग्रामपंचायतीची, जिल्हा परिषद, सेवा सोसायटी, पंचायत समिती, विधानसभा, लोकसभा, भाजप शंभर मताच्या आतच असायची. ही 2019 ची लोकसभेची निवडणूक मी पाहिली की, त्या गावातून भाजपला 1400 मतांची आघाडी मिळाली. खरं काय खोटं काय, काय माहिती. पण, या देशातल्या बहुसंख्या लोकांना आज जर काय येणारी निवडणूक पारदर्शक व्हावी, याच्यासाठी ईव्हीएमच्या ऐवजी जर बॅलेट पाहिजे असेल, तर भाजपला अडचण काय आहे. आणि जी भाजप ज्यावेळी निवडणूक आयोगाने 2013 मध्ये जाहिर केले की, येणारी 2014ची निवडणूक ईव्हीएमवर घेणार. त्यावेळी या देशातील जो विरोधी पक्ष पहिल्या क्रमांकावर होता, तो भाजप लालकृष्ण अडवणींच्या घरी बैठक घेऊन मोर्चाही काढला आणि कोर्टात गेले. आज जर भाजप आणि शिवसेनेच्या लोकांना वाटत असेल, लोकं आपल्याला मतदान देतात, तर ईव्हीएम हटवून बघा. देऊद्या लोकांना बॅलेटवर मतदान, आमची काय हरकत नाही. आजच्या या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आम्ही आपल्याकडे त्यासाठीचे फार्म देत आहोत, तेही आपल्याला भरून द्यायचे आहेत. आपल्याला ते इलेक्शन कमिशनकडे पाठवायचे आहेत. आपल्या सर्वांचे आभार मानल्याशिवाय माझे भाषण संपवणार नाही. डॉ. अमोल कोल्हे यांना काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आघाडीकडून उमेदवारी दिली आणि या खेड मतदारसंघातसुद्धा लीड देऊन देशाच्या सर्वभौम सभागृहात पाठवले. त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो.






Best

Compliments

# काश्मीरचे साहस केवढ्यात पडणार?

आकाश, नवी दिल्ली



फ्लॅशबॅक..............................!

नीलमत पुराणातला हा दाखला आहे. कौरव-पांडवांच्या समकालीन गोनंद राजाचे राज्य काश्मीर मध्ये होते. गोनंद हा जरासंधाचा नातेवाईक होता. श्रीकृष्ण आणि जरासंधामधील संघर्षात जरासंधाने गोनंदाची मदत मागितली होती. गोनंदाने श्रीकृष्णाच्या द्वारकेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला यश आले नाही. उलट बलरामाकडून तो मारला गेला. त्यानंतरचा त्याचा वारसदार मुलगा दामोदर यानेही सूडादाखल द्वारकेवर पुन्हा हल्ला केला पण तोही मारला गेला. त्याची पत्नी यशोमती गर्भवती होती. तिला कृष्णाकडून अभय देण्यात आले. यथावकाशाने तिने मुलास जन्म दिला व त्याचे नामकरण गोनंद-द्वितीय असे करण्यात आले. यशोमतीला अभय देण्याच्या कृष्णाच्या निर्णयाला अनेकांचा विरोध होता. परंतु कृष्णाने या विरोध करणाऱ्यांना समजावून सांगताना काश्मीरची भूमि ही पार्वतीची भूमि मानली जाते व तेथील राजा हा शिवाचा अवतार मानला जातो व त्यामुळे त्यांना दुखावण्यापेक्षा त्यांच्याशी चांगले संबंध राखणे अधिक उचित व उपकारक आहे. कृष्णाचा उपदेश त्यावेळी बहुधा मानला गेला असावा. परंतु काश्मीरचा इतिहास वर्णन करणाऱ्या अनेक प्राचीन ग्रंथातून या भूप्रदेशाचे व तेथील रहिवाश्याचे वर्णन करताना, त्यांना पूर्णतया कह्यात ठेवणे अशक्य आहे आणि काश्मीर व तेथीन जनतेने आपले अस्तित्व कायम स्वतंत्र राखण्याचा प्रयत्न केला होता असे दाखले देण्यात आलेले आढळतात.

आता आपण वर्तमानात येऊ !

पंतप्रधान आणि त्यांचे सेनापति बलराम........ नव्हे , नव्हे, गृहमंत्री कोणत्या राज्याचे आहेत ?? ते सर्वांनाच माहिती आहे. त्या राज्यातच द्वारका आहे हेही सर्वांना माहिती आहे ! आता या पुराणकालीन दाखल्याचा अर्थ ध्यानात आला?

पुराणातली वांगी पुराणात राहू द्यात ! वर्तमानकाळात राहणे केव्हाही चांगले. पण कधीकधी पुराणातले असे दाखले असे काही चपखल ठरतात की ज्याचे नाव ते ! त्यामुळेच हा दाखला देण्याचा मोह झाला!

वर्तमान मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या कलम 370मधील तरतुदी रद्द करुन टाकल्या. ते करताना त्यांनी या राज्याची दोन केंद्रशासित प्रदेशात विभागणी केली. लेह व कारगिल या दोन जिल्ह्यांनी मिळून होणारा लडाख हा पूर्णपणे केंद्रशासित प्रदेश करण्यात आला आहे. तर उर्वरित जम्मू व काश्मीर विभागालाही केंद्रशासित करण्यात आले आहे. याला मधाचे बोट म्हणून जम्मू-काश्मीरला केंद्रशासित करतानाच विधानसभाही बहाल करण्यात आली आहे. म्हणजेच या केंद्रशासित प्रदेशात निर्वाचित विधानसभा असेल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळही असेल. परंतु राज्यकारभाराचे अधिकार नसतील. ज्याप्रमाणे दिल्ली, पुद्दुचेरी येथे राज्यकारभार व प्रशासनाचे अधिकार तेथील नायब राज्यपालांच्या हाती ठेवण्यात आले आहेत तसाच प्रकार या संभाव्य राज्यात करण्यात आलेला आहे. म्हणजेच नावापुरते राज्य करण्यात येऊन या राज्याचे सर्व



अधिकार काढून घेण्यात आले आहेत व केवळ केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणेच राज्याचा कारभार केला जाणे अपेक्षित आहे. हे सर्व संसदेमार्फत आणि संसदेतील बहुमताच्या आधारे करण्यात आलेले आहे. राष्ट्रपतींची त्यावर सही देखील झालेली आहे. तरीही हे नवे राज्य प्रत्यक्षात येण्यासाठी 31 ऑक्टोबरचा मुहुर्त निश्चित करण्यात आला आहे. सरदार पटेल यांचा जयंती दिवस ! ज्या सरदार पटेलांनी पहिले गृहमंत्री या नात्याने भारतातील संस्थाने खालसा करुन विखुरलेल्या देशाचे एकीकरण केले त्या पटेलांचा वारसा सांगणाऱ्यांनी जम्मू-काश्मीर-लडाख या राज्याचे दोन भागात तुकडे केले. या प्रक्रियेत या राज्याला असलेली विधानपरिषदही नाहीशी झाली.

संसदेतील बहुमताच्या आधारे आणि विरोधी पक्षांना न जुमानता तसेच जम्मू-काश्मीरच्या जनतेला विश्वासातही न घेता केंद्र सरकारने परस्पर हा प्रकार केला. या सरकारला तीनशेच्या वर जागा मिळाल्यानंतरच जम्मू-काश्मीरचे भवितव्य निश्चित झाले होते. परंतु लोकसभा निवडणुकीनंतरच्या पहिल्याच संसदीय अधिवेशनात व कोणतीही पूर्व सल्लामसलत, विचारविनिमय न करता या सरकारने एवढा मोठा निर्णय करुन टाकला. एखाद्या रुग्णाचे ऑपरेशन करायचे असेल तर त्याला व त्याच्या नातेवाईकांना आधी विचारले जाते आणि त्यांच्या संमतीने शस्त्रक्रिया केली जाते. येथे पेशंटला न विचारताच त्याला ऑपरेशन टेबलवर घेऊन त्यांची तडकाफडकी शस्त्रक्रिया करुन टाकण्यात आली. यावरुनच हा देश लोकशाही मार्गाने चालविला जात आहे काय याबाबत प्रश्नचिन्ह उत्पन्न झाले आहे.

आता प्रश्न येतो की पुढे काय ? जम्मू-काश्मीरची शस्त्रक्रिया तर झाली, पुढे काय ? या प्रश्नांचीही उत्तरे आहेत. त्याचाच मागोवा घेऊ.

लडाख केंद्रशासित प्रदेशाबद्दल प्रथम चर्चा करु. लडाखमध्ये दोनच जिल्हे समाविष्ट होतात. लेह हा प्रामुख्याने बौध्द धर्मीय बहुसंख्यक जिल्हा आहे. तर कारगिल हा शिया मुस्लिम बहुसंख्येने असलेला जिल्हा आहे. दोन्ही मिळून सुमारे तीन लाखांच्या आसपास लोकसंख्या आहे. यामध्ये लेहची लोकसंख्या सुमारे दीड लाख आहे तर कारगिलची देखील साधारणपणे तेवढीच आहे. परंतु धार्मिक आधारावर लोकसंख्येची विभागणी पाहिल्यास शिया मुस्लिम जवळपास 46 टक्के आहेत. तिबेटी बौध्द धर्मीय 40 टक्के आहेत. हिंदू 12 टक्के आणि शीख दोन टक्के आहेत. त्यामुळे टक्केवारीच्या प्रमाणात पाहिल्यास बौध्द व हिंदू मिळून शिया मुस्लिमांपेक्षा अधिक आहेत. सध्या लडाखचे प्रतिनिधित्व करणारे संसदसदस्य बौध्दच आहेत आणि ते भाजपचे आहेत. सरकारने लडाखला केंद्रशासित दर्जा देण्याचे विधेयक संमत केल्यानंतर कारगिलमधील शिया मुस्लिमांमध्ये त्याबद्दल मोठी नाराजी निर्माण झाली आहे. कारगिलमध्ये अनेक ठिकाणी निषेध मोर्चे, निदर्शने करण्यात आली. परंतु प्रचंड अशा सुरक्षा दलांच्या दबावापुढे ही निदर्शने दडपण्यात आली. कारगिलमधील मुस्लिमांचा विभाजनाला विरोध आहे आणि त्यांनी विभाजन करायचेच असल्यास त्यांचा समावेश जम्मू-काश्मीरमध्ये केला जावा असे निवेदन दिले आहे. कारगिलच्या मुस्लिमांना काश्मीरमधील मुस्लिमांप्रमाणेच हे विभाजन म्हणजे त्यांच्या अस्तित्वावर केवळ आघातच नव्हे संकट वाटते. त्यांची ओळख पुसण्याचाच हा प्रयत्न असल्याची त्यांची ठाम धारणा आहे.

यातूनच पुढचा प्रश्न समोर येतो की ही ओळख पुसण्याचा प्रकार कसा ?

कलम 370 मधील जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या तरतुदी रद्द केल्यानंतर कुणाही बाहेरच्या व्यक्तीला म्हणजेच बिगर-कश्मिरी व्यक्तीलाही या राज्यात जाऊन निवास करता येईल तसेच





तेथे जमीनजुमला, मालमत्ता खरेदी करता येणार आहे. थोडक्यात अन्य राज्यांप्रमाणेच जम्मू-काश्मीरमध्येही बाहेरच्या राज्यातील लोकांना मुक्तद्वार



मिळवून आपला वाढता प्रभाव सिध्द केला होता. त्रिशंकू विधानसभेत भाजप व पीपल्स डेमोक्रॅटिक





राहील. सरकारने जो शाहजोगपणाचा आव आणून काश्मिरी लोकांना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याचा दावा केला आहे. प्रत्यक्षात काश्मीरची सांस्कृतिक ओळख पुसण्याचा हा प्रकार असेल. याला काश्मिरी लोकांचा विरोध असणे स्वाभाविक आहे. जम्मू-काश्मीरची लोकसंख्या 2011च्या जनगणनेनुसार सुमारे सव्वा कोटि होती आणि आता 2019 पर्यंत ती 1.47 कोटिपर्यंत पोहोचण्याची जनगणना विभागाकडून माहिती देण्यात येते. यापैकी सुमारे 69 टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. सुमारे 29 टक्के हिंदू आहेत. याखेरीज सुमारे दोन टक्के शीख आहेत तर एक टक्क्याच्या आसपास बौध्द लोक आहेत. आकड्यात बोलायचे झाल्यास सुमारे 86 लाख मुस्लिम आहेत. सुमारे 36 लाख हिंदू आहेत. सुमारे अडीच लाख शीख तर एक लाख 15 हजारांच्या आसपास बौध्द समाज आहे. हे प्रामुख्याने तिबेटी बौध्द आहेत.

लोकसंख्येच्या आणि तीन विभागांच्या आधारे जम्मू-काश्मीर विधानसभेतील जागांची विभागणी लक्षात घेता काश्मीर खोऱ्यात विधानसभेच्या 46, जम्मू मध्ये 37 आणि लडाख मध्ये 4 मतदारसंघांचा समावेश होतो. मुस्लिम बाहुल्यामुळे या राज्याच्या राजकारणावर त्यांचाच प्रभाव व वरचष्माही राहिला आहे. काश्मीर खोरे प्रामुख्याने मुस्लिम बहुसंख्यक आहे. तर जम्मूमध्ये हिंदूंचे म्हणजेच काश्मिरी पंडित, डोगरा यांचा प्रभाव आहे. विधानसभा मतदारसंघांची विभागणी लक्षात घेता काश्मीरमधील 46 व जम्मूमधील 37 जागांमधील फरक फारसा नाही. 31 ऑक्टोबरला जम्मू-काश्मीर ह केंद्रशासित प्रदेश अधिकृतपणे अस्तित्वात आल्यानंतर केंद्र सरकार सर्वप्रथम तेथील मतदारसंघांची फेररचना करणार आहे. यामध्ये हा नऊ(9) जागांचा फरक मिटविला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत (नोव्हेंबर-डिसेंबर2014) भाजपला काश्मीर खोऱ्यात एकही जागा जिंकता आली नव्हती परंतु जम्मू विभागात पक्षाने 37 पैकी 25 जागा पार्टी(दिवंगत मुफ्ती महंमद सईद व नंतर कन्या मेहबुबा मुफ्ती) यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन केले होते. उपमुख्यमंत्री भाजपचा होता. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या कलम 370 मधील तरतुदी व कलम 35(अ) रद्द करण्याचा चंग ज्याप्रमाणे भाजपने बांधला आणि तो पूर्ण केला. त्याचप्रमाणे त्यांना जम्मू-काश्मीर राज्याच्या पहिल्या हिंदू मुख्यमंत्र्याचे स्वप्नही पूर्ण करण्याची तीव्र लालसा आहे. ते करुन भारतातील तमाम हिंदू बहुसंख्यक समाजाच्या अनुनयाबरोबरच त्यांची मते पदरात पाडण्याची महत्वाकांक्षाही त्यामागे आहे. त्याचसाठी मतदारसंघांच्या फेररचनेची प्रक्रिया आपल्याला पाहिजे तशी करुन भाजपचे आमदार अधिक निवडून कसे येतील हे निश्चित केले जाईल. त्यासाठी काही मतदारसंघांचे विभाजन करणे किंवा काहींचे एकीकरण करताना मुस्लिमांचा या राज्यातील राजकारणावरील प्रभाव व वरचष्मा कसा संपुष्टात येईल यावर विशेष लक्ष दिले जाईल. त्यादृष्टीनेच पावले टाकली जात आहेत. थोडक्यात या राज्याचा सांस्कृतिक, सामाजिक चेहरामोहरा बदलण्याचे जेवढे म्हणून उपाय असतील ते करण्यात येतील.

चीनमध्ये त्यांच्या वायव्य सरहद्द भागात सिंकियांग(शिनजियांग याचा चिनी भाषेतील अर्थच सरहद्द प्रांत असा होतो) नावाचा प्रदेश आहे. तो स्वायत्त असल्याचे म्हटले जात असले तरी त्यावर चिनी सरकारची पोलादी पकड आहे. येथे मुस्लिम बहुसंख्यक आहेत. हा भूप्रदेश पाकिस्तानलाही लागून आहे आणि येथेही चीनपासून वेगळे होण्याची चळवळ चालू करण्यात आली होती पण चीन सरकारने ती बळाच्या जोरावर मोडून काढली. त्याचप्रमाणे बहुसंख्य हानवंशीय चिनी माणसांना तेथे नेऊन वसविण्याचा मोठा कार्यक्रम तेथे हाती घेण्यात आला. असाच प्रकार चीनने तिबेटमध्येही चालविलेला आहे. तेथे बहुसंख्यक हान वंशीय चिनी लोकांना नेऊन वसविण्याची मोहिम चालू आहे व मूळच्या तिबेटी लोकांना अल्पसंख्यक करुन त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करण्याचे प्रयत्न गेली

अनेक वर्षे चालू आहेत. तसाच प्रकार आता भारतात यानिमित्ताने सुरु केला जाणार काय असा प्रश्न निर्माण होतो. जम्मू-काश्मीरचे सांस्कृतिक, सामाजिक स्वरुप बदलण्याचा हा प्रकार असेल तर मात्र त्याचे गंभीर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीत. कोणत्याही प्रदेशाला आपापली संस्कृति, भाषा, चालीरीती, धार्मिक स्वातंत्र्य टिकविण्याची मुभा राज्यघटनेने दिलेली आहे. ज्याप्रमाणे भारतातल्या इतर राज्यांनी त्यांची आपापली भाषा, संस्कृति व वेगळेपण जपलेले व टिकविले आहे तेच स्वातंत्र्यही काश्मीरला दिले गेले पाहिजे. त्यावर आक्रमणाचे प्रयत्न झाल्यास पेचप्रसंग निर्माण होऊ शकतात.

कलम 370मधील काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या तरतुदी रद्द करण्याची या सरकारची घाई 'उल्लेखनीय' मानावी लागेल. नुकत्याच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. सतरावी लोकसभा अस्तित्वात आली. त्या लोकसभेचे पहिलेच अधिवेशन होते. त्या पहिल्या अधिवेशनाला मुदतवाढ देऊन ही घटनादुरुस्ती विजेच्या वेगाने मंजूर करण्यात आली. या घटनादुरुस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहे व हे प्रकरण घटनापीठाकडे देण्यात आलेले आहे. परंतु मोदी सरकारने ही घाई कशी दाखवली हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे. जम्मू-काश्मीरसंबंधी असलेल्या तरतुदींनुसार तेथे कोणतेही घटनात्मक निर्णय करताना तेथील विधानसभेची मंजुरी आवश्यक मानली जात होती. (आता हे इतिहासजमा झाले आहे). परंतु सध्या तेथे विधानसभा अस्तित्वात नाही आणि राज्यपाल महोदय तेथील




प्रशासनिक प्रमुख आहेत. विधानसभा अस्तित्वात नसल्याने संसदेनेच तेथील विधानसभेची भूमिका अदा करुन काश्मीरविषयक विशेष तरतुदी रद्द करणे, या राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन करणे हे निर्णय केले. हे कितपत ग्राह्य मानायचे याबाबत न्यायालय निर्णय करील. परंतु यासंदर्भातील तर्क आणखी ताणायचा ठरविल्यास देशातील कोणत्याही राज्याचे तुकडे करण्यासाठी किंवा त्या राज्याच्या रचनेत बदल करण्यासाठी प्रथम तेथे राष्ट्रपति राजवट लावणे आणि मग मनाला येतील तसे बदल तेथे संसदेतील बहुमताच्या आधारे करणे असा प्रकार घडल्यास कुणाला आश्चर्य वाटायला नको!

विशेष म्हणजे अनेक प्रादेशिक पक्षांनी हा धोका समोर दिसत असूनही या घटनादुरुस्तीला पाठिंबा दिला हे आश्चर्यकारक आहे. अनेक वक्त्यांनी सरकारला त्यांनी हा जो मार्ग अवलंबिला त्याबाबत खबरदारी व सावधगिरीचे इशारे दिले. जम्मू-काश्मीरसाठी अपवाद म्हणून सरकारने हा मार्ग अवलंबिलेला असला तरी भविष्यात अन्य कोणत्या राज्याबाबत त्याचा अवलंब केला जाऊ नये अशी अपेक्षा संसदेतील अनेक वक्त्यांनी व्यक्त केली. सरकारला सावध केलेले असले तरी त्याबाबतची हमी किंवा 'गॅरंटी' कोण देणार आहे ? या प्रश्नाचे खात्रीशीर उत्तर सरकारच देऊ शकते.

या निर्णयाला विरोध होऊ नये यासाठी सरकारने प्रथम काश्मीरमधील सर्व राजकीय नेत्यांना स्थानबध्द केले. फारुक अब्दुल्ला, उमर अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती या माजी मुख्यमंत्र्यांसह त्यांच्या पक्षाचे सर्व आमदार, स्थानिक नेते यांना पकडून जेरबंद करण्यात आले. काश्मीरमध्ये वाढीव सुमारे पन्नास हजारांहून अधिक सुरक्षा दलांचा बंदोबस्त वाढविण्यात आला. काश्मीर खोऱ्याचे जगाशी असलेले सर्व संपर्क प्रथम तोडण्यात आले. फोन, इंटरनेट, मोबाईल बंद करण्यात आले आणि अद्याप बंद आहेत. बाहेरुन तेथे जाणाऱ्यांना प्रवेशबंदी करण्यात आली. काही राजकीय नेत्यांनी तो प्रयत्न केला परंतु त्यांना श्रीनगर विमानतळावरुनच माघारी धाडण्यात आले. काश्मीरमध्ये वृत्तपत्रांवर निर्बंध आहेत.




म्हणजे अधिकृतपणे कोणतेही निर्बंध नाहीत. परंतु इंटरनेट किंवा अन्य कोणतीही माहिती वहनाची यंत्रणा अस्तित्वात नसल्याने वृत्तपत्रे प्रसिध्द होणार कशी असा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणजेच एका बाजुला निर्बंध नाहीत म्हणायचे परंतु वृत्तपत्रात बातम्यांसाठी जी काही संपर्क व माहिती मिळविण्याची यंत्रणा आणि प्रक्रिया असते ती बंद करणे किंवा त्याची नाकेबंदी करणे असा हा प्रकार सुरु आहे. त्यामुळे अनेक वृत्तपत्रे संपादकीयाच्या जागा कोऱ्या ठेवून प्रसिध्द होत आहेत. याविरुध्द पत्रकार संघटनांनी आवाज उठविल्यानंतर ते खोट्या बातम्या पसरवीत असल्याचा अपप्रचार सरकारी आणि सरकार धार्जिण्या व सरकार-पुरस्कृत माध्यमांतर्फे सुरु करण्यात आला आहे.

काश्मीरमध्ये जनजीवन सामान्य व सुरळीत असल्याचे

दावे सरकारतर्फे रोज केले जात आहेत. परंतु तेथील पत्रकारांच्या द्वारे तसेच काही नागरिकांतर्फे बाहेर येत असलेल्या माहितीनुसार सर्वसामान्य नागरिक भयग्रस्त आहेत. सुरक्षा दलांचे अवाजवी अस्तित्व त्यांच्या दैनंदिन जीवनव्यवहारात अडथळे निर्माण करीत आहे. बारामुल्ला येथून दिल्लीत मजल-दरमजल करीत आलेले एक स्थानिक सुकामेवा व्यापारी (त्यांचे नाव मुद्दाम देत नाही) त्यांचा अनुभव कथन करताना म्हणाले की त्यांची मुलगी बीएससी फायनलला आहे. तिची शेवटचीच परीक्षा होणार होती व तारीखही जाहीर झाली होती. परंतु आता सर्व काही रद्द झाले आहे. पुन्हा परीक्षा कधी होईल याबाबत विद्यार्थी पूर्ण अंधारात आहेत. दिल्लीत याबाबत चौकशी केली असता सरकारी वर्तुळातून सांगण्यात आलेली माहिती अवाक करणारी होती. या वर्तुळातून सांगण्यात आले की काश्मीरमधील ज्याज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होत्या त्या सर्वांना पास म्हणजेच उत्तीर्ण करण्याचा निर्णय झाला आहे. विद्यार्थी त्यामुळे संतुष्ट होतील. हे ऐकल्यावर या सरकारच्या अकलेची दाद द्यावीश वाटली नाही तरच नवल ? काश्मीरमधील व्यापार, कामकाज पूर्णपणे बंद आहे. शाळा सुरु झाल्या, शिक्षकांना सक्तीने हजर राहण्यास सांगूनही विद्यार्थी येईनासे झाले



आहेत.

सरकारी कचेऱ्याही सक्तीने सुरु करण्यात आल्या आहेत आणि कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्या तरी त्यांच्या जाण्यायेण्यात असंख्य अडचणी येत असल्याने त्यांच्या हालास पारावार राहिलेला नाही.

इंडियन एकस्प्रेसच्या श्रीनगर ब्यूरोमधल्या एका बातमीदाराने त्याचा अनुभव कथन केला आहे व प्रसिध्दही केला आहे. त्याच्या गर्भवती बहिणीच्या सिझेरियनची तारीख ठरलेली होती. त्यासाठी तिला प्रसूतीगृहात दाखलही करण्यात आले होते. परंतु अचानक तिच्या गर्भातील बाळाच्या संदर्भात काही गुंतागुंतीची स्थिती उद्भवली आणि तिचे बाळ गर्भातच दगावले. कारण अचानक घडलेल्या या प्रकारात तज्ञ डॉक्टरांना वेळेवर बोलविण्यात असंख्य अडथळे होते. फोनयंत्रणा नीट व सुरळीत नसल्याने अखेर ते बाळ दगावले. ही एक कहाणी झाली. अशा किती दुर्दैवी कहाण्या सध्या घडत असतील याची कल्पना केलेली बरी !

या निर्णयाचे 'टायमिंग' म्हणजेच निवडलेली वेळही महत्वपूर्ण व उल्लेखनीय म्हणावी लागेल. देशापुढे घोर आर्थिक संकट उभे आहे. सरकारने रिझर्व बँकेच्या राखीव वित्तीय साठ्यावर झडप घालून तो गट्ट केला आहे. तरीदेखील अर्थव्यवस्था संकटातून बाहेर येईल याची हमी नाही. साधारणपणे डिसेंबरपर्यंत देशाभोवतीचा आर्थिक पेचप्रसंगाचा विळखा अधिक घट्ट होऊन गंभीर आर्थिक संकट उभे राहण्याचे भाकित अनेक अर्थतज्ञांनी केलेले आहे. बेकारी वाढत आहे. अर्थव्यवस्थेत मंदगती आलेली आहे आणि ती दीर्घकाळ चालू राहण्याची चिन्हे असल्याचे मानले जात आहे. अशा परिस्थितीत देशातील जनतेला पुन्हा एकदा राष्ट्रवाद, देशभक्ति, अल्पसंख्यकविरोध या गुंगीच्या गोळ्या देण्याची गरज सरकारला वाटू लागली. त्यातली काश्मीरला विशेष दर्जा रद्द करणे ही प्रभावी गोळी सरकारने जनतेला खायला घातलेली आहे. काश्मीरबाबत निर्णय करण्याने पाकिस्तानात त्याची प्रतिक्रिया निर्माण होणार आणि त्यामुळे मग जनतेपुढे दहशतवाद, अतिरेकी हल्ले आणि मुख्यतः अल्पसंख्यक विरोध हे मुद्दे आपोआपच जोरात प्रचारित केले जाणे अपेक्षितच आहे. त्यासाठी सर्व प्रचारसंत्रणा जोरात



कामाला

लागणार हेही ओघाने आलेच. मग त्या गोळीच्या नशेत देशभक्तीसाठी वाटेल तो त्याग करण्यास जनता तयार होईल व सरकारचे त्यात फावणार आहे. थोडक्यात आगामी काळात अशी गुंगीची औषधे मिळत राहतील हे निश्चित! या निर्णयाचे अनेक प्रतिकूल परिणाम दिसत असूनही सरकार या निर्णयावर खूष आहे. काश्मीरला भारताला कसे जोडले या 'आनंदात' ते आहेत. अशा आनंदाला कोणते विशेषण वापरायचे हे वाचकांनी ठरवावे ! परंतु काश्मिरी माणसाला त्रास होत आहे याबद्दल सरकारला फिकीर नसावी असे वाटू लागले आहे. याला कारणेही असतील आणि त्यासाठी या सरकारची मनोवृत्ती लक्षात घ्यावी लागेल. काश्मिरी लोकांना झाला त्रास तर झाला, काय फरक पडतो ही ती प्रवृत्ती असावी. त्यामुळेच काश्मिरी जनतेला विश्वासात न घेता व उलट त्यांच्या लोकप्रतिनिधींना जेरबंद करुन चोरट्या व छुप्या मार्गाने आणि बहुमताच्या आधारे सरकारने हा परस्पर निर्णय केलेला आहे. याचे परिणाम काय होतील यासाठी प्रतीक्षा करावी लागेल!

# राष्ट्रवादीच्या भव्य मोर्चाने मुंबई दणाणली...




# बलात्कारी लोकांना पाठीशी घालणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो...फडणवीस सरकार हाय हाय...

**मुंबई –** होश मे आओ होशमे आओ फडणवीस सरकार होशमे आओ... महिलाओंके सम्मानमे राष्ट्रवादी मैदानमे... बलात्कारी लोकांना पाठीशी घालणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो...फाशी द्या फाशी द्या बलात्कार करणाऱ्या नराधमाला फाशी द्या...फडणवीस सरकार हाय हाय... अशा गगनभेदी घोषणा देत राष्ट्रवादी मुंबई काँग्रेसने मुंबई दणाणून सोडली.

राज्यात अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार आणि जालना जिल्हयातील १९ वर्षीय मुलीवर मुंबईतील चेंबुर परिसरात चार नराधमांनी विषारी ड्रग्ज पाजवून सामुहिक बलात्कार केला होता. त्यात एक महिना मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्या मुलीचा जगण्याशी संघर्ष गुरुवारी संपला. याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक झाली असून मुंबईमध्ये सरकारविरोधात भव्य मोर्चा काढण्यात आला. चेंबुर लाल डोंगर ते चुनाभट्टी पोलिस ठाणे असा हा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो महिला, पुरुष पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. मुंबईमध्ये राष्ट्रवादीने काढलेल्या सरकार विरोधातील मोर्चामध्ये मुंबईकर सर्वसामान्य जनताही सहभागी झालेली पाहावयास मिळाली.

चुनाभट्टी पोलिस ठाण्यावर भव्य मोर्चा आल्यावर पोलिसांनी तो अडवला. त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे, मुंबई अध्यक्ष व राष्ट्रीय प्रवक्ते नवाब मलिक, आमदार विद्या चव्हाण यांच्या शिष्टमंडळाने पोलिसांची भेट घेऊन त्या नराधमांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. तसं नाही झालं तर यापेक्षा मोठया पध्दतीचा व तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

या घटनेची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी करतानाच जोपर्यंत त्या पिडीत कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पोलिसांशी चर्चा करुन आल्यावर



# बलात्कार घटनेची एसआयटी मार्फत चौकशी करा- सुप्रिया सुळे

माध्यमांशी बोलताना दिला आहे. दरम्यान पिडीत मुलीच्या भावाला घेवून पोलिस महासंचालकांची भेट घेणार असल्याचेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी सांगितले. या मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे, मुंबई अध्यक्ष नवाब मलिक यांनी केले. यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे, मुंबई अध्यक्ष नवाब मलिक, मुंबई महिला अध्यक्षा सुरेखा पेडणेकर, आमदार विदया चव्हाण, मुंबई महानगरपालिकेतील गटनेत्या राखी जाधव, युवती अध्यक्षा अदिती नलावडे, मुंबई युवक अध्यक्ष निलेश भोसले आदींसह मुंबईतील सर्व विभागातील हजारो महिला आणि पदाधिकारी सहभागी झाले होते.

**मुंबई** – चेंबूर येथील सामुहिक बलात्कार प्रकरणातील पिडीत मुलीच्या भावासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे आणि मुंबई अध्यक्ष नवाब मलिक यांनी आज पोलिस महासंचालकांची भेट घेतली. यावेळी पीडितेच्या कुटुंबियांना संरक्षण पुरवण्याची मागणीही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केली आहे. तसेच राज्यातील वाढत्या महिला अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याशी चर्चा केली त्याचबरोबर महिलांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात राज्याचे पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल यांना निवेदन सादर केले. यावेळी राष्ट्रवादीचे मुंबई अध्यक्ष व राष्ट्रीय प्रवक्ते नवाब मलिक, आमदार विद्याताई चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सामुहिक बलात्कार प्रकरणी सुप्रिया सुळे यांनी घेतली पोलिस महासंचालकांची भेट...



# सुप्रिया सुळे यांचा संवाद दौरा- संक्षिप्त वृत्तांत




# संघर्षाला भीत नाही, माझ्यात संघर्ष करण्याची धमक, शेवटच्या क्षणापर्यंत लढेन

## खासदार सुप्रिया सुळे यांच्या संवाद यात्रेमधून कार्यकर्त्यांत संचारली ऊर्जा

हिंदीतील प्रख्यात कवी पियुष मिश्रा आपल्या एका कवितेत म्हणतात युद्ध ही तो वीर का प्रमाण आहे, जो लड सका है वो ही तो महान है... ही ओळ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या खासदार सुप्रिया सुळे यांना अगदी तंतोतंत लागू होते. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशानुसार अहमदनगर येथून खा. सुप्रिया सुळे यांनी आपली संवाद यात्रा सुरू केली. अहमदनगर, सोलापूर, नाशिक, जळगाव, ठाणे, नवी मुंबई जवळपास हजारो किलोमिटरचा प्रवास करत ही यात्रा गेली. खा. सुळे यांनी कार्यकर्ते, विद्यार्थी, तरुण, डॉक्टर, वकील, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, उद्योगपती, पत्रकार आणि राज्यातील महत्त्वाच्या लोकांशी संवाद साधला. या सरकारच्या काळात नेमकी काय अडचणी येत आहेत त्याबाबत विचारणा केली.

देशातील आर्थिक मंदीचा फटका सर्वच स्तरातील लोकांना बसत आहे. देशावर कर्जाचा बोजा वाढत आहे. अशीच स्थिती पुढे राहिली तर मोठे संकट येईल. 'सेल फॅमिलीज् सिल्व्हर' अशी इंग्रजीत म्हण आहे.याच धोरणानुसार देशातील कंपन्या विकल्या जातील की काय अशी शंका आहे. या स्थितीत सरकार रस्त्यांची घोषणा करत आहे.मोठ्या योजनांची घोषणा करत आहे. पण सरकार पैसे कुठून आणणार? असा सवाल खा. सुळे यांनी सरकारला विचारला. देशात आर्थिक मंदीचे सावट आहे अशी कबुली खुद्द केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी दिली आहे मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या महाजनादेश यात्रेत लोकांना सांगतात की राज्याने भरभराट केली आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध आहे. हा केंद्र

आणि राज्य सरकारमधील विसंवाद आहे अशी टाका खा सुप्रिया सुळे यांनी केली. मुख्यमंत्री महोदय राज्यात सर्व काही निटनेटके आहे तर पार्ले जी सारखी कंपनी बंद पडण्याच्या मार्गावर का आहे याचे उत्तर द्या असे खडेबोल खा. सुळे यांनी मुख्यमंत्र्यांना सुनवले. याच संवाद दौऱ्यादरम्यान खा. सुळे यांनी बेरोजागारांना मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातूनच रोजगार देण्याची मोहीम आखली. राज्यातील तरुणांनी आपला बायोडेटा मला पाठवावा, आपण तो मुख्यमंत्र्यांना पाठवू मग मुख्यमंत्र्यांनी दावा केला आहे तर तरुणांना मुख्यमंत्र्यांनी रोजगार द्यावा असे आव्हान या मोहिमेंतर्गत खा. सुप्रिया सुळे यांना केला आहे. या संवाद यात्रेदरम्यान राज्यातील तरुण सरकारच्या हुकूमशाही पद्धतीचा विरोध करताना दिसले. नवी मुंबई येथील तरुणांने ईव्हीएम विरोधात रोष व्यक्त केला. ईव्हीएमच्या जिवावरच हे सरकार निवडून येत आहे आणि हम करे सो कायदा ही पद्धत अंमलात आणत आहे. या सरकारच्या हुकूमशाही निर्णयामुळेच तरुणांचा रोजगार जात आहे, मोठमोठे उद्योग बंद पडत आहेत असा संताप तरुणांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, विद्यमान सत्ताधारी सुडाचे राजकारण करीत आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात लढताना ही लढाई अधिक गांभिर्याने लढण्याची गरज आहे. आपल्याला संघर्ष करायचा आहे. ज्याच्या मनगटात धमक आहे तोच संघर्ष करतो. आपण सर्वजण या सुडबुद्धीच्या राजकारणाविरोधात लढत राहू.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत नाही परंतु तरीही आपण हेडलाईनमध्ये आहोत. राज्य सरकारच्या विरोधात जनतेमध्ये रोष आहे. बेरोजगारीची भीषण स्थिती आहे. या परिस्थितीत सत्ताधारी फोडाफोडाचे राजकारण करीत आहेत.आपल्या पक्षात कुणी गेलं म्हणून पडझड झाली असं नाही. गेले त्यांना जाऊ द्या. व्यापार-कारखाने बंद होत आहे, रोजगार जात आहे,अशी सत्ता आणि सत्ताधारी आता जनतेलाच नको आहेत.बेरोजगारीची भीषण स्थिती आहे. परंतु आता हे बदलण्याची गरज आहे. केवळ राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच ही परिस्थिती बदलण्याची धमक आहे. सध्या पत्रकारिता सुरू आहे की टिव्ही सिरियल हे कळत नाही. पत्रकार गंभीर नसतील तर हरकत नाही.आपण गंभीर होऊ. आपल्या समोर असंख्य प्रश्न आहे त्यांवर लक्ष केंद्रित करू असे मनोगत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले आणि संवाद यात्रेनिमित्त राष्ट्रवदी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये एक जोश संचारला



## केंद्राच्या चुकीच्या धोरणांमुळेच देशात आर्थिक मंदीचे वातावरण : सुप्रिया सुळे

**नाशिक** – आर्थिक मंदीच्या सावटामुळे देशातील उद्योग व्यवसाय संकटात सापडले असून अनेक कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्यामुळे देशातील अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी केंद्रात धोरणात्मक निर्णयांची गरज असल्याचे मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित संवाद दौऱ्यासाठी त्या नाशिकला आल्या होत्या. त्यावेळी राष्ट्रवादी भवन मुंबई नाका येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, सरकारने स्मार्ट सिटी प्रोजेक्ट राबविला खरा पण निधी अभावी कामे होतांना दिसत नाही. नाशिक मध्ये स्मार्ट सिटीसाठी केवळ ९० कोटी रुपये आले आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीच नेमकं काय होतंय हा प्रश्न आहे. सरकारकडे पैसे नसल्याने सरकारी मालमत्ता विकण्याची वेळ सरकारवर आली आहे. त्यामुळे हे प्रोजेक्ट पूर्ण होतील की नाही का प्रश्नच आहे असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मंदीच्या फटक्यामुळे नाशिकमध्ये बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. महाराष्ट्रात एवढ्या नोकऱ्या असतील तर बेरोजगारांची संख्या का वाढत आहे. त्यामुळे युवकांच्या या प्रश्नावर आम्ही काम करायला तयार आहोत असे सुप्रिया सुळे यांनी यावेळी सांगितले. देशातील प्रश्न बेरोजगरिसह अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्रात धोरणात्मक निश्चितीची गरज आहे. त्यासाठी उद्योगात जो पर्यंत स्थैर्य निर्माण होत नाही तो पर्यंत अर्थव्यवस्था वाढू शकत नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले. असे असतांना मुख्यमंत्र्यांना राज्यातील प्रश्न दिसतंच नाही यासाठी त्यांनी अर्थमंत्र्यांना भेटण्याची गरज असल्याचे सांगितले.

रिजर्व्ह बँकेचे रिझर्व्ह निधी सरकार कडून काढण्यात येत असून देशातील आर्थिक मंदीचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी कोण कुठल्या पक्षात जातोय यांच्यावरच चर्चा होत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे राजकारणाची व्याख्याच बदलली आहे. त्याला सर्वच जबाबदार आहे.शासनाच्या विरोधात बोलणाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली जात असल्याची चर्चा सगळीकडे असल्याचे सांगून निवडणुका फक्त जिंकायला लढल्या जात नाही तर एक व्हिजन घेऊन काम काम करण्यासाठी लढल्या जातात असे त्यांनी यावेळी सांगितले.

## मुंबई केंद्रशासित करणार?

राज्यघटनेचाच आधार घेऊन जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या घटनात्मक तरतुदी रद्द करुन या राज्याचे विभाजन आणि दोन केंद्रशासित प्रदेशात करण्याचा आपला बेत वर्तमान राज्यकर्त्यांनी पूर्णत्वाला नेला. घटनात्मक तरतुदींचा आपल्या उद्दिष्टपूर्ततेसाठी अर्थ लावण्यात आला.




तो कसा??

जम्मू-काश्मीरची विधानसभा बरखास्त !

आता तेथे राज्यपालांची राजवट म्हणजेच केंद्र सरकारची

घंटाकर्ण, नवी दिल्ली

# चव्हाटा

हुकुमत!

घटनेप्रमाणे राष्ट्रपति राजवट लागू असलेल्या राज्याचा अर्थसंकल्प किंवा इतर काही निर्णय संमत करण्याचे अधिकार संसदेला प्राप्त होतात.

त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरची विधानसभा अस्तित्वात नसल्याचा आधार घेऊन तेथील जनतेच्या भवितव्याचा निर्णय करण्याचा अधिकार संसदेने स्वतःकडे घेतला आणि त्या राज्याचे दोन तुकडे करण्यात आले.

या प्रकाराला अनेक कायदेपंडितांनी हरकत घेतली.






पण मोदी-शहा सरकार ठाम राहिले.

यावर युक्तिवादही सुरु झाले. राज्यसभेत तर अनेक कायदेपंडित सदस्य आहेत. त्यांनी सांगितले की एखाद्या राज्याचे विभाजन करण्यासाठी प्रथम तेथील विधानसभा बरखास्त करायची, राष्ट्रपति राजवट लागू करायची आणि संसदच त्या राज्याचे प्रतिनिधित्व करीत असल्याचे सांगून त्या राज्याबाबत वाटेल ते निर्णय करायचे असा प्रकार सुरु झाला आहे. हे सरकार इतर राज्यांबाबतही हेच प्रकार करु शकते.

मग काय ?

अनेक मंडळींच्या अँटेना एकदम ताठ झाल्या.

राजकीय वर्तुळातून कानावर आलेल्या माहितीनुसार असे समजले की महाराष्ट्राचे तीन विभागात विभाजन करण्याचे घाटत आहे.

तीन भागात ?

हो, मुंबईला केंद्रशासित करायचे, विदर्भाला वेगळे करायचे आणि उर्वरित मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकणाचे आणखी एक राज्य करायचे !

मुंबईला केंद्रशासित करायचे कारण ज्याप्रमाणे दिल्ली ही राजकीय राजधानी आहे आणि केंद्रशासित आहे. त्याचप्रमाणे मुंबई आर्थिक राजधानी असल्याने तिला केंद्रशासित करायचे.






याचे कारण ? आर्थिक जगतावर असलेले गुजराती मंडळींचे वर्चस्व!

हा तर्क देणारे त्यात आणखी एका मुद्याची भर घालतात की बुलेट ट्रेन अहमदाबाद-मुंबई करण्यामागे कारण काय ?

कारण वर सांगितलेले आहे !

एकप्रकारे मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करुन पुन्हा पूर्वीप्रमाणे ती गुजरातच्या वर्चस्वाखाली आणायचा हा डाव आहे!

कानोकानी आलेली ही माहिती जोरदारच आहे नाही का ?

पण खरोखर असे झाले तर?

शिवसेनेच्या वाघाचे काय होणार ?

गीरच्या सिंहापुढे हा वाघ पलायन करणार की शरणागत होणार?

जसे राजकारणात या वाघाचे मांजर झाले त्याप्रमाणे ?

पाहू या, पुढे खरोखरच काही होते का ते ?

## जेटलींची जागा घेणार कोण ??

अरुण जेटली या जगात नाहीत.

ते आजारी झाल्यानंतर त्यांनी मंत्रीपद सोडले होते.


2019च्या विजयानंतर देखील त्यांनी सरकारमध्ये सामील होण्यास नकार दिला होता. त्यामुळे अर्थखात्याची जबाबदारी बहुधा पियूष गोयल यांच्याकडे देण्यात येईल अशी अपेक्षा होती.

परंतु अखेरच्या क्षणी जेटली यांनी ही जबाबदारी निर्मला सीतारामन यांच्याकडे जाईल अशी यशस्वी तजवीज केली.

निर्मला सीतारामन यांना अर्थखाते हे जेटली यांच्यामुळेच मिळाले. एवढेच नव्हे तर अर्थराज्यमंत्री अनुराग ठाकूर हे देखील जेटली यांचे खास मानले जात.

गोयल हे गृहमंत्री व पक्षाध्यक्ष अमितभाई शहा तसेच पंतप्रधानांच्याही मर्जीतले मानले जातात. त्यामुळेच 2019च्या निवडणुकीपूर्वीचा हंगामी अर्थसंकल्पही त्यांनीच मांडला होता. जेटली हे त्यावेळीही रुग्णशय्येवरच होते.








परंतु गोयल यांनी अद्याप अर्थमंत्री होण्याची इच्छा सोडलेली नाही.

सध्या ते रेल्वे व वाणिज्य अशा दोन मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. परंतु त्यांचा खरा जीव आहे तो अर्थखात्यातच. त्यामुळेच रिझर्व बँकेकडून मिळालेल्या अर्थ पुरवठ्यानंतर गोयल यांनी ही रक्कम पुरेशी नाही आणि रिझर्व बँकेने आणखीही राखीव निधी सरकारला द्यायला हवा असे निवेदन केले.


आता येथील राजकीय वर्तुळात अशी चर्चा सुरु आहे की जेटलीच्या निधनानंतर गोयल यांनी पुन्हा अर्थखात्याबद्दलची आपली इच्छा प्रकट करण्यास सुरुवात केली आहे.

एवढेच नव्हे तर रिझर्व बँकेबाबत निवेदने करुन त्यांनी ती ते सूचितही केले आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार अद्याप झालेला नाही.

त्यामुळे कदाचित पुढे जेव्हा कधी मंत्रिमंडळात फेरबदल किंवा विस्तार होईल तेव्हा गोयल आपली इच्छा पूर्ण करतात काय हे पहावे लागेल.

गोयल यांनी 'फील्डिंग' तर जोरदार लावली आहे !



भाजप नेतृत्वाच्या कसे नाकीनऊ येत आहे याचे किस्से बाहेर येत आहेत.

आमदारही नसलेले एक भाजप नेते लक्ष्मण सावडी यांना तीनपैकी एक उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले.

हे लिंगायत आहेत. म्हणजेच मुख्यमंत्री येद्युरप्पा यांच्याच समाजाचे आहेत.

त्यांची ख्याति काय सांगावी ?

मागे एकदा कर्नाटकात भर विधानसभेत काही आमदारांना त्यांच्या भारी मोबाईल फोनवर अश्लील चित्रफिती पाहताना 'रंगे हाथ' पकडण्यात आले होते. त्या आमदारांमधील सावडी हे एक होते. त्यांची मोबाईलवर अश्लील चित्रे पाहतानाची छबी सर्वत्र प्रसिध्द झालेली होती.

तर अशा 'नामवंत' महाशयांना ते आमदार देखील नसताना थेट उप मुख्यमंत्री केल्याने निष्ठावान भाजप आमदारांमध्ये संताप व नाराजीची लाट उसळली आहे.

काहींनी तर बंडाचीच धमकी दिली.

हे प्रकरण येद्युरप्पा यांच्या आवाक्याबाहेरचे असल्याचे दिसून आल्यानंतर अखेर पक्षाच्या हायकमांडला त्यात पडावे लागले.

साक्षात पक्षाचे सर्वेसर्वा अध्यक्ष महोदय अमितभाई शहा आणि भाजपचे संघटन सचिव बी.एल.संतोष (हेही कर्नाटकीच आहेत) यांनी हस्तक्षेप केला आणि या असंतुष्ट आमदारांना चक्क

## अश्लीलतेला राजमान्यता?

माणसाला सत्तेची लालसा किंवा हाव सुटली की तो सारासार विवेक विसरतो.

महाराष्ट्रात काय किंवा कर्नाटकात काय, भाजपचे असेच काहीसे झाले आहे.

विरोधी पक्षांना संपविण्यासाठी त्यांच्या आमदारांना फोडण्याचा कळस या पक्षाने या दोन राज्यात लावला आहे.

कर्नाटकात त्यांनी काँग्रेस व जनता दला(धर्मनिरपेक्ष)चे आमदार फोडून त्यांचे सरकार पाडण्यात यश मिळविले.

पण स्वतःचेच सरकार स्थापन करताना आता भाजपच्या नाकात दम आला आहे.

आपल्याच पक्षाच्या सरकारमध्ये त्यांना तीन उपमुख्यमंत्री नेमण्याची पाळी---- नामुष्की आली.

यावरुन हे सरकार किती कमजोर आहे आणि सत्तेच हाव सुटलेल्या भुकेल्या भाजप आमदारांच्या मागण्या पूर्ण करताना






धमकावले, की याद राखा निवडणुकीत तिकिटे हवी असतील चूपचाप गप्प बसा अन्यथा पक्षातून काढून टाकण्यात येईल.

अशी धमकी मिळाल्यावर हे आमदार करणार काय ?

मुकाट्याने गप्प बसले बिचारे !

कर्नाटकात भाजप नेतृत्व भरपूर अडचणीत आहे.

हायकमांडला कर्नाटकात येद्युरप्पांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करायचे नव्हते.

त्याऐवजी विधानसभेची निवडणूक घेऊन मग पूर्ण बहुमताने जिंकून सरकार स्थापन करण्याची त्यांची योजना होती.

परंतु येद्युरप्पा - वय वर्षे 76 - यांना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीचे असे काही आकर्षण की त्यापायी त्यांनी मागे भाजपमधून बंडखोरी केली होती व ती भाजपला महागात पडून सरकार गमवावे लागले होते.

त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी हायकमांडला त्यांचा मुख्यमंत्री होण्याचा हट्ट पुरवावा लागला. एक वर्ष मुख्यमंत्री राहून त्यांनी निवृत्त व्हायचे(75 पार नेते म्हणून) आणि मग निवडणूक घेऊन पूर्ण बहुमताने कर्नाटकात सरकार स्थापन करायचे असा 'प्लॅन' आखण्यात आला आहे. व त्याचाच भाग म्हणून हे सरकार कसेबसे चालवले जात आहे.


तुमच्या लक्षात आलेच असेल की येद्युरप्पा यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांना मंत्रिमंडळासाठी पंधरा दिवस रखडवण्यात आले.

थोडक्यात कर्नाटकात भाजपचा रडीचा डाव सुरु आहे.

आपल्या घरातली सुंदोपसुंदी आटोक्यात आणताना नाकात दम येत आहे.

'अति तेथे माति' ही म्हण भाजप विसरत चालल्याचे हे लक्षण आहे !

महाराष्ट्रतही त्यांचा हा खेळ सुरु आहे.



# अमितभाईंचा चढता आलेख !

अमितभाईंनी काश्मीरची शस्त्रक्रिया ज्या सफाईदारपणे केली त्यामुळे त्यांच्या 'शल्य-कौशल्या'ची सर्वत्र तारीफ होऊ लागली आहे.

या शस्त्रक्रियेच्या काळात देशात सर्वत्र अमितभाईंचीच छाया पसरलेली होती.

सर्वसाधारणपणे असे काही क्रांतिकारक निर्णय अमितभाईंचे 'साहेब' करीत असतात.

पण काश्मीर प्रकरणात मात्र सर्व सूत्रे अमितभाईच्याच हाती राहिली.


प्रसिध्दीचा प्रकाशझोत देखील त्यांच्यावरच राहिला.

संसदेतही सर्वत्र तेच व्यापून राहिले होते.

अखेर सर्व काही सुरळीत पार पडल्यानंतर 'साहेब' देशातल्या सर्व वृत्तवाहिन्यांवर झळकले आणि त्यांनी काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेणे कसे ऐतिहासिक आहे व आता काश्मीरमध्ये कुणीही जाऊन जमिनी घेऊन राहू शकतो वगैरे सांगितले.




परंतु या झळकण्याचा फारसा उपयोग होऊ शकला नाही. अमितभाईंनी 'साहेबां'ना फारसे कामच ठेवलेले नव्हते.






पण काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेणे म्हणजे आता त्या राज्यात सर्वांना मुक्त व मोकाट प्रवेश असल्याचे जे चित्र निर्माण करण्यात आले त्यामुळे भाजपची मंडळी इतकी वाहवत गेली की एका नेत्याने भर सभेत जाहीर केले की आता 'काश्मीरच्या सुंदर गोऱ्यापान मुलींशी लग्न करणे शक्य होणार आहे.'

भाजपची घसरण किती सुरु राहणार आहे हे अमितभाई व साहेबच जाणोत.

परंतु काश्मीर प्रकरणानंतर अमितभाई हे एक नवे सत्ताकेंद्र तयार झाले हे निश्चित !





त्यामुळेच आता 'साहेब' व 'अमितभाई' अशी नेतृत्वाची जोडी तयार झाली आहे.

यामुळे आता भाजपमध्ये 'भाई' गट व 'साहेब' गट तयार होऊ लागतात की काय अशी चर्चा आहे.



## निःशंक विज्ञाननिष्ठा

देशाचे शिक्षण म्हणजेच मनुष्यबळविकासमंत्री रमेश पोखरियाल उर्फ निःशंक यांचे 'पुराण प्रेम' नवे नाही.

कणाद ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी वेदकाळात भारतात पहिला अणुस्फोट केला होता आणि भारताच्या अण्विक ज्ञानाचे जनकत्व कणाद ऋषींकडे जात असल्याचे त्यांनी संसदेत सांगितले होते.

आता अलीकडेच ते पश्चिम बंगालमधील खरगपूर येथील आयआयटी या प्रतिष्ठित संस्थेच्या पदवीदान समारंभाला गेले होते.

तेथे त्यांनी पुन्हा एकदा भारतीय प्राचीन विज्ञानाचा त्यांचा आवडता विषय काढला.

प्रभु रामचंद्र ज्या सेतुमार्गाने रामेश्वरहून श्रीलंकेला गेले तो रामसेतु हा तत्कालीन अभियांत्रिकी ज्ञानाचा चमत्कार होता आणि त्याचे अध्ययन व संशोधन होण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

उपस्थित तज्ञ, वैज्ञानिक अवाक् झाले.

पण करतात काय ?


मुकाट्याने निःशंक यांचे विद्वत्ताप्रचुर वक्तव्य त्यांना ऐकावे लागले.

हे निःशंक म्हणे अमितभाईंच्या गटातले मानले जातात.

रा.स्व.संघाची कृपादृष्टी असणाऱ्या एका वरिष्ठ संघनेत्याच्या एका पुस्तकाच्या प्रकाशनाला निःशंक यांना बोलाविण्यात आले होते. त्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन व्हायचे होते.

कार्यक्रम तीन वाजता होता पण एक ते दीड तास उलटूनही निःशंक आले नाहीत.

अखेर आयोजकांनी उपस्थितांच्या हस्तेच पुस्तक प्रकाशन करुन वेळ मारुन नेली.



परंतु निःशंक यांनी असे वागण्याचे कारण काय ? तेही एका संघाच्या वरिष्ठ नेत्याच्या संदर्भात?

बोलणार कोण ?

अखेर ते पडले अमितभाईंच्या गटाचे ना ?

## तिकट द्या तिकिट !

यशासारखी नशा नसते.

एकदा यश मिळायला लागले की त्या यशाशी निगडित दंतकथाही तयार होऊ लागतात.

मग एखादा नेता त्याने लहानपणी मगरींशी यशस्वी झुंज देऊन सहीसलामत कसा आला याचे वर्णनही करु लागतो.

असाच एक किस्सा भाजपच्या एका नेत्याने अलीकडेच सुनावला.

हा नेता विमानाने जाण्यासाठी निघाला होता.

विमानतळावर सामान वगैरे देऊन त्याने बोर्डिंग पास घेतला व सुरक्षा छाननीसाठी तो रांगेत उभा राहिला.

त्याच्या तपासणीची वेळ आल्यानंतर त्या सुरक्षा कर्मचाऱ्याने 'साब टिकट देना' असे म्हटले.

भाजपच्या या नेत्याला वाटले की तो बोर्डिंग पास मागत आहे म्हणून त्याने बोर्डिंग पास त्याला दिला.

त्यावर तो सुरक्षा कर्मचारी त्याला म्हणाला 'साब ये टिकट नही, मुझे चुनाव का टिकट चाहिए, मैं आप की पार्टीसे चुनाव के लिए टिकट चाहता हूँ !'

यावर या नेत्याने त्याला सांगितले की तिकिट वगैरे देण्याची गोष्ट त्याच्या हातात नाही. पक्षाच्या मुख्य कार्यालयात येऊन तुम्हाला अर्ज द्यावा लागेल असे त्याने त्याला सांगितले.

तो सुरक्षा कर्मचारी चिवट असावा.

काही दिवसांनी हे नेतेही दिल्लीत परतले आणि एके दिवशी हे सुरक्षा कर्मचारी महोदय भाजपच्या कार्यालयात आपला तपशीलवार परिचय घेऊन दाखल झाले.




त्यांनी या नेत्याला गाठले आणि परिचय व कागदपत्रे दिली.





या नेत्यानेही त्याला संबंधित सरचिटणीसांकडे पाठविले.

भाजपकडे लोकांची कशी रीघ लागली आहे हे ठसविण्यासाठीची ही कथा आहे. त्यामुळेच कार्याध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनीही अलीकडेच भाजपच्या सदस्यसंख्येत सात कोटींनी वाढ झाल्याचे सांगितले.

भाजपची ही कोटिच्या कोटि उड्डाणे किती खरी हे तेच जाणोत!

दंतकथा ऐकत रहावे !!!


INDIAN
POLICE
MAERSK
"K"LINE








# अनर्थकारण व सूडाचे राजकारण




**लोकनाथ**

माजी पंतप्रधान मनमोहनसिंग हे फारसे कधी जाहीर बोलत नाहीत. त्यांच्यावर कुणी टीका केली तरी ते त्याची फारशी दखल न घेता गप्प राहणे पसंत करतात. त्यामुळेच सध्याच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेबाबत त्यांच्यासारखा जागतिक मान्यता असलेला अर्थतज्ञ एखादे निवेदन करतो तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यांनी त्यांच्या निवेदनात 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या सार्वत्रिक अव्यवस्थापनामुळे अर्थव्यवस्था मंदावली आहे' असे म्हटले आहे. केंद्रीय सांख्यिकी संघटनेतर्फे(सीएसओ) तर्फे 2019-2020 या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीमधील विकासदर हा फक्त पाच टक्के नोंदला गेल्याचे जाहीर करण्यात आले होते त्या संदर्भात मनमोहनसिंग यांनी त्यांची ही प्रतिक्रिया नोंदवली. नोटबंदी आणि घाईघाईने पूर्वतयारी न करता जीएसटीची अंमलबजावणी करण्याचा हा परिणाम असल्याचे त्यांनी म्हटले. भारताला ही सततची घसरण परवडणारी नाही आणि ती थांबविण्यासाठी व अर्थव्यवस्थेला पूर्ववत गतिमान करण्यासाठी तातडीची पावले उचलणे गरजेचे आहे असे सांगतानाच मनमोहनसिंग यांनी मोदी सरकारला 'सूडबुध्दीचे राजकारण' न करण्याचा सल्लाही दिला आहे.


कधीही न बोलणाऱ्या मनमोहनसिंग यांना देखील मतप्रदर्शनाची गरज भासावी याचाच अर्थ देशाच्या आर्थिक आघाडीवरील परिस्थिती फारशी चांगली नाही असाच लावावा लागेल. 'सीएसओ'(सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन)ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार 2019-2020या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील विकासदर फक्त पाच टक्के नोंदला गेला. गेल्या सहा वर्षातील हा नीचांकी म्हणजे सर्वात कमी विकासदर आहे. गेल्या पाच तिमाहींपासून म्हणजे गेल्या पंधरा महिन्यांपासून विकासदरात सातत्याने घसरण होत असल्याचेही सीएसओच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. हा अहवाल डोळे उघडणारा आहे. कारण कृषिसह अनेक प्रमुख आर्थिक क्षेत्रात खालावलेपणा आहे. कृषीचा विकासदर 5.1 टक्क्यांवरुन 2 टक्क्यांवर खाली घसरला आहे. म्हणजेच 3.1 अशी प्रचंड घसरण आहे. आणखीही काही घसरणीच्या आकडेवारीची उदाहरणे देता येतील. मॅन्युफॅक्चरिंग म्हणजेच औद्योगिक उत्पादन क्षेत्रात या तिमाहीत केवळ 0.6 टक्क्यांनी वाढ झाली. गेल्या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीतील हा दर 12.1 टक्के होता. यावरुन घसरणीचा अंदाज लावणे शक्य होईल. रोजगाराच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे मानले जाणारे बांधकाम क्षेत्र असते. याचा विकासदरही 9.6 टक्क्यांवरुन(गेल्या वर्षी) 5.7 टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

अधिक आकडेवारीच्या जंजाळात न जाता एवढाच निष्कर्ष काढता येईल की अर्थव्यवस्थेभोवती मंदीचा विळखा घट्ट होताना दिसत आहे. याचे दुष्परिणाम अलीकडच्या दोन घटनांवरुन आणखी स्पष्टपणे लक्षात येतील. पार्ले ही बिस्किटे तयार करणारी कंपनी आहे. या कंपनीने त्यांच्या उत्पादनांना मागणी नसल्याने दहा हजार कर्मचाऱ्यांना ले-ऑफ म्हणजेच कामावरुन कमी करण्याचे ठरविले आहे. वाहन निर्मिती उद्योगावरील संकटाची तीव्रता एवढी आहे की मंदीमुळे या उद्योगाने वाहनांच्या निर्मितीत कपात तर केलीच आहे परंतु एकंदर उद्योगातून सुमारे साडेतीन लाख कर्मचाऱ्यांची सुट्टी करण्यात आली आहे. म्हणजेच सध्या परिस्थिती अशी आहे की मोटार खरेदी सोडाच पण पार्ले बिस्किटाचा पाच रुपयांचा पुडाही कुणी खरेदी करेनासे झाले आहे. याचाच अर्थ बाजारातली मागणी व खप कमी झाला आहे. बाजारात ग्राहक नसतील आणि कुणा ग्राहकाची खरेदी क्षमता नसेल तर मागणी व खप दोन्हीही खालावणारच ! याचा अर्थ काय निघतो ? लोकांची खरेदी करण्याची क्षमता कमी झाली आहे, त्यामुळे बाजारात खरेदी नाही म्हणजेच खप नाही आणि त्याचा अर्थ मागणी नाही ! म्हणजेच अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकारला अशा काही उपाययोजना कराव्या लागतील की ज्यामुळे लोकांच्या खिशात पैसे खुळखुळायला लागतील, त्या पैशातून ते बाजारात जाऊन वस्तुंची खरेदी करु लागतील, त्यातून मागणी व खप वाढेल. परंतु सरकारने आतापर्यंत ज्या काही घोषणा केल्या आहेत त्यामध्ये बाजारातील मागणी व खप वाढण्याच्या दृष्टीने फारशा उपाययोजना नाहीत. उद्योगांना काही दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रथम उद्योगांना सवलती दिल्यास ते पुन्हा तेजीत यावेत या हेतुने हे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी वाहन, घरे यांच्यासाठीच्या कर्जांवरील व्याजदर









कमी करण्याचा एक प्रमुख उपाय समाविष्ट आहे. विशेषतः आता सणासुदीचे दिवस येत असल्याने ग्राहक नवनव्या वस्तुंच्या खरेदीसाठी बाजारात जाऊ लागतील हे गृहीत धरुन या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यांना यश मिळाले व बाजारात ग्राहकांनी गर्दी केली तर ती एक दिलासा देणारी बाब ठरेल.

परंतु एका बाजुला सरकारने उद्योगांसाठी काही सवलती देऊन उपाय करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरीकडे कृषि क्षेत्रातून मात्र काहीशा चिंताजनक बातम्या येऊ लागल्या आहेत. खरीप हंगामातील पिकात म्हणजेच खरीपात येऊ घातलेल्या धान्य उत्पादनात घट होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. स्कायमेट आणि क्रिसिल या दोन संस्थांनी तांदूळ, सोयाबीन, डाळी यांचे उत्पादन घटेल असे त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे. खरीपाचे पीक दिवाळीच्या सुमारास हाती येते. त्यासंदर्भात विविध संस्थांतर्फे धान्योत्पादनाचे अंदाज वर्तविण्यात येत असतात. कृषि मंत्रालयातर्फे पेरणीपासूनच मागोवा घेतला जात असतो. मुळात यावर्षी मान्सून पावसाने सुरुवात करण्यासच विलंब केल्याने खरीपाच्या पेरण्यांनाच फटका बसला होता. त्यामुळे एकंदर खरीपाच्या पेरणीक्षेत्रात यावर्षी दोन टक्के घट झाली होती. तोही एक घटक संभाव्य धान्योत्पादन घटण्यास कारणीभूत ठरु शकतो. आता खरीप हंगाम अखेरच्या टप्प्यात पोहोचल्याने या संस्थांनी आपापले अंदाज देण्यास सुरुवात केली आहे. कृषि मंत्रालयाने आपल्या चौथ्या आगाऊ अंदाजात तांदळाचे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत फारसे वाढणार नसल्याचे म्हटले आहे. यंदा आसाम, बिहारमध्ये महापूर आले तर पश्चिम बंगाल आणि इतर पूर्व भारतातील राज्यांमध्ये पावसाचे मान कमी राहिल्याने तांदुळाच्या पिकाला फटका बसल्याचे या संस्थांचे म्हणणे आहे. एका बाजूला अतिवृष्टी व पूर तर अन्य राज्यात तुरळक पावसाने या पिकाला दगा दिला आहे. डाळींच्या उत्पादनात अर्ध्या टक्क्याने घट होण्याची शक्यता 'स्कायमेट' या संस्थेने व्यक्त केली आहे. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात काही जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिरिक्त पावसाचा फटका सोयाबीनच्या पिकाला बसण्याने त्याच्या उत्पादनातही घट होण्याची शक्यता आहे. मात्र यंदा कापसाच्या उत्पादनात भरघोस वाढ होण्याचा अंदाज सर्वांनी एकमुखाने वर्तविलेला आहे. कापसाच्या उत्पादनात जवळपास 14 टक्के वाढ होईल आणि यंदा सुमारे साडेतीन कोटि गाठी कापसाचे उत्पादन होईल असे स्कायमेटचे म्हणणे आहे. अर्थात तांदुळाच्या उत्पादनात फारशी वाढ होणार नसली तरी अन्य धान्योत्पादनात फारशी घट होण्याची शक्यता नाही असे सांगण्यात येते. साधारण अंदाजानुसार या खरीप हंगामातील एकूण धान्योत्पादन सुमारे 14.25 कोटि टन होणे अपेक्षित आहे. गेल्या वर्षी हे उत्पादन 14.17 कोटि टन इतके झाले होते. म्हणजेच यंदा नुकसान होणार नसले तरी फारसा फायदाही होणार नाही व परिस्थिती जवळपास जैसे थे राहण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. अर्थात यामध्ये 'जर-तर'चा भाग मोठा असेल. प्रत्यक्ष धान्योत्पादन झाल्यानंतरच स्थिती स्पष्ट होईल. सांगण्याचा मुद्दा एवढाच आहे की शेतीमध्ये देखील फार मोठी सुधारणा होण्याची शक्यता आढळत नाही. उलट काही भागात (उदा. कोल्हापूर, सांगली, सातारा) शेतकऱ्यांवर अतिवृष्टी व महापूर तर काही भागात अवर्षणाचे संकट कोसळलेले आढळते.

त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारतर्फे काही उपाययोजना होईल अशी शक्यता तूर्तास तरी दिसत नाही. केंद्र सरकारच्या निरीक्षक समित्या दौरे करीत आहेत. त्या या शेतकऱ्यांसाठी काय मदत सुचवतात त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबुन राहतील. पीकविमा योजनेच्या काही अटी सरकारने बदलण्याचे जाहीर केलेले असले तरी प्रत्यक्षात या योजनेत शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याऐवजी त्यांची एकतर्फी लूटच होत असल्याचे एव्हाना सिध्द झाले आहे आणि मुख्यमंत्र्यांना त्याची जाणीव झाली असावी असे त्यांच्या काही विधानांवरुन लक्षात येते.

मनमोहनसिंग यांच्या निवेदनाचे बारकाईने विश्लेषण केल्यास त्यांनी ही आर्थिक आपत्ती किंवा संकट हे 'मनुष्यनिर्मित' असल्याचे स्पष्ट म्हटले आहे. राज्यकर्त्यांतर्फे या आर्थिक संकटाचे खापर जागतिक मंदीवर फोडून स्वतःला नामानिराळे करण्याकडे दिसून येतो. परंतु मनमोहनसिंग यांनी या संकटाला सध्याच्या राज्यकर्त्यांनी अविचाराने व अविवेकीपणे केलेले दोन निर्णय कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. नोटाबंदी आणि जीएसटी






करप्रणाली घाईघाईने कोणतीही पूर्वतयारी न करता लागू करण्याचा अट्टाहास हे ते दोन निर्णय असल्याचे मनमोहनसिंग यांनी म्हटले आहे. 'जीएसटी' म्हणजेच वस्तु व सेवाकर प्रणाली लागू करण्यात आली. त्याचे श्रेय मोठ्या वाजतगाजत घेण्यात आले. परंतु आजमितीला या कराच्या माध्यमातून होणाऱ्या महसुली उत्पन्नाची गत अवस्था काय आहे ? ताज्या आकडेवारीनुसार जीएसटीच्या महसुली उत्पन्नात सरकारला एक लाख कोटि रुपयांपेक्षा अधिक तूट झालेली आहे. आता याला जबाबदार कुणाला धरायचे ? मोदी-शहा सरकारला की पं.जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेसला ? जीएसटी करप्रणाली लागू करण्यात एवढ्या असंख्य अडचणी येत आहेत की त्यातून काही गैरव्यवहारही होऊ लागले आहेत. पश्चिम बंगालचे अर्थमंत्री अमित मित्रा(ते स्वतः एक अर्थतज्ञ म्हणून प्रसिध्द आहेत) यांनी जीएसटीच्या करचुकवेगिरीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधून सुमारे 45 हजार 682 कोटि रुपयांची करचुकवेगिरी झाल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांना रीतसर पत्रच पाठविले आहे. ही केवळ केंद्रीय जीएसटीची रक्कम आहे आणि त्यात राज्यस्तरीय गैरव्यवहाराची रक्कम मिळविल्या. ही करचुकवेगिरी एक लाख कोटि रुपयांची मर्यादा देखील पार करु शकेल असे त्यांनी म्हटले आहे. जीएसटी करप्रणालीत प्रत्येक वस्तु किंवा सेवेची नोंदणी आवश्यक असते. त्याचप्रमाणे तिचे उत्पादन करणाऱ्यांना उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्यामालाच्या पावत्यांची नोंद करायला लागते. ही सर्व नोंदणी ऑनलाइन असते. म्हणजेच यामध्ये पावत्यांची व दरांची जुळणी आवश्यक असते. ही तांत्रिक बाब आहे परंतु या प्रक्रियेत पुरेशी स्पष्टता नसल्याने गैरव्यवहार होऊ लागले आहेत आणि हवाला प्रकरणेही त्यात होऊ लागल्याचा गंभीर आरोप मित्रा यांनी केला आहे.

मनमोहनसिंग यांनी जीएसटीच्या घाईने केलेल्या अंमलबजावणीचा जो मुद्दा मांडला आहे त्याची पुष्टि या एका उदाहरणाने होऊ शकते. नोटाबंदी आणि जीएसटीची सदोष अंमलबजावणी यांच्यामुळे अर्थव्यवस्थेतील लहान, घरगुती व्यावसायिक यांची पार वाताहात झाली. यालाच अनौपचारिक किंवा असंघटित क्षेत्र म्हटतात. हे देखील एकेकाळी करदाते होते. परंतु या दोन निर्णयांमुळे आज ते करदाते राहिले असावेत काय किंवा त्यांचे अस्तित्व उरले आहे काय हा प्रश्न निर्माण झाला आहे. या क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील व्याप्ती जवळपास ऐंशी टक्के

मानली जाते व त्यांचे अस्तित्व या दोन निर्णयांमुळे संपुष्टात आले आहे. त्यामुळेच या आर्थिक संकटाला मनमोहनसिंग यांनी हे दोन निर्णय कारणीभूत असल्याचे म्हटले आहे ते यादृष्टीकोनातून वास्तव आहे.

देशाची अर्थव्यवस्था मंदावल्याचे इशारे गेल्या एक वर्षापासून दिले जात होते. परंतु सरकार आणि सरकारी समर्थक व भाटांनी अर्थव्यवस्थेला काहीही झालेले नाही. सर्व काही सुरळीत असल्याचा आव आणलेला होता. लोकसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी असा आव आणणे त्यांना भागच होते. मते मिळविण्यासाठी बेसुमार खैरात करण्यात आली व खजिना रिकामा करण्यात आला. आता रिझर्व बँकेच्या राखीव निधीवर हात मारण्यात आला. वर हे सर्व नियमानुसारच असल्याचे मस्तीत सांगितले जात आहे. मनमोहनसिंग यांच्या काळात तर अर्थव्यवस्था पार लयास गेल्याचे भाजपची मंडळी सांगायची. तरीही तेव्हा रिझर्व बँकेच्या राखीव निधीतून पैसे उचलण्याची गरज त्यांना भासली नाही. आता एवढे युगपुरुषांचे सरकार





अस्तित्वात असताना अशी उसनवार करण्याची पाळी का यावी ? एवढ्यावरही सरकारचे समाधान झालेले नाही. रिझर्व बँकेला राखीव निधीची गरजच काय असा सवाल करुन या सरकारमधील पियूष गोयल यांच्यासारखे मंत्री या राखीव निधीतून मिळालेले पैसे अपुरे आहेत आणखी पैसे तेथून काढण्याची आवश्यकता बोलून दाखवत आहेत.


हे प्रकार केवळ चिंताजनक नाहीत तर पिसाटलेले आहेत. हे सरकार आता पिसाटल्यासारखे मिळेल तेथून पैसे गोळा करु लागले आहे. 'सेबी' कडील सुमारे 3700 कोटि रुपयांचा निधी असो, एलआयसीकडील निधी असो त्या सगळ्या पैशांवर या सरकारची भुकेली नजर पडू लागली आहे. ही सर्व दिवाळखोरीची लक्षणे आहेत. या सगळ्या कारवायांमधून देश खरोखर आर्थिक संकाटात सापडल्यास त्यातून बाहेर पडण्यासाठी लागणारी बौध्दिक कुवत देखील या सरकारकडे नाही. त्यामुळेच लोकांचे लक्ष या गंभीर अशा परिस्थितीवरुन इतरत्र वळविण्यासाठी या सरकारने 370 कलम रद्द करुन काश्मीर मधील परिस्थिती चिघळविण्याचा प्रकार केला असावा असा संशय व्यक्त केला जातो. लोकांना देशभक्ति, राष्ट्रवाद, धार्मिक ध्रुवीकरण आणि दहशतवाद यांच्या गुंगीचे इंजेक्शन देऊन बधीर करण्याचा हा डाव असावा असे दिसते. या बधीरपणात लोकांना आर्थिक चटके जाणवणार नाहीत असे बहुधा या सरकारला वाटत असावे. त्यात फक्त विरोधी पक्षांच्या नेत्यांना सीबीआय, इडी यांच्या मार्फत 'टार्गेट' करुन भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा एक फुगा तयार करण्यात येत आहे. भाजप वगळता बाकीच्या सर्व राजकीय पक्षांचे नेते भ्रष्ट असल्याचे दाखविण्याचा हा एक अत्यंत पध्दतशीर व योजनाबध्द डाव आहे. येद्दुरप्पा यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी असूनही त्यांना मुख्यमंत्री करण्यात आले. म्हणजेच तपास संस्थांचा गैरवापर केवळ विरोधी पक्षांच्या विरुध्द करण्याचे सूडाचे राजकारण उघडपणे चालू आहे. ही सर्व नाटके पाहताना व देशभक्तीच्या गुंगीचे इंजेक्शन दिल्याने जनतेला आर्थिक संकटाचे चटके जाणवणार नाहीत असा राज्यकर्त्यांचा समज आहे. पण या प्रकारच्या राजकारणाला मर्यादा असतात. एकदा जनतेच्या लक्षात ते आले की मग अशा राज्यकर्त्यांची पळताभुई थोडी होऊ शकते! अर्थकारणाशी नको तो खेळ या सरकारने आरंभलेला आहे.

मराठीत एक म्हण आहे, सर्व नाटके करता येतात पण पैशाचे नाटक करता येत नाही! या सरकारला हा साधा नियम समजलेला नसावा!



# काश्मीरचे आंतरराष्ट्रीयकरण

'जी-7' शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची भेट झाली. त्यामध्ये चर्चा काश्मीरच्या मुद्यावर झाली हे आता जगजाहीर झाले आहे. या भेटीदरम्यान ट्रंप यांनी काश्मीर मुद्दा हा भारत व पाकिस्तान दरम्यानचा द्विपक्षीय मुद्दा असून त्यामध्ये अन्य कोणत्याही तिसऱ्या देशाला कसलाही अधिकार नाही हे तत्वही जाहीरपणे मान्य केले. यामुळे एका गोष्टीवर पडदा पडला की उत्साही डोनाल्ड ट्रंप काश्मीरसाठी भारत-पाकिस्तान दरम्यान पंच किंवा मध्यस्थ म्हणून काम करणार नाहीत. अन्यथा या शिखर परिषदेवपूर्वीत काही दिवस ट्रंप यांनी अमेरिकेत आलेल्या पाकिस्तानी पंतप्रधान इम्रानखान यांच्याबरोबर वार्तालाप करताना साक्षात नरेंद्र मोदी साहेबांनीच आपल्याला कास्मीरबाबत मध्यस्थीचा प्रस्ताव केल्याचा एक खळबळजनक गौप्यस्फोट केला होता. त्याचा प्रतिवाद करताना किंवा तो दावा खोडताना भारताच्या नाकीनऊ आले. संसदेत यावर खुलासा करताना परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी मोदी साहेबांनी असा कोणताही प्रस्ताव केला नसल्याचे



# कोण करतंय? गहिनीनाथ

स्पष्टीकरण केले होते, किंबहुना त्यांना ते करावे लागले असे म्हटले तर ते जास्त योग्य ठरेल.

भारत सरकारने काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या घटनात्मक तरतुदी कलम-370 मधून रद्द केल्या. हे करताना त्यांनी जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशात विभाजन केले. त्याचप्रमाणे हे करण्यापूर्वी संपूर्ण जम्मू-काश्मीर राज्यात संचारबंदी, जमावबंदी लागू केली आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी(पीडीपी), नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स कॉन्फरन्स, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांचे आमदार व नेते यांना स्थानबध्द केले. माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती, उमर अब्दुल्ला, फारुक अब्दुल्ला यांना स्थानबध्द व एकांतवासात ठेवण्यात आले. थोडक्यात 370 कलम रद्द करण्याच्या निर्णयास विरोध करणाऱ्या सर्व संभाव्य राजकीय नेत्यांना जेरबंद करुन हे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या प्रकारामुळे जो आंतरराष्ट्रीय आरडाओरडा होणे अपेक्षित होते ते घडलेच. पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रसंघासह सार्वत्रिक आरडाओरडा सुरु केला. यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय जगतातील प्रतिमेला

तडा जाण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाय करण्याची वेळ भारतावर आली. त्यातून मग संयुक्त राष्ट्रसंघ सुरक्षा परिषदेचे पाच कायम सदस्य देश म्हणजेच पाच महासत्ता, युरोपीय राष्ट्रसमूह, चीन, रशिया, ब्रिटन, फ्रान्स या राष्ट्रांशी संपर्क साधून त्यांना परिस्थितीची माहिती देण्यात आली. यामुळे पाकिस्तानच्या कारवायांना लगाम बसण्यास मदत झाली.

काश्मीरच्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळविण्याच्या नादात भारतीय नेतृत्वाने काही तडजोडी केल्या असल्याचे आता निदर्शनास येऊ लागले आहे. 'जी-7' राष्ट्रसमूहाच्या बैठकीत काश्मीरवर फार लक्ष केंद्रित होऊ नये आणि तो मुद्दा फारसा चर्चेत येऊ नये यासाठी भारताने फ्रान्सच्या नाकदुऱ्या काढल्या असे आता आढळून येत आहे. पंतप्रधानसाहेब चार दिवसात फ्रान्सच्या दोन वाऱ्या का करतात याची उत्तरे शोधली जाऊ लागली आहेत. फ्रान्सच्या चार दिवसात दोन वाऱ्या कशा केल्या हे देखील पाहण्यासारखे आहे. 22 ऑगस्ट रोजी पंतप्रधान फ्रान्सला गेले. ही द्विपक्षीय भेट होती. 22 व 23 रोजी द्विपक्षीय चर्चा आटोपून ते संयुक्त अरब अमीरात व बहारीन येथे गेले. 23 व 24 या दोन दिवसात तेथील भेटी आटोपून ते पुन्हा 25 व 26 रोजीच्या 'जी-7' शिखर परिषदेसाठी फ्रान्समधील बिऑरित्झ येथे पोहोचले. फ्रान्सने काश्मीरबाबत भारताला पूर्णपणे पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. पण ही भेट आटोपून पंतप्रधानसाहेब भारतात परतल्यानंतर लगेचच फ्रान्सच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनी भारताला भेट दिली. या भेटीत रफाल विमानांच्या वाढीव खरेदीच्या विषयावर चर्चा झाली. त्याखेरीज फ्रानसकडून नौदल, कोस्ट गार्ड(तटरक्षक दल) यांच्यासाठी विशिष्ट प्रकारची हेलिकॉप्टर्स खरेदी करणे, फ्रेंच बनावटीच्या स्कॉर्पियन पाणबुड्यांची आणखी संख्या वाढविणे यासारख्या मुद्यांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. याला योगायोग समजायचे की आणखी काही ? आता पंतप्रधानसाहेब रशियाला चालले आहेत. त्या दौऱ्यातही रशियन हेलिकॉप्टर्स खरेदीचा विषय चर्चेत समाविष्ट आहे. अमेरिकेकडून तर विविध शस्त्रखरेदीबरोबरच व्यापारविषयक सवलती देण्याबाबतही पुढाकार घेतला जात आहे. कंत्राटी उत्पादन क्षेत्र (कॉन्ट्रॅक्च्युअल मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर) तसेच कोळसा खनन क्षेत्रात 100 टक्के एफडीआय म्हणजेच थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीला परवानामुक्त परवानगीचा निर्णय करुन सरकारने अमेरिकेला मदत केल्याचे बोलले जाते. जागतिक मंदीमुळे अनेक अमेरिकन उद्योग संकटात असल्याने त्यांच्या मदतीसाठी हा निर्णय करण्यात आल्याचे सांगण्यात येते. थोडक्यात 'जी-7' शिखर संमलेनात काश्मीर मुद्दा अधिकृतपणे चर्चेत आला नसला तरी नेत्यांनी काश्मीरचा मुद्दा स्फोटक होऊ नये आणि त्यावरुन दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रांमध्ये संघर्ष पेटू नये असा सल्ला न चुकता दिला. संयुक्त राष्ट्रसंघासह बहुतेक प्रमुख देशांनी दोन्ही अण्वस्त्रधारी शेजाऱ्यांनी परस्परांशी चर्चेने प्रश्न सोडवावेत व सबुरीने घेण्याची सूचनाही केलेली आहे. त्यामुळे कळत-नकळत काश्मीरचा मुद्दा आंतरराष्ट्रीय झालेलाच आहे. पाकिस्तानने तर दक्षिण आशियाई संसदीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या मालदीव्ज मध्ये झालेल्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करण्याचा असफल प्रयत्न केला. परंतु याला असफल म्हणता येणार नाही कारण पाकिस्तानला तो मुद्दा जिवंत व प्रकाशात ठेवायचा असतो व त्या मर्यादित प्रमाणात ते यशस्वी होतही आहेत. काश्मीरबाबत चीन वगळता अन्य कोणत्या देशाची








साथ मिळणार नाही हे पाकिस्तानला पूर्ण माहिती असूनही मुद्दा जिवंत ठेवण्यासाठी या चलाख्या ते करीत आहेत. असे असले तरी या सरकारने 370 कलम रद्द करताना दाखविलेली घाई आणि राजकीय नेत्यांना जेरबंद करणे व काश्मीर खोऱ्यात सुरक्षा दलांची प्रचंड तैनाती करण्याने प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. त्यांचा प्रतिवाद करणे भारतीय नेतृत्वाला अवघड जाणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवाधिकाराच्या मुद्यावर यासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत व त्याची जाणीव भारताला ठेवावी लागेल.

याच संदर्भात इराणने देखील दिलेल्या प्रतिक्रियेची दखल भारताला घ्यावी लागणार आहे. काश्मीर राज्याचे विभाजन केल्यानंतर इराणची प्रतिक्रिया आली. त्याला वेगळे महत्व आहे. लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देताना सरकारने त्यात कारगिलचाही समावेश केला आहे. कारगिलमध्ये शिया मुस्लिम बहुसंख्येने आहेत आणि त्यांनी आतापर्यंत नेहमीच काश्मीरमधील बहुसंख्यक सुन्नी मुस्लिमांच्या विरोधात जाऊन भारत सरकारची साथ दिलेली आहे. परंतु या मुस्लिम समूहाचे लडाखमधील बौध्द समाजाबरोबर फारसे सलोख्याचे संबंध नाहीत. बौध्द समाजाला लडाखवर त्यांचे वर्चस्व हवे आहे व त्यात त्यांना रा.स्व.संघ आणि भाजपची पूर्ण मदत आहे. लडाखमधील बौध्द, हिंदू व शीख समाज मिळून त्यांचे पारडे निवडणुकीत जड होते. आताही लोकसभा निवडणुकीत भाजपचे बौध्द उमेदवारच निवडून आले आहेत. यामुळे कारगिलमधील शिया मुस्लिमांनी या विभाजनाला विरोध करताना त्यांना लडाखमध्ये समाविष्ट केले जाऊ नये अशी मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी कारगिल परिसरात आंदोलनही सुरु केले आहे पण सुरक्षा दलांच्या जोरावर ते मोडून काढले जात आहे. हा समाज इराणमधील शिया धर्मीय व धर्मगुरुंशी बांधिलकी मानणारा आहे. त्यामुळेच इराणने देखील यासंदर्भात मोदी सरकारला सावधगिरीचा आणि सबुरीचा सल्ला देऊन तेथील मुस्लिमांच्या भावनांची दखल घेण्याचे आवाहन केले आहे.

सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणातही काही प्रमाणात खळबळ सुरु आहे. विशेषतः अफगाणिस्तानातून आपल्या फौजा मागे घेण्याबाबत ट्रंप यांनी घेतलेल्या आग्रही भूमिकेने दक्षिण आशियाई विभागात काहीशी गुंतागुंत निर्माण होत आहे. त्यासाठी तालिबानबरोबर बोलणी करुन समझोता करण्यापर्यंतही गोष्टी करण्यात आल्या आहेत. ट्रंप हे धंदेवाईक आहेत आणि त्यांच्यादृष्टीने पैसा व धंदा याला महत्व आहे त्यामुळे त्यांना अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये फुकट पैसा घालवू नये आणि विनाकारण अमेरिकन सैनिकांचे जीव धोक्यात घालू नये असे वाटते. त्यासाठी प्रसंगी तालिबानशी समझोता करण्याची त्यांची तयारी आहे आणि तशा वाटाघाटीही त्यांनी केल्या आहेत. परंतु एकीकडे वाटाघाटी चालू ठेवतानाच तालिबानने दुसरीकडे अफगाणिस्तानात ठिकठिकाणी हल्ले सुरु केले. त्यात मोठी जीवितहानि झाली. अखेर अमेरिकन प्रशासन आणि खुद्द ट्रंप यांना जाहीर करावे लागले की अफगणिस्तानमधून सैन्य पूर्णपणे हटविणे किंवा अमेरिकेने तेथून पूर्णपणे अंग काढून घेण्याची बाब शक्य नाही. अमेरिकेला तेथे लष्करी उपस्थिती ठेवावी लागणार आहे. अर्थात तोपर्यंत ट्रंप यांनी आणखी काही बेफाम विधाने केली. त्यांनी भारत व पाकिस्तानने अफागणिस्तानच्या सुरक्षेची संयुक्तपणे हमी घ्यावी असा प्रस्ताव करण्यास सुरुवात केली. पाकिस्तानला अफगाणिस्तानात पुन्हा तालिबान राजवट हवीच आहे कारण जर तालिबानला अफगाणिस्तानात पुन्हा सत्ता मिळाल्यास पाकिस्तानातील कट्टर इस्लामी संघटनांचा धुमाकूळ कमी होऊ शकतो. तालिबानला पाकिस्तान व आयएसआयची मदत होऊन पाकिस्तानची एक सीमा सुरक्षित होऊ शकते. त्याचा मोठा फायदा म्हणजे पाकिस्तानला काश्मीरमधील हस्तक्षेपासाठी मोकळे रान मिळू शकते. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय व



त्याचबरोबर तालिबानी-जेहादी घटकही त्यांच्या मदतीला येऊ शकतात. सुदैवाने हे घडताना दिसत नाही पण पाकिस्तान व डोनाल्ड ट्रंप यांच्यात मध्यंतरी जी जवळीक निर्माण झाली होती ती भारताला विघातक होती. तूर्तास हा प्रकार थंडावल्यासारखा दिसतो.

डोनाल्ड ट्रंप यांनी व्यापार आणि आर्थिक आघाडीवर भारतावर जो दबाव आणण्यास सुरुवात केली होती ती पाहता सध्याचे राज्यकर्ते त्या दबावाला बळी पडून अमेरिकेच्या सूचनेनुसार भारतीय सेना अफगाणिस्तानात पाठविणार काय असे काहीसे शंकेचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु तूर्तास तसे काही घडताना आढळत नाही. कारण सध्याचे राज्यकर्ते असे आहेत की सेना पाठवून पुन्हा देशभक्ति व राष्ट्रवादाचे इंजेक्शन भारतीय नागरिकांना देऊन त्या चुकीचेही समर्थन करण्याची क्षमता असलेले आहेत. परंतु ट्रंप यांना ज्याप्रमाणे अमेरिकन प्रशासनाने रोखले तसेच भारतातील प्रशासन व लष्करी नेतृत्वानेही सरकारला याबाबत सावध ठेवले आणि या चुकीपासून वाचविले. भारताने परकी भूमीवर सैन्य पाठविण्याची एकदाच चूक केली होती. राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी श्रीलंकेत एलटीटीईच्या विरोधात लढण्यासाठी भारतीय शांतिसेना या नावाने सैन्य पाठविले होते. त्यात भारतीय सैन्याची मोठी जीवितहानि झालीच पण भारताची बदनामी झाली आणि याच प्रक्रियेत राजीव गांधी यांना जीवही गमवावा लागला होता. तेव्हापासून भारतीय सेनेला परकी भूमीवर न पाठविण्याचा एक अलिखित संकेत पाळला जातो. सध्याच्या राज्यकर्त्यांनी किमान त्याचे पालन केले ही स्वागतार्ह बाब आहे.



काश्मीरच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर चिंतेचे वातावरण असणे स्वाभाविक आहे. याचे एकमेव कारण दोन अण्वस्त्रधारी शेजारी देश हे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतील पाच कायमस्वरुपी सदस्य राष्ट्रांपैकी चीन हा पाकिस्तानचा पूर्णतया पाठराखण करणारा देश आहे. ब्रिटन ही केवळ नामधारी महासत्ता राहिली आहे. ब्रिटनचे आंतरराष्ट्रीय राजकारणातले स्थान खूपच खालावलेले आहे. परंतु आजही अमेरिका, रशिया आणि फ्रान्स या दखल घेतल्या जाणाऱ्या महासत्ता आहेत. काश्मीरच्या मुद्यावर या तीन महासत्तांना भारताच्या बाजुने ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठीच गेल्या काही दिवसात भारत सरकारने राजनैतिक पातळीवर केलेल्या हालचालींचा वर आढावा घेतला आहे. अमेरिकेला आर्थिक, व्यापारी तसेच संरक्षण क्षेत्रात, फ्रान्स व रशियाबरोबर संरक्षण साधनसामग्री खरेदीच्या माध्यमातून संतुष्ट करण्यात आलेले आहे. थोडक्यात आता ही संतुष्टी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सरकारला सुटका मिळणार आहे. परंतु काश्मीरमधील मानवाधिकाराबाबत संयुक्त राष्ट्रसंघातर्फे व्यक्त झालेली चिंता ही दखलपात्र असून तिच्या प्रभावाखाली अनेक देश भारताला जाब विचारु शकतात.

फ्रान्सने 'जी-7' बैठकीत काश्मीरचा मुद्दा चर्चेत येऊ न देता भारताला मदत केली असली तरी फ्रेंच अध्यक्षांनी त्यांच्या निवेदनात नेमक्या नागरी अधिकार व स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या मुद्यावर जोर दिलेला आढळतो. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने देखील तंतोतंत त्याच भूमिकेचा पुनरुच्चार केलेला आढळतो. त्यामुळे मोदी सरकारला काश्मीरचा मुद्दा असाच हवेत सोडून चालणार नाही. काश्मीरमध्ये लवकरात लवकर राजकीय संवाद प्रक्रिया सुरु करुन तेथे लोकनियुक्त सरकार बहाल करण्यास प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा या मुद्याच्या आंतरराष्ट्रीयकरणापासून हे सरकार कुणाला रोखू शकणार नाही. त्याचबरोबर भारतीय परराष्ट्र धोरण हे पाकिस्तान केंद्रित न ठेवता त्याची व्याप्ती वाढविण्याकडेही या सरकारला लक्ष द्यावे लागेल. अन्यथा पाकिस्तान केंद्रित परराष्ट्र धोरणात काश्मीरचा मुद्दा अपरिहार्यपणे प्रकाशझोतात राहील आणि त्यावर भारताला सर्वत्र खुलासे देत बसावे लागेल. विशेषतः या प्रक्रियेत साहसवादी भूमिका घेणे घातक ठरेल याचे भान राज्यकर्त्यांना ठेवावे लागेल.



*Best Compliments*

# सेल जीवनाचा

आता आणखी एक खुशखबर
प्रचंड सवलत प्रचंड सवलत
कॅन्सरच्या तपासणी दरात पन्नास
टक्के सूट
एकाच घरातील दोन पेशंट
असतील तर
तिसऱ्याला तपासणी फुकट
म्हणजे दोनवर एक फ्री गिफ्ट !
संपणारच असेल जर तुमचं आयुष्य
तर जाता जाता एक मौज कराच
अहो असे अस्वस्थ नका होऊ
काय हवाय तुम्हाला? कपडे?
बूट?
दागिने? घर की गाडी?
आता हे सगळ आम्ही "स्कीम"
मध्ये बसवलंय
वर त्यावर व्याजही नाही शिवाय
इ.एम.आय. एकदम कमी
एकदम दोन इ.एम.आय. भरले तर
तर तिसरा इ.एम.आय. माफ
आहे की नाही गंमत !
बघा न आता आपलं अस्तित्वच
आता
पार गुरफटून गेलय सवलतींमध्ये
लिव्ह इन मध्ये राहता येत
नको झालं तर सोडता येतं
मुलं बाळ सुद्धा मिळतात भाड्याने
वजन वाढतंय तर काळजी नको
सवलतीच्या दरात जिम आहे.
हव तेवढ कमी करून मिळेल
फक्त लगेच नोंदणी केली
तरच सवलत आहे ना!
खरं म्हणजे बुड न हलविता तुम्ही
जगज्जेते सिकंदर बनू शकता
मात्र गरज आहे पहिल्या
गुंतवणुकीची
स्मार्ट फोन बाळगण्यासाठी
त्यासाठी सुद्धा सवलतीच्या दरात
कर्ज देण्यासाठी बँका येतील
तुमच्या दरात
तुमचा नवा कोरा स्मार्ट फोन आता
बनला आहे तुमचा आर्टीफिशल
इंटेलिजन्स
तुमचं अस्तित्वच आता अनंताशी
जोडलय
लौकिक अर्थान् तुमची
इहलोकीची यात्रा
संपवायची असेल ना
तर त्यासाठी सुद्धा सवलत आहे.
विद्युत दाहिनी प्रिफर करा




मोफत होईल अंत्यविधी
शिवाय तुमची राखही मिळेल
पर्यावरण प्रिय पिशवी मध्ये
अगदी मोफत
त्वरा करा लोक हो
पटकन लाईनीत नंबर लावा
नाहीतर स्टॉक संपेल आणि
सेल बंद होईल...

## शेवटचे पान



राष्ट्रवादी स्वाभिमानी आधार! राष्ट्रवादी विचार !!